
॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

**श्री. छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले)**
**नगर वाचनालय सातारा**

**१८५३ - २०१३**

## शतकोत्तर हीरक महोत्सव

# अक्षर गौरव



# अक्षर गौरव

॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

श्री. छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा

१८५३ - २०१३

## शतकोत्तर हीरक महोत्सव

२०१२ - २०१३


प्रकाशक
**श्री.बा.ग.जोशी**
कार्यवाह

संपादिका
**डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर**
कार्यवाह

मुद्रक
**श्री.संदेश शहा**
प्रिंट ओम ऑफसेट,सातारा

संगणक
**श्री.प्रशांत गुजर**
टाईप इनोव्हेटर्स,सातारा

खाजगी वितरणासाठी



या स्मरणिकेतील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते
ही त्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत.
संपादक त्याच्याशी सहमत असेलच असे नाही.

## अध्यक्ष

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.रा.ग.सोमण | १९३२ ते १९४० | श्री.त्रिं.रा.खर्शीकर | १९४१ ते १९४४ | श्री.श्री.वि.जोशी | १९४५ ते १९४६ |
| श्री.शं.ह.साठे | १९४७ ते १९५३ | श्री.श.विं.भिडे | १९५४ ते १९५८ | श्री.शि.दा.लिमये | १९५८ ते १९६० |
| श्री.रा.रा.ढवळे | १९६१ ते १९६३ | श्री.मा.दि.मो.हातवळणे | १९६४ ते १९६५ | श्री.रा.ना.गोडबोले | १९६६ ते १९६८ |
| श्री.म.गं.भागवत | १९६९ ते १९८८ | श्री.सी.व्ही.दोशी | १९८८ ते २०१३ | | |

## उपाध्यक्ष

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.म.कृ.दांडेकर | १९३२ ते १९४० | श्री.श्री.वि.जोशी | १९३२ ते १९३९ | श्री.श्री.वि.भिडे | १९३२ ते १९४३ |
| श्री.वि.रा.खर्शीकर | १९४० | | १९४७,१९४९ | श्री.कृ.दा.लिमये | १९४१ ते १९४३ |
| श्री.स.वि.करंदीकर | ४१,४२-४४,४७-४९ | श्री.ल.गो.मेहेंदळे | १९४३ | श्री.दि.ह.पंडित | १९४४ ते १९४६ |
| श्री.द.बा.सरवटे | १९४५ ते १९४६ | श्री.रा.स.चुनेकर | १९४५ | | |
| श्री.द.स.कुलकर्णी | १९४५ | श्री.वा.के.वाघ | १९४६ | श्री.रा.ना.आपटे | १९४७ ते १९४९ |
| श्री.द.रा.चितळे | १९४८ | श्री.ना.ज.सोमण | १९४९ | श्री.तु.य.राजेभोसले | १९५० ते १९५३ |
| श्री.मो.रा.वाळिंबे | १९५४ | श्री.डॉ.द.न.गोखले | १९५५ ते १९५८ | श्री.बॅ.पी.जी.पाटील | १९५९ ते १९६० |
| श्री.प्रा.दि.मो.हातवळणे | -१९६१ ते १९६३ | श्री.वि.भा.वैद्य | १९६४ ते १९६५ | श्री.प्रा.दा.सि.देसाई | १९६६ ते १९६८ |
| श्री.ग.ना.जोशी | १९६९ ते १९७० | श्री.वि.श्री.दामले | १९७१ ते १९७५ | श्री.श्री.व्यं.भोसले | १९७६ |
| श्री.विलासराव पाटील | १९७७ | श्री.व.जो.फाळके | १९८३ | श्री.विलासराव पाटील | १९८४ ते १९८६ |
| श्री.सी.व्ही.दोशी | १९८७ | श्री.व्यं.ज्ञा.तथा | १९८८ ते १९९० | श्री.श्री.बा.आचार्य | १९९१ ते १९९७ |
| श्री.डॉ.अच्युत गोडबोले | २००१ ते २००२ | श्री.आप्पासाहेब भोसले | | श्री.ॲड.विलासराव आंबेकर | १९९९ ते २००५ |
| श्री.राजेंद्र चोरगे | २००५ ते २०१० | श्री.युवराज पवार | २०१० ते २०१३ | | |


## १९९३ पासूनचे कार्यवाह

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.वा.कृ.पोळकर | १९३२ | श्री.एम.आर.राजोपाध्ये | १९३२ | श्री.रा.द.पाटणकर | १९३३ ते ३५ |
| श्री.वा.के.वाघ | १९३३ | श्री.एस.के.सोहनी | १९३४ | श्री.वा.नृ.गजेन्द्रगडकर | १९३५ ते ४२ |
| श्री.ग.म.पुरोहित | १९३६ | श्री.पां.के.कोल्हटकर | १९३६ | श्री.स.वि.करंदीकर | १९३७ ते ३८ |
| श्री.का.म.देशपांडे | १९३७ | श्री.व.द.पाटणकर | १९३८ | श्री.ज.रा.राजोपाध्ये | १९३९ ते ४० |
| श्री.मा.दि.कुलकर्णी | १९३९ | श्री.कृ.दा.लिमये | १९४० | श्री.दा.अ.पंडित | १९४१ ते ४३ |
| श्री.गो.ज.फणसळकर | १९४१ ते ४६, ४७ | श्री.श्री.बा.आचार्य | १९४३ ते ४४ | श्री.वि.ग.आराध्ये | १९४४ |
| श्री.अ.कृ.कुलकर्णी | १९४५ ते ४६ | श्री.मो.रा.वाळिंबे | १९४५ | श्री.बा.वि.भिडे | १९४७ ते ५४, ६६,६७ |
| श्री.श्री.बा.आचार्य | १९४८ ते ५२, ५४,७८ | श्री.श्री.म.मराठे | १९६१ ते ६३, ७०, ७१, ७८ | श्री.वि.भा.वैद्य | १९५५ ते ५६, ६८, ६९ |
| श्री.वि.ल.चाफेकर | १९५७ ते ६० | श्री.अ.श्री.भडकमकर | १९६४ ते ६५ | | |
| श्री.अ.बा.वाळिंबे | १९७२ ते ७८ | श्री.चिं.रा.वेलणकर | १९७८ | श्री.वि.दि.वाघ | १९७९ ते ८० |
| | १९९६ ते २००१ | श्री.बा.ग.जोशी | १९९४ ते ९५ | श्री.अ.भा.कुबेर | १९८६ ते २००९ |
| श्री.वि.गो.कुलकर्णी | २००३ ते २००४ | श्री.बा.ग.जोशी | २००३ ते २०१३ | सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर | २००४ ते २०१३ |
| श्री.मधुसूदन पत्की | २०१० ते २०१३ | | | | |




श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज

हिमालयाच्या साथीला सह्याद्री धावला
अन् महाराष्ट्राच्या शौर्यगाथेने इतिहास घडवला.




**मा.यशवंतराव चव्हाण**
जन्मशताब्दी निमित्ताने विनम्र अभिवादन !

# अध्यक्ष



श्री.सी.व्ही.दोशी



श्री.दिनकरराव शालगर
विश्वस्त समिती अध्यक्ष



श्री.युवराज पवार
उपाध्यक्ष

## ।। कार्यकारी मंडळ सदस्य व विश्वस्त समिती सदस्य ।।


श्री.बा.ग.जोशी
कार्यवाह


सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर
कार्यवाह


श्री.मधुसूदन पत्की
कार्यवाह


श्री.अजित कुबेर
सदस्य


डॉ.श्याम बडवे
सदस्य


डॉ.राजेंद्र माने
सदस्य


श्री.प्रदीप कांबळे
सदस्य


सौ.लता लेले
सदस्य


श्री.रविंद्र झुटींग
सदस्य


सौ.कुंदा कुलकर्णी
सदस्य


ॲड.श्री.गिरीश कुलकर्णी
विश्वस्त समिती सदस्य


श्री.संभाजीराव शेळके
विश्वस्त समिती सदस्य


सौ.प्रज्ञा मुळे
विश्वस्त समिती सदस्य


श्री.अमित कुलकर्णी
विश्वस्त समिती सदस्य

## ।। कार्यकारी वर्ग ।।



सौ.रूपाली मुळे
ग्रंथपाल



सौ.वर्षा कोडगुले
सहाय्यक ग्रंथपाल



श्री.पु.व.कुलकर्णी
लेखनिक



सौ.भाग्यश्री शिंदे
रोखपाल



श्री.माधव सरमोकदम
लेखनिक



श्री.विष्णू धावडे
लेखनिक



सौ.सुप्रिया जोगळेकर
लेखनिक



सौ.अन्वेषा कलेढोणकर
हंगामी लेखनिक



श्री.विजय दळवी
शिपाई



आकाश शेडगे
शिपाई कर्मचारी



सौ.वृंदा नारकर
हंगामी शिपाई

## ।। श्रोतृ वर्गाची उपस्थिती ।।



शतकोत्तर सुवर्ण महोत्सव श्रोतृवर्ग



मोफत वाचन विभाग बालवर्ग उपस्थिती



कार्यक्रमात रंगलेले श्रोते

# श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय शतकोत्तर हीरक महोत्सव सोहळा

दि. २ व ३ फेब्रुवारी २०१३

## ॥ एक अविस्मरणीय सोहळा ॥

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय शतकोत्तर हीरक महोत्सव सोहळा म्हणजे वाचनालयाच्या इतिहासातल सोनरी पान ! दि. २ व ३ फेब्रुवारी २०१३ रोजी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्षानिमित्ताने नूतनीकरण करण्यात आलेल्या इमारतीचा उद्घाटन समारंभ मा.आमदार श्री.छ.शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी मा.खासदार श्री.छ.उदयन्राजे भोसले यांच्या शुभेच्छापर संदेश पत्राचे वाचन कार्यकारिणी सदस्य डॉ.शाम बडवे यांनी केले. सायं. ५ वाजता मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. त्याचे मुख्य अतिथी होते लोकसत्ताचे संपादक श्री.गिरीश कुबेर ! मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलकुरू डॉ.स्नेहलता देशमुख या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. प्रारंभी सौ.स्वरदा राजोपाध्ये यांच्या 'जय शारदे वागेश्वरी' या गीताने वातावरण भारुन गेले. त्यानंतर वाचनालयाचे अध्यक्ष श्री.सी.व्ही.दोशी यानी प्रास्ताविकात वाचनालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यानंतर वाचनालयाचे सदस्य डॉ.राजेंद्र माने यांचा त्यांनी लिहिलेल्या 'न लिहिलेली आत्मकथा' या कथा संग्रहाला लोकमतचा अक्षर रंग साहित्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल महोत्सवाचे मुख्य अतिथी लोकसत्ताचे संपादक मा.श्री.गिरीश कुबेर यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर वाचनालयाचे ज्येष्ठ सेवक श्री.वैद्य, श्री.साठे, श्री.शं.दा.कुलकर्णी, तसेच ज्येष्ठ वाचक सभासद श्री.मालुसरे आणि बाल विभागात येणारे गुणवंत विद्यार्थी चि.यज्ञेश गुजर व कु.प्राजक्ता पाटील या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर रंग भरला तो कवीसंमेलनाने. त्याचे अध्यक्षस्थान स्वीकारले होते ते ज्येष्ठ कवी आणि गझलकार श्री.प्रदीप निफाडकर यांनी आणि या शिवाय श्री.लक्ष्मीकांत रांजणे, श्री.अनिल बोधे, श्री.रमझान मुल्ला, श्री.प्रमोद कोपर्डे हे कवी या कार्यक्रमाचे विशेष अतिथी होते. साताऱ्यातले अनेक नामवंत कवी-कवयित्री या संमेलनात सहभागी झाले. सामाजिक कविता आणि भाव कविता रसिकांच्या मनात भरुन राहिल्या.या कार्यक्रमाचा शेवट करताना श्री.प्रदीप निफाडकर यानी आपली 'माझी मुलगी' ही कविता सादर केली. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्र संचालन कवी श्री.प्रदीप कांबळे यांनी केले.

रविवार दि. ३ फेब्रुवारी रोजी श्री.हिम्मत पाटील आणि रवींद्र कोकरे यांनी आपल्या बहारदार कथाकथनाने सर्वांना प्रभावित केले. यानंतर सुप्रसिध्द सामाजिक कार्यक्रर्ते आणि ज्येष्ठ लेखक डॉ.अनिल अवचट यांची मुलाखत डॉ.राजेंद्र माने आणि डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर यांनी घेतली. त्यांनी अनेक विषयाना स्पर्श करीत ही मुलाखत रंगवली. त्यांच्या बासरी वादनाने या मुलाखतीचा शेवट झाला.

सायं. तिसऱ्या सत्राची सुरुवात झाली ती श्री.अभय देवरे, कु.पूजा सबनीस व श्री.अमित शेलार यांच्या कथाकथनाने. श्री.देवरे हे साताऱ्यातील सिध्द हस्त कथाकथनकार ! त्यांनी रसिकांची मने न जिंकली तरच नवल ! कु.पूजा सबनीस हिची हिराक्का आणि श्री.अमित शेलार यांच्या ग्रामीण कथेत उभे राहिलेले वातावरण रसिकांच्या पसंतीस उतरले. समारोपाच्या प्रमुख पाहुण्या होत्या डॉ.सौ.वीणा देव. तर अध्यक्ष होते प्रा.मिलिंद जोशी. समारोप सत्रात उपाध्यक्ष श्री.युवराज पवार यांनी प्रास्ताविक केले.

वाचनालयाच्या नूतनीकरणास मोलाचे सहकार्य करणारे श्री.नरेंद्र दळवी, श्री.आढाव,श्री.रमेश शर्मा,श्री.जाधव,श्री.शेखर हसबनीस, लोकमंगल मुद्रणालयाचे श्री.विवेक देशपांडे, श्री.शिळमकर यांचा या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या भाषणात सौ.वीणा देव यांनी वाचन संस्कृतीचे मोठेपण सांगितले तर प्रा.मिलिंद जोशी यांनी ग्रंथालयाचे महत्त्व सांगताना ग्रंथालयीन कार्यकर्ते ही निर्माण झाले पाहिजेत ही अपेक्षा व्यक्त केली.

सौ.स्वरदा राजोपाध्ये यांच्या पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम चिरस्मरणीय झाला ! आणि वाचनालयाच्या सेवक वर्गाने केलेल्या परिश्रमांमुळेच हा कार्यक्रम यशस्वी झाला.

दि. २ व ३ फेब्रुवारी २०१३

## ।। एक अविस्मरणीय सोहळा ।।



वाचनालयाच्या नूतनीकरण केलेल्या
वास्तूचे उद्घाटन करताना
मा.आ.श्री.छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले.



शतकोत्तर हीरकमहोत्सव मुख्य कार्यक्रम प्रसंगी
ज्येष्ठ पत्रकार श्री.गिरीश कुबेर व डॉ.स्नेहलता देशमुख,
श्री.सी.व्ही.दोशी, श्री.दिनकरराव शालगर,
श्री.युवराज पवार




कवी संमेलन अध्यक्ष ज्येष्ठ कवी
श्री.प्रदीप निफाडकर सोबत श्री.लक्ष्मीकांत रांजणे,
श्री.अनिल बोधे,श्री.रमजान मुल्ला,
श्री.प्रमोद कोपर्डे,श्री.प्रदीप कांबळे

# श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय शतकोत्तर हीरक महोत्सव सोहळा

## ।। एक अविस्मरणीय सोहळा ।।

दि. २ व ३ फेब्रुवारी २०१३



कथाकथन करताना श्री.रवींद्र कोकरे
सोबत श्री.हिम्मत पाटील




ज्येष्ठ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते
डॉ.अनिल अवचट यांची प्रकट मुलाखत घेताना
डॉ.राजेंद्र माने व डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर




कथाकथन करताना
श्री.अभय देवरे



शतकोत्तर हीरकमहोत्सव समारोप प्रसंगी
ज्येष्ठ लेखिका डॉ.सौ.वीणा देव व प्रा.मिलिंद जोशी,
सोबत श्री.सी.व्ही.दोशी, श्री.दिनकरराव शालगर,
श्री.युवराज पवार

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री.सी.व्ही. दोशी | ........... | अध्यक्ष |
| श्री.युवराज पवार | ........... | उपाध्यक्ष |
| श्री.बा.ग. जोशी | ........... | कार्यवाह |
| डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर | ........... | कार्यवाह |

## कार्यकारी मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित भा. कुबेर | | |
| श्री.मधुसूदन पत्की | | |
| डॉ.राजेंद्र माने | | |
| श्री.प्रदीप डे. कांबळे | | |
| सौ.लता लेले | | |
| डॉ.शाम बडवे | | |
| श्री.रविंद्र झुटिंग | ........... | (स्वीकृत सदस्य) |
| सौ.कुंदा कुलकर्णी | ........... | (स्वीकृत सदस्य) |

## विश्वस्त समिती

| | | |
|---|---|---|
| श्री.दिनकर पां. शालगर | ........... | अध्यक्ष |
| श्री.मधुसूदन पत्की | ........... | कार्यवाह |
| श्री.संभाजीराव शेळके | ........... | सदस्य |
| श्री.प्रज्ञा मुळे | ........... | सदस्य |
| श्री.गिरीश पं. कुलकर्णी | ........... | सदस्य |
| श्री.अमित कुलकर्णी | ........... | (स्वीकृत सदस्य) |

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | आणि ग्रंथोपजिवियें | श्री.म.वि.कोल्हटकर | ११ |
| २) | आण्णा मी आणि वाचन | प्रा.अजित पाटील | १४ |
| ३) | नगरवाचनालय : एक संस्कार देणारी पाँठशाळा | प्रा.डॉ.शाम बडवे | १७ |
| ४) | शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना.... | श्री.शिरीष चिटणीस | १९ |
| ५) | संदर्भ ग्रंथ | श्री.दासू वैद्य | २१ |
| ६) | पुस्तक श्रीमंत करतं ! वाचन घडवतं ! | श्री.पुरुषोत्तम शेठ | २२ |
| ७) | आशकमस्त फकिराचे वाचनवेड | सौ.वीणा देव | २५ |
| ८) | ग्रंथालय तुमच्या गावी | श्री.संभाजीराव पाटणे | २७ |
| ९) | प्रेम : ग्रंथांचे आणि ग्रंथपालाचे | श्री.प्रवीण दवणे | ३० |
| १०) | एका जगप्रसिद्ध ग्रंथालयात | अरुणा ढेरे | ३२ |
| ११) | श्री.श्री.बा.आचार्य यांच्या आठवणी | श्री.अ.अ.वैद्य | ३७ |
| १२) | या पुस्तकात दडलय काय ? | श्री.अ.अ.वैद्य | ३८ |
| १३) | इथे ग्रंथाच्या पानांसोबत पंख ही मिळतात | श्री.प्रदीप कांबळे | ३९ |
| १४) | आणि ग्रंथोपजीवियें इये विशेषी लोकी इथे | श्री.विद्याधर पुरुषोत्तम गोखले | ४१ |
| १५) | माझा बालपणीचा सर्वात जवळचा जिवलग मित्र | श्री.दत्तप्रसाद दाभोळकर | ४३ |
| १६) | आपली वाचन संस्कृती | श्री.किशोर बेडकिहाळ | ४५ |
| १७) | गाव तेथे ग्रंथालय आणि ग्रंथालय चळवळ | सौ.नंदा जयसिंग जाधव | ४९ |
| १८) | मुक्काम पोस्ट नगर वाचनालय, सातारा | सौ.कुंदा कुलकर्णी | ५१ |
| १९) | असा बालगंधर्व... | श्री.अभिराम भडकमकर | ५३ |
| २०) | संतसाहित्य आणि आजची पिढी | प्रा.मिलिंद जोशी | ५६ |
| २१) | वाचनसंस्कृती, वाचनाभिरुची आणि वाचनालय | श्री.मधु नेने | ५८ |
| २२) | तापली आहे वसुंधरा ! | श्री.अजित साळुंखे | ६१ |
| २३) | शब्दप्रभू ग्रंथप्रेमी : यशवंतराव चव्हाण | श्री.रविंद्र बेडकीहाळ | ६३ |
| २४) | मराठी गझलेचा प्रवास | श्री.प्रदीप निफाडकर | ६५ |
| २५) | बालवाङ्मय, बालवाचक आणि तुम्ही आम्ही | डॉ.राजेंद्र माने | ६८ |
| २६) | ज्ञान आणि वाचनसंस्काराचे मध्यवर्ती केंद्र | अशोक वाळिंबे | ७० |

शुभेच्छा

डॉ.रामचंद्र चिंतामण ढेरे

**Dr. Ramchandra Chintaman Dhere**

८ जानेवारी २०१३

सस्नेह नमस्कार.

सातारा येथील 'श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह राजे भोसले(थोरले) नगरवाचनालय, सातारा' ही ख्यातकीर्त संस्था शतकोत्तर हीरक महोत्सव साजरा करीत आहे, ही घटना माझ्यासारख्या ग्रंथप्रेमी अभ्यासकाच्या दृष्टीने अत्यंत आनंददायी आहे. सातारा ही श्रीमंत शंभुछत्रपतींच्या सुपुत्राने-शाहु छत्रपतींनी भूषविलेली राजधानी. या नगरीने मराठी सत्तेचा परमोत्कर्ष अनुभवलेला आहे. ग्रंथ आणि ग्रंथकार यांचा परिपोषही या नगरीत होत राहिलेला आहे. स्वतः श्रीशंभुराजे थोर ग्रंथकार होते; अर्थात् त्यांची स्मृतीही आजच्या आणि उद्याच्या ग्रंथकारांसाठी नितांत प्रेरक ठरणारी आहे. श्रीशिवछत्रपतींपासून थोरल्या प्रतापसिंह-छत्रपतींपर्यंतची महान् परंपरा आपल्या संस्थेच्या शतकोत्तर हीरक महोत्सवाच्या आयोजनात स्मृतिरूपाने जागी आहे, अशी माझी सार्थ श्रद्धा आहे. या संस्मरणीय घटनेच्या निमित्ताने नगरवाचनालयास माझ्या उदंड शुभेच्छा!

आपला ग्रंथमग्न स्नेही

रामचंद्र चिंतामण ढेरे

328, 'VIDISHA', Tulshibagwale Colony, 4th Lane, Sahakarnagar, No.2, Pune - 411 009.

Tel.: +91 20 24220280 Website : www.rcdhere.com

# मनोगत

आपल्या वाचनालयाचा शतकोत्तर हीरक महोत्सव साजरा करत असताना अतिशय समाधान वाटत आहे. आपले वाचनालय सातत्याने विचारांचे प्रबोधन करण्याचे कार्य करत आहे, सध्याच्या गतिमान युगात दूरदर्शनच्या आक्रमणाने वाचन संस्कृतीवर आघात होईल अशी भिती वाटत होती. परंतु समाज वाचन संस्कृतीपासून अजिबात दूर गेला नाही. उलट वाचन संस्कृती जोपासली जात आहे. वाचनाची भूक वाढत आहे. सातार्‍यातील ग्रंथ प्रदर्शने व तेथील ग्रंथांची विक्री हे त्याचे निदर्शक आहे. आपल्या वाचनालयात नवीन प्रसिध्द झालेल्या पुस्तकांना सतत मागणी असते. वाचनालयाच्या सभासद संख्येतही वाढ होत आहे, हे सर्व वाचनसंस्कृतीला पोषकच आहे. आज आपल्या वाचनालयात सुमारे ९०,००० ग्रंथ आहेत. आणि सुमारे २३०० सभासद आहेत. वाचनालयात अनेक जुने दुर्मिळ ग्रंथ आहेत. त्यांची देखभाल करणे, जपणूक करणे हे आपल्या सेवकांपुढे एक आव्हान आहे.

डिसें. २००३ मधे आपल्या वाचनालयाचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव झाला. त्यानंतर गेल्या दशकात वाचनालयात अनेक बदल झाले. वाचनालयाचे 'श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय' असे नामांतर करण्यात आले. हे वाचनालय महाराजांच्या व्यक्तिगत संग्रहातून सुरु झाले असल्याने त्यांचे नाव वाचनालयाला देण्यात आले, तेव्हा सर्व सातारकरांनी त्याला मनापासून पसंती दिली.

बदलत्या काळाला अनुसरुन वाचनालयाचे संगणकीकरण करण्यात आले. तसेच टच् स्क्रीनही बसवण्यात आला. पाठक हॉल मधे सीसी टीव्ही बसवण्यात आला आहे. घरोघरी असणारी जागेची टंचाई, भारनियमन या अडचणी लक्ष्यात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे. वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री.युवराज पवार यांच्या प्रयत्नाने वाचनालयाची वेबसाईट तयार झाली आहे. त्याचा लोकार्पण सोहळा सुप्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ.मोहन आपटे यांच्या हस्ते व ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

महाराष्ट्र शासनाकडून वाचनालयाला मिळणारे अनुदान आणि सभासद वर्गणीतून वाचनालयाचे कामकाज चालवले जाते. अर्थात हे उत्पन्न पुरेसे नाही याची जाणीव आहे. परंतु तरीही आपण आपल्या सेवकांसाठी पेंन्शन योजना सुरु केली आहे. अशी योजना करणारे हे महाराष्ट्रातील एकमेव वाचनालय आहे.

वाचनालयात विविध प्रकारचे उपक्रम सतत चालू असतात. लोकांमधे वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून वाचक व्यासपीठ हा उपक्रम गेली १५ वर्षे चालू आहे. त्यामध्ये कथाकथन, काव्यवाचन, लेखकांच्या प्रकट मुलाखती, पुस्तक प्रदर्शने, पुस्तक प्रकाशने यासारखे कार्यक्रम होतात. याशिवाय शारदीय व्याख्यानमाला, शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा, नाथषष्ठी असे अनेक उपक्रम होत असतात.

यामधे वाचनालयाचे संचालक डॉ.राजेंद्र माने, सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर यांचे सहकार्य लाभते.

वाचनालयाच्या पूर्व भागातील सभासदांची गैरसोय लक्ष्यांत घेऊन आपण सदरबझार येथे वाचनालयाची शाखा सुरु केली आहे. तेथे सुमारे ४५० सभासद आहेत. ही संख्या वाढती असल्याने तेथे जागा अपुरी पडते. सर्व प्रकारची पुस्तके तेथे ठेवता येत नाहीत. त्याचप्रमाणे कोणत्याही मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करता येत नाही. सातारा नगरपरिषदेकडे आम्ही अशी विनंती केली आहे की आम्हाला सदरबझार विभागात जागा उपलब्ध करुन मिळावी. वाचनालयाच्या गरजेनुसार आम्ही तेथे इमारत उभी करु शकलो, तर ते नगर परिषदेला श्रेय नक्कीच मिळेल.

२५ वर्षापुर्वी वाचनालयाचे अपुरे बांधकाम आम्ही आपणा सर्वांच्या सहकार्यामुळेच पूर्ण करु शकलो. आताही शतकोत्तर हीरक महोत्सवानिमित्त वाचनालयाच्या इमारतीचे नूतनीकरण सुरु आहे. यामधे टाइल्स बसवणे, रंगकाम, फर्निचर, विद्युतव्यवस्था याचा अंतर्भाव आहे. या सर्व कामात श्री.दिनकरराव शालगर, श्री.बा.ग.जोशी यांचे खूप मोठे सहकार्य लाभते. या कामातला बराचसा खर्चाचा भार साताऱ्यातील अनेक आर्थिक संस्था, उद्योजक, वाचनालयाचे सभासद हितचिंतक यानी उचलला आहे. याबद्दल सर्वांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत !

शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्षानिमित्त मुख्य कार्यक्रम आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे यशस्वी झाला. श्री.प्रदीप कांबळे, डॉ.माने, सौ.कुंदा कुलकर्णी, सौ.प्रज्ञा मुळे, सौ.लता लेले या सर्वांनी मनापासून परिश्रम घेतले. वाचनालयाच्या सेवक वर्गानेही या कार्यक्रमासाठी खूप मेहनत घेतली. तसेच छपाईकाम, मंच सजावट याकामी श्री.शेखर हसबनीस, श्री.राजेंद्र पाचवडकर, श्री. अमोल दरडी यांचे सहकार्य लाभले त्यांनाही धन्यवाद !

आपण सर्वांच्या सहकार्यामुळे वाचनालयाने खूप प्रगती केली आहे. अजूनही खूप काही मिळवायचे आहे, पण आपले वाचनालय अवघ्या महाराष्ट्रात सवोत्तम ठरावे हीच इच्छा आहे.

आपण सर्व रसिकांनी वाचनालयावर प्रेम केले, जिव्हाळा दाखविला. यापुढेही तो असाच मिळत रहावा, त्यायोगे आपले वाचनालय सदैव प्रगतीपथावर रहावे, ही देवी सरस्वतीच्या चरणी प्रार्थना !

धन्यवाद !

**श्री.सी.व्ही.दोशी**

अध्यक्ष

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले)

नगर वाचनालय सातारा.

# वाचन संस्कृती

## ग्रंथ

ग्रंथ कोंडून ठेवू नका कपाटात सुरक्षित
नको पहाऱ्यावर तुसड्या चेहऱ्याचे रखवालदार
जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते
कपाटाच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुडदे

प्रत्येक ग्रंथ म्हणजे असते एक निमंत्रण
कधी झपूर्झाचे कधी हिरव्या हिरव्यागार गालिच्यांचे
निळ्या आभाळात उडू लागतात शुभ्र विचारांचे पक्षी
तेव्हा उगवते इंद्रधनुष्य मनाच्या क्षितीजावर

ग्रंथपाल हसतो तेव्हा ग्रंथालय होते एक बाग
न कोमेजणाऱ्या असंख्य फुलांनी बहरलेली
ग्रंथ सुखाने फिरू लागतात हिरव्या कुरणांवरून
हाक घालतात लहान मुलांसारखे उचलून घेण्यासाठी

जेव्हा हुकूमशाही आवळते गळ्याभोवती फास
तेव्हा ग्रंथच पेरतात तिच्या ठिकऱ्या करणारे सुरूंग
शोषणाच्या अंधारात ग्रंथच होतात नवे सूर्य
जुलमांचे समुद्र ग्रंथ पिऊन टाकतात अगस्तीसारखे

ग्रंथालयातले ग्रंथ भेटले पाहिजेत माणसांसारखे
मोकळ्या हवेत नव्या नव्या जाणिवांच्या
ग्रंथांच्या स्पर्शाने पायातल्या बेड्या तुटोत
ग्रंथांच्या स्पर्शाने भिंतीचे आकाश बनो.

**-मंगेश पाडगावकर**
**(भटके पक्षी, पृ.८३)**
(संग्रहीत शतकोत्तर सुवर्णमहोत्सव २००३ मधून)

# ।। वाचनालयाच्या व्यासपीठावर मान्यवर ।।






ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.जयंत नारळीकर



श्री.निनाद बेडेकर (पुणे)
इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक



प्रा.माधव वझे



श्री.गिरीश प्रभुणे



श्री.अभिराम भडकमकर
बालगंधर्व चित्रपटाचे लेखक व प्रसिद्ध नाटककार,अभिनेते



डॉ.अरूणा ढेरे



प्रा.मिलिंद जोशी
महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह



सौ.शोभा भागवत

## ।। वाचनालयाच्या व्यासपीठावर मान्यवर ।।



सुसंवादिनी सौ.मंगला खाडिलकर



डॉ.कल्याणी नामजोशी
(पुणे)



डॉ.मा.गो.धडफळे



ॲड.सौ.अपर्णा रामतीर्थकर
(सोलापूर)



डॉ.विश्वास मेहेंदळे ज्येष्ठ माध्यमतज्ञ



श्री.मधु नेने ज्येष्ठ समीक्षक

# ।। पुस्तक प्रकाशन ।।



डॉ.राजेंद्र माने यांच्या 'वहिनीसाहेब' या कादंबरीचे प्रकाशन करताना डॉ.अरूणा ढेरे



सौ.वासंती घाडगे यांच्या नर्मदातीरी या पुस्तकाचे प्रकाशन करताना श्री.देवधर, श्री.खाजगीवाले सोबत-श्री.जोशी,डॉ.माने.



डॉ.संदिप श्रोत्री यांच्या 'एव्हरेस्टच्या पायथ्याशी' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ.रघुनाथ गोडबोले,एव्हरेस्टवीर श्री.सुरेंद्र चव्हाण, डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर



डॉ.राजेंद्र माने यांच्या 'मनातल' व 'चिरेबंदी' या पुस्तकांचे प्रकाशन करताना प्रा.डॉ.राजन गवस, श्री.विश्वास दांडेकर,प्रदीप कांबळे, श्री.दिनकरराव शालगर

# ।। मनोगते व प्रकट मुलाखती ।।




'माझ्या अभिनयाचा प्रवास' कथन करताना ज्येष्ठ अभिनेते (कै.)श्री.प्रभाकर पणशीकर सोबत-श्री.सी.व्ही.दोशी




जागतिक ग्रंथालय दिनानिमित्त व्याख्यान ''आवर्जून वाचाविशी वाटणारी पुस्तके'' वक्ते-श्री.रवींद्र पिंगे, सोबत-प्राचार्य पुरूषोत्तम शेठ,श्री.अशोक वाळिंबे




प्रकट मुलाखत अभिनेते डॉ.गिरीश ओक सोबत-सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर,डॉ.राजेंद्र माने



अभिनेते श्री.महेश कोठारे व नाटककार श्री.अभिराम भडकमकर यांची प्रकट मुलाखत घेताना सौ.कोल्हटकर,श्री.पद्माकर पाठकजी, डॉ.माने,सोबत-श्री.सी.व्ही.दोशी



ज्येष्ठ लेखिका सौ.उमा कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत घेताना सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर व सौ.श्यामला काकडे



डॉ.आनंद यादव सोबत-डॉ.राजेंद्र माने,श्री.मधू नेने

# संपादकीय..

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयाचे हे शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्ष ! त्या निमित्ताने ही स्मरणिका आपल्या हाती देताना अतिशय आनंद वाटतो. समाजात वाचन संस्कृती रुजवण्यासाठी वाचनालयात अनेक उपक्रम सुरु असतात.

'शब्दांचा हा खेळ मांडला तुझ्या कृपेने ईश्वरा' असे म्हणत अनेक सरस्वती उपासक आपल्या साहित्यसेवेने तिचा दरबार संपन्न करत असतात. त्यांच्याच अक्षरांचा हा गौरव !

ही स्मरणिका तयार करताना खूप सुखद अनुभव आले. अनेक मान्यवरांनी अतिशय मौल्यवान असे साहित्य पाठवले. साताऱ्यातल्या अनेक साहित्यप्रेमींनी उत्स्फूर्तपणे हा अंक सजवला. साताऱ्यातल्या अनेक आर्थिक संस्था, व्यापारी वर्ग, वाचनालयाचे हितचिंतक यांनी या स्मरणिकेसाठी आर्थिक सहकार्य केले.

वाचनालयाचा सेवक वर्ग नेहमीच तत्पर असतो. त्या सर्वांनी अतिशय आपलेपणाने ही स्मरणिका तयार करण्यासाठी परिश्रम घेतले. श्री. शेखर हसबनीस यांनी यथोचित असे मुखपृष्ठ तयार करुन दिले, प्रिंट ओमचे श्री. संदेश शहा व टाईप इनोव्हेटर्सचे श्री. प्रशांत गुजर यांनी छपाईची जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

वाचनालयाचे अध्यक्ष श्री. सी. व्ही. दोशी, उपाध्यक्ष श्री. युवराज पवार, कार्यवाह श्री. बा. ग. जोशी, विश्वस्त समितीचे अध्यक्ष श्री. दिनकरराव शालगर आणि सर्व संचालक यांनी स्मरणिकेसाठी अतोनात परिश्रम घेतले आहेत.

लोककल्याणाचा वारसा घेऊन श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) यांनी सुरु केलेल्या या वाचनालयाची ही परंपरा पुढे अशीच चालू राहील ती केवळ आपल्या सर्वांच्याच सहकार्याने ! ते सदैव लाभावे हीच प्रार्थना.

डॉ. सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर
संपादिका

## अभिप्राय



*आयुष्य हे देण्यासाठी आहे. घेण्यासाठी नाही.*

*या वाचनालयात जे पाहून समाधान आहे त्यावरून मला वरील ओळ सुचली.*

*१२५ वर्षे या संस्थेने वरील कार्य निर्विघ्नपणे पार पाडले. आणखी १०० वर्षे सुध्दा ही संस्था हेच कार्य करीत राहिल अशी आशा आहे.*

**(राजा गोसावी)**

---

*१२५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने साजऱ्या केल्या जाणाऱ्या समारंभास आज उपस्थित राहण्याची व या निमित्ताने वाचनालयाची पाहणी करण्याची संधी मिळाली. सव्वाशे वर्षापूर्वी सातारकरांच्या ग्रंथालयाची गरज लक्षात घेऊन कार्यवाही करणाऱ्या कै. राजे प्रतापसिंह व त्यांच्या कुटुंबियांना अभिवादन.*

*उत्तम ग्रंथसंपदा, विविध मासिके, वृत्तपत्र व कार्यभावी वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा संच हे ग्रंथालयाचे वैशिष्ट्य दिसते. हे कार्य अखंड सुरू ठेवले पाहिजे.*

*या प्रयत्नांना माझ्या शुभेच्छा !*

**(शरद पवार)**

---

*आज दि. १२ एप्रिल १९८० रोजी नगरवाचनालय सातारा या संस्थेचे दर्शन घेण्याचा योग आला. "उद्याच्या महाराष्ट्राचे जागते वैचारिक केंद्र म्हणून फार मोठ्या अपेक्षेने मी सातारा शहराकडे पहातो. त्या अर्थाने या संस्थेवर फार मोठी जबाबदारी आहे. मी मनापासून या संस्थेला सुयश चिंतितो."*

**(शिवाजी सावंत)**

---

*आज रोजी नगरवाचन मंदिरास भेट दिली. श्री. आचार्य यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने नेत्रदिपक प्रगती होते आहे.*

**(ना.सं. इनामदार)**

---

*अनेक पूर्वस्मृतींनी संपन्न अशा या स्थानी पुन्हा येण्याचा योग आला. माझ्या साहित्य साधनेत या नगर वाचन मंदिरास तीर्थाचे स्थान आहे. वाचन मंदिराचा बदलता आकृतिबंध आकर्षक वाटला.*

*आचार्यांना धन्यवाद !*

**(प्राचार्य शिवाजीराव भोसले)**

---

*आज सोम. दि. २४/०७/८९ रोजी, वाचक मेळाव्या निमित्ताने सार्वजनिक वाचनालय, सातारा येथे भेट देण्याचा योग आला. एकशे चाळीस वय असलेलं हे वाचनालय आजही तारूण्याने सळसळते आहे, आणि अनुभवदृष्ट्या मात्र ते वयोवृध्द आहे !*

*अशा वाचनालयास भेट देणं हा एक सुंदर भाग्ययोग.*

*वाचनालयाच्या दोनशेव्या वर्षी आपणच सारे पुन्हा एकत्र जमू, या शुभेच्छांसह*

**(सुहास शिरवळकर)**



# आणि ग्रंथोपजिविये

श्री.म.वि.कोल्हटकर

रेशमी वस्त्रात हरिविजय, भक्तिविजय, पाण्डवप्रताप, असे धार्मिक ग्रंथ कोनाड्यात पूर्वी ठेवले जात. आंघोळ केल्यानंतर त्यांची भक्तिभावाने पूजा होत असे. लहानपणी खेडेगावात ग्रंथांची पूजा करणारी अशी अनेक घरे मी पाहिली आहेत, चातुर्मास सुरु झाला की सामान्यपणे अशा ग्रंथांचे वाचन सुरु होई. या वाचनाला 'ग्रंथ लावणे' असेही म्हटले जाई. भागवतासारख्या ग्रंथाची पूजा, आरती होते आणि समाप्तीनंतर सवाद्य मिरवणूकही निघते.

अशा धार्मिक ग्रंथांचे वाचन, प्रवचन, कीर्तन अगदी शांतपणे डोळे मिटून ऐकत राहणे मला नेहमीच आवडत आले आहे. या ग्रंथाच्या पहिल्या पानावर हंड्या, झुंबरे, पताका यांनी युक्त अशी देवाच्या दरबाराची ढोबळ चित्रे मला मोहिनी घालतात.

इयत्ता नववीच्या इंग्रजी पुस्तकात 'पुस्तके' या विषयावर मला वाटते रॉबर्ट खाउदे या नावाच्या कवींची सुंदर कविता होती. या कवितेतील दोन ओळी माझ्या अद्याप स्मरणात आहेत. कवी पुस्तकांबद्दल म्हणतो 'माय नेव्हर फेलिंग फ्रेंण्डस् आर् दे विथ हूम आय् कॉन्हर्स डे बाय डे' मला कधीही अंतर न देणारे ग्रंथ हे माझे मित्र आहेत. मी रोज रोज त्यांच्याशी बोल असतो. !

ग्रंथाच्या वाचकाला कुठलेच क्षेत्र निषिध्द नसते. ग्रंथ वाचकाला इंद्राच्या दरबारात, महालात, कल्पवृक्षाखाली, कामधेनूच्या आमने सामने, नरकाच्या काठाकाठाने, यक्षकिनरांच्या भूमीत सर्वत्र घेऊन जातात. ते गुदगुल्या न करताही त्याला स्वत: स्वत:शी हसायला लावतात, त्याचा.श्वास रोखतात, कापरे भरवतात, डोळ्यातून टिपे गाळायला लावतात असे वाटते. वर्ग ही याचा संपूच नये. ग्रंथ ही एकांतात रममाण होणारी क्रीडा आहे. हे अहोभाग्य कंगालालाही लाभते.

सन ७३ सालापर्यंत माझ्या अव्याहत मुक्काम सातान्यात होता. पुढे माझ्या बदल्या होत गेल्या. ७३ सालापर्यंत मी प्रतापसिंह नगर वाचनालयाचा सभासद होतो. 'राजवाड्यापुढे' आणि 'वाचनालय' हे खरे तर सातारा शहराचे केंद्रबिंदू. वाचनालयात गेलो नाही असा माझा एकही दिवस गेला नाही. भक्कम काळ्याकरंद दगडी तोडींची अशा बुरुजाचा त्रास वाटणारी वाचनालयाची मजबूत इमारत होती. वर दबदबा वाढावा असे पाठक भवन होते. इथे किती तरी दिग्गजांची व्याख्याने मी गॅलरीत टाचा उंच करुन तास नू तास उभे राहून ऐकली आहेत. त्या व्यासपीठाचा थाक एवढा होता की सभागृह रिकामे असताना सुध्दा व्यासपीठावर जाऊन उभे राहण्याची हिंमत तेव्हा होत नसे.

पाठक भवनाकडे जाणारा जिना लाकडी होता. जिन्याखाली चिंचोळ्या जागेत ग्रंथपाल श्रीयुत गो.ना.साने यांचे ऑफिस होते. भेदक, घारे डोळे, अंगात जाकिट, मिश्किल बोलणे, वळणदार हस्ताक्षर, मार्मिक

टीकाटिपणी करणारे हे गृहस्थ मला नेहमी नवीन पुस्तके कोणती आली आहेत याची वर्दी देत. त्यावेळी घरी पुस्तके नेण्यासाठी मासिक वर्गणी चार आणे व डिपॉझीट रुपये दोन होते. आगटे, पानसे, वाळिंबे असे या ग्रांथिक व्यवहारात असून नसणारे काही सेवक इथे होते. त्यांची व्यक्तिमत्वे संस्मरणीय होती.

कानांची तहान पाठक भवनात झडणारी व्याख्याने भागवीत तर डोळ्यांची भूक पुरातन वाचनालयातली पुस्तके शमवीत. अगदी शाळेत असताना बिरबल बादशहा, तेनालीराम, भोज कालिदास, जावयांच्या गोष्टी हे माझे अत्यंत आवडते विषय. त्याआधी इसाप, पंचतंत्र, हितोपदेश, गोड गोष्टी, हा सगळा 'कोर्स' प्राथमिक शाळेत समाप्त झाला होता. नंतर अर्नाळकर नावाचे पिसे मला लागले. (त्याकाळी बिनाका गीतमाला, तंबूतले सिनेमे, मेळे अशी पिसाटक्षेत्रे कितीतरी होती.) नंतर हरी नारायण आपटे यांचे उषःकाल व इतर पुस्तके नाथ माधव, वि.ना.हडप यांच्या कादंबऱ्या, इंग्रजी भयकथा, जेम्स हार्डीच्या आमोणी बाज असणाऱ्या कादंबऱ्या असे अस्मादिकांचे पुढे पुढे पदार्पण होत गेले. माडगूळकर बंधूंचे सारे लेखन म्हणजे एक साक्षात्कार आहे. कारण माडगूळकर बंधूंच्या कादंबऱ्यांचे परिक्षेत्र हे कुंडल गावच्या आसपास असे जिथ माझे बालपण गेले होते. या सगळ्या मैफलीत तीन पुस्तकांची गोडी अद्याप अक्षुण्ण आहे. पुनः पुनः वाचनात नवनवा आनंद देणारी ती तीन पुस्तके म्हणजे रामायण महाभारत आणि शिवचरित्र. तसे पाहू जाता लेखकाचे साहित्य हे त्या लेखकाचे नारदीय ऐसपैस पसरलेले आत्मचरित्र असते. लेखक नाना प्रकारची वेशभूषा घेऊन लपाछपी खेळत, त्याच्या साहित्यातून प्रकट होत असतो. माडगूळकर बंधूंच्या साहित्यातून ते असेच अगदी आडपडदा न ठेवता प्रगट होत गेले आहेत.

मूळ साताऱ्याचे रहिवासी पण मुलुखगिरी गाजवणारे कितीतरी लेखक आहेत. मला जवळून दर्शन झाले ते वि.वा.हडप, कृ.के.कोल्हटकर, गजेंद्रगडकर घराण्यातले आचार्य आणि त्याज्या दमाचे शिलेदार रा.शं.दातार, पद्माकर गोवईकर वगैरे.

त्याकाळी मासिके, साप्ताहिके यांचीही धमाल होती. गल्ली गल्लीत, ऑफिसा ऑफिसात सर्क्युलेशन लायब्ऱ्यांची दंगल होती. विशिष्ठ मासिकासाठी उड्या पडत. बाचाबाची होत, विलंब शुल्क लागू केले जाई, मासिकातल्या हीरोंची नावे स्टाफमधल्या कैकांना प्रदान केली जात.

त्याकाळी मासिकांची धूम किंवा लाटच उसळली होती. गंमत म्हणजे भिन्नरुचिही लोकाः हे ध्यानी घेऊन कित्येक संस्थानी तीन तीन प्रकारची मासिके काढली होती. ते तिळ्यांचे युग होते. किर्लोस्करांची तीन मासिके - किर्लोस्कर, मनोहर, स्त्री, अंतरकरांची हंस, मोहनी, नवल पां.र.अंबिके यांची माया,माणिक, माधुरी, याशिवाय सराफांचे त्रिकूट. माधव कानिटकरांचा त्रिशुल अशा कितीतरी तिळ्यांची तेव्हा जन्म घेतला. काहींनी मासिक काढले आणि साप्ताहिकाच्या खडावाही वापरात आणल्या. तो काळ श्रीमंतीचा वैभवाचा होता. लेखकांची घराणी होती तशी नियतकालिकांचीही कुळे होती. आपापल्या कुलपरंपरा ही नियतकालिके जपायची. अगदी छोट्या गावातही साप्ताहिकेनिघाली. वाङ्‌मयीन वाद गाजले. डरकाळ्या फोडणारे वाघसिंह जन्माला आले. तोफा उडाल्या. फटकळपणाची मराठी परंपरा न सोडणारे वीर जन्माला आले. स्पुटनिक सोडणारे आचार्य अत्रे धूमशान गाजवीत राहिले.

ज्याला त्याला आपले अपत्य साजिरे गोजिरे वाटत असते. खुले आम बाजारात त्याची सूरत तपासून पाहणे डूब असते. ट्यूब, लाइटच्या प्रकाशात, विक्रेत्याचे नखरे पाहून एखादे कापड आपल्याला फारच शोभून दिसेल असे वाटते, किंवा साडीचा मोरपंखी पदर आपल्या लावण्याला बहार आणील असे वाटते. ते कापड, तो पदर, तो नग जरा उचलून, रस्त्यावरच्या प्रकाशात आणला की मगच त्याचे खरे स्वरुप कळू शकते. लेखक नावाच्या कलावंताला प्रारंभीच्या काळात आपले लेखन बेमिसाल वाटते. तो स्वतः स्वतःवर निहायत खूष असतो. या नर्सिसस् कॉम्प्लेक्समधून त्याला लौकरात लौकर बाहेर काढणे इष्ट असते. त्याचे नव्या धारेचे लेखन चावडीवर जाहीर करणे इष्ट असते, विसाव्या शतकाच्या मध्यात असे आखाडे निर्माण झाले होते. तिथे आपल्या कलाकृतीची कठोर चिकित्सा होई. तो व्यवहार विधायक मैत्रीपूर्ण होता. त्यात संपादक-लेखक यांचा संवाद होई. मार्गदर्शन केले जाई. एक एक स्क्रिप्ट अनेकवेळा लिहावे लागे. सत्यकथा आणि मौज प्रकाशन हा एक असाच अलौकिक आखाडा होता. या आखाड्याच्या मातीत मळलेले अनेक दिग्गज लेखक आहेत. सत्यकथेने जवळजवळ शतक मध्यात नावारुपाला आलेली समज मराठी लेखकांची एक पिढीच घडवली असे म्हटले तर ते वावगे ठरु नये.

आता तो जमाना संपला, मासिके, साप्ताहिके, यांना मरगळ आली आहे. जी काही अस्तित्व सांभाळून आहेत त्यांचे स्वरुप पाहिले तर वाईट वाटते. कीव येते. कारण हक् आणि श्रुति माध्यमानी लेखणीला अवकळा आणली आहे. नवनवे अंकुर जन्मास येत आहेत. ते या माध्यमांच्या दरबारात पोचूच शकत नाहीत. लॅपटॉप् नावाचे बालक ज्याच्या त्याच्या मांडीवर खेळत आहे. ध्रुव बाळाला त्यांना कटवले आहे.

सांप्रत ग्रंथ प्रकाशन व्यवहाराला विविध ग्रहण लागले आहे. पूर्वी लेखकाला रॉयल्टी मिळत नसे. आता लेखकाला प्रकाशकाकडे पैसे

ओलावे लागतात. आता पगारांऐवजी पॅकेजचा जमाना आहे. त्यामुळे कुणीही उठतो १०० प्रती घ्या १०,००० रुपये द्या असे सोपे गणित मांडतो. त्यामुळे बाजारात सवंग आणि निकस माल भरतो आहे. दृकश्राव्य माध्यमानी डोळे दिपून जाण्याची ही अवस्था आहे. ती स्थिती पालटणार आहे. पालटत आहे. मुद्रणमाध्यमाला आपली मुद्रा सापडणार आहे.

साहित्यिकांनीही काही आत्मचिंतन करायला हवे. पुस्तके किती प्रकाशित झाली यावरुन तो साहित्यिक आहे की नाही हे ठरवले जाऊ नये. उत्तम वक्ते, उत्तम कीर्तनकार, उत्तम तमासगीर हेही श्रेष्ठ साहित्यिकच आहेत. ते तर आपली पदवी पुनः पुनः सिध्द करीत असतात. नवनवे उच्चांक नोंदवीत असतात. त्यांची गणना साहित्यिकातच व्हायला हवी. सन्मान, पुरस्कार यासाठी त्यांचाही विचार साहित्यिक म्हणूनच व्हायला हवा. स्वतंत्र लेखन त्याप्रमाणे स्वतंत्र कॅसेटसना पुस्तकाचा दर्जा द्यायला हवे. साहित्य निर्मिती व्यवहाराचे क्षितीज विस्तार पावले पाहिजे.

साताऱ्च्या प्रतापसिंह वाचनालयाने १५० वर्षे पूर्ण केली आणि एक उंच शिखर त्याने गाठले आहे. विशेष म्हणजे अगदी जुन्यात जुनी दीडशे वर्षे वय सांगणारे ग्रंथ या वाचनालयाच्या कपाटात विराजमान आहेत. ही श्रध्दा आहे. ही तपस्या आहे. ज्या कार्यकर्त्यांनी हे उज्ज्वल कार्य केले त्यांचे आपण ऋणी रहायला हवे.

जुना मध अधिकाधिक औषध गुणसंपन्न असतो. गाईचे तूप जितके जुने तितकं अधिक गुणकारी असते. जुनेजुने फोटो अधिकाधिक मोलाचे असतात. कारण ते न बोलता खूप खूप बोलतात. त्याप्रमाणे जुन्यात जुनी पुस्तके ती वाचण्यात फार मोठा आनंद असतो. ती पुस्तके घड्याळाचे काटे उलट फिरवतात. आपल्याला भूतकाळात नेतात.

साताऱ्याचे हे वाचनालय नुसते वयाने मोठे नाही. कर्तृत्वानेही फार मोठे आहे. वाचनाची गोडी वाढवण्यासारखे हे वाचनालय नाना उपक्रम विलक्षण श्रध्देने चिकाटीने करीत आहे. या वाचनालयाचा काठपदर सदैव गजबजलेला असतो. पुस्तकांसाठी क्लेम लावले जातात. जुने अंक विकत घेतले जातात. वाचक-व्यासपीठ नावाचा अलौकिक उपक्रम चैतन्यशील (व्हायब्रंन्ट) वातावरणात घडत असतो. नवनव्या पुस्तकांची प्रकाशने थाटामाटात, वाजतगाजत रांगोळ्यांचे गालिचे काढून, नंदादीप प्रज्वलित करुन पुस्तकांची प्रकाशने होतात. ताज्या दमाचे दमदार लेखक इथे व्यासपीठावर आणले जाऊन त्यांचा वाचकांशी संवाद घडतो. कित्येक लेखक आपण होऊन विचारले नसले तरी उद्गारतात, सातारचे वाचनालय वाचन- लेखन संस्कृतीचे संगोपन-संवर्धन करण्यासाठी जे कार्य करीत आहे ते अन्यत्र कुठे आठवत नाही. विशेषकरुन शहरातल्या शाळांमधून मुलांच्या कथाकथन, लेखन अशा स्पर्धा घेऊन विविध पुरस्कार देऊन, ग्रंथ प्रदर्शने भरवून कुण्ड, हा होम धगधगत ठेवण्याचे त्यांचे कार्य अलौकीक म्हणावे लागेल. ज्या उमेदीने, कल्पकतेचे आणि निष्ठेने सांप्रतचे वाचनालयाचे कार्यकारी मंडळ हे कार्य करीत आहे. त्याल अवघ्या महाराष्ट्रात तोड नसावी असे वाटते. त्यांचे हे काम पथदर्शक आहे.

❖ ❖ ❖ ❖

*आज रविवार दि. ९ सप्टें. १९९० रोजी '१८५७ स्वातंत्र्य समर' ह्या विषयासंबंधी विवेचन करण्याच्या निमित्ताने ग्रंथालयास/वाचनालयास भेट दिली. सेवाभावी वृत्तीने चाललेले वाचनालयाचे कामकाज जनप्रबोधनाच्या दृष्टीने अतिशय मोलाचे आहे.*

*अधिक यश लाभो ही प्रार्थना !*

**(शं.ना. नवलगुंदकर, पुणे)**



# आण्णा मी आणि वाचन

**प्रा.अजित पाटील**

तेव्हा मी सहावीत असेन, आण्णांना (म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील) रोज सकाळी सकाळी ताजी वर्तमानपत्रे लागत. त्यावेळी उपलब्ध असलेली सर्व वर्तमानपत्रं आण्णा घेत. आण्णा ती सर्व वर्तमानपत्रं अगदी हेडलाईन पासून ते छोट्या जाहिरातीपर्यंत काळजीपूर्वक वाचून काढत. कुणी गरजू नोकरीसाठी यालाच तर त्याला ती जाहिरात दाखवून अर्ज करायला सांगत. आम्ही चौघं भावंडं मी, अनिल, जयश्री आणि मोहन. मी त्यावेळी सर्वात मोठ्या असल्यानं थोडा समजूतदार होतो. वर्तमानपत्र वाचतेवेळी आण्णा मला बोलावून घेत आणि वर्तमानपत्रातले अग्रलेख मोठ्यानं वाचायला सांगत. सहावीतलं वय हे अग्रलेख समजण्याइतपतचं वय नक्कीच नव्हतं. मला ते अग्रलेख समजतंही नसत. अगदी बोअरिंग वाटत. मग मी चरफडत वाचे. आण्णांना ते समजे. ते म्हणते, 'हे बघ मी तुला अग्रलेख वाचायला सांगतो याचं महत्व तुला पुढ समजेलं. मग आण्णा मला अग्रलेख समजून देवू लागले आणि मला वर्तमानपत्राची आवड निर्माण झाली. ती मी गोडीनं वाचू लागलो आणि येवढेच नव्हे तर आण्णांच्या अगोदर मी वर्तमानपत्रावर झडप घालू लागलो. पुढं आण्णांचं म्हणणं खरं ठरलं. बारा गावचं पाणी न पिता ही मी वाचनं प्रगल्भ झालो. जीवनाची सगळी अंग मला समजू लागली. माझं वाचन पुढं शाळेपर्यंत पोहाचलं. शाळेनं माझी बातमी मंत्री म्हणून नेमणूक केली. मग मी वर्तमानपत्रातल्या राजकारण विरहीत विरहीत बातम्या लिहून घेऊन शाळेतल्या फळ्यावर लिहू लागलो. मग त्या वाचण्यासाठी मुलांची झुम्मड उडू लागली. येवढच काय तर शिक्षकही माझ्याकडं, 'काय पाटील आज विशेष काय ?' म्हणून विचारत, त्या वेळी सर्वसामान्यांकडच काय पण शिक्षकांकडही वर्तमानपत्र येत नसत. त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नात ती बसत नसत. माझी वाचनातली घोडदौड बघून आण्णांनी शिवाजी कॉलेजचे ग्रंथपाल वाडकर यांना बोलावून घेतलं आणि सांगितलं की 'वाडकर याला चांगली पुस्तक वाचायला देत चला.' नंतर मी दर उन्हाळ्याच्या सुटटीत मोठी पिशवी घेवून बसनं शिवाजी कॉलेजच्या ग्रंथालयात जात असे आणि पिशवीभर पुस्तकं घेऊन येत असे आणि ती अधाशासारखी वाचत असे.

आण्णांच्यानंतरही हा पायंडा तसाच पुढं राहिला तो अगदी नोकरीच्या निवृत्तीपर्यंत. प्राध्यापक असताना शिवाजी, धनंजयराव गाडगीळ आणि यशवंतराव इन्स्टिट्यूट ऑफिसच्या ग्रंथालयांची दार मला स्वर्गाची दारं वाटत.

आता निवृत्त झाल्यावर कॉलेजकडं मी फारसा फिरकत नाही. पण डॉ.राजेंद्र मान्यांनी मला नगर वाचनालयाचं लाईफ मेंबर करुन घेतलय त्यानं ही उणीव फारशी जाणवत नाही. आजही मी रविवारची महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, सकाळ, पुढारी, लोकमत, ऐक्य आदी वर्तमानपत्रं विकत घेतो. त्यांच्या पुरवण्यावर दोन चार दिवस छान जातात.

आमच्या सोमवारातल्या घरी आण्णांच्या सेवेसाठी बोर्डिंगमधली मुलं असत. मला पाटील हा त्या पैकी एक अवलिया होता. त्याला बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथा वाचायचा नाद होता. तो नाद त्यानं मलाही लावला. आण्णाचं आम्ही काय वाचतो, काय करतो, आम्ही काय खातो.

आमचे मित्र कोण कोण आहेत याकडं बारकाईनं लक्ष असायचं. असच एक दिवस मी रहस्यकथा वाचताना आण्णांना सापडलो. त्यांनी विचारलं,

'काय वाचतो रे !'

'पुस्तक.'

'आण बघू.'

मी त्यांच्याकडं पुस्तक दिल. तसं त्यांनी चाळलं आणि सुनावलं.

'या पुढं रहस्यकथा वाचायच्या नाहित.'

'बरं !' मी घाबरुन म्हणालो.

पुन्हा रहस्यकथा वाचताना पुन्हा मी आण्णांना सापडलो. तसं आण्णा संतापून मला म्हणाले.

'तुला एकदा सांगितलेलं कळत नाही---- ? आण ते पुस्तक.'

मी ते पुस्तक आण्णांच्या हातात दिलं. तसं आण्णानी ते संतापून फाडून टाकलं.'

पण रहस्यकथा वाचणं ही एक नशा असते. चार आठ दिवस गेल्यावर मी आण्णा गावाला कधी जातात हे पाहू लागलो. आण्णा नेहमीच फिरतीवर असायचे. मग आण्णांच्या अनुपस्थितीत माझं रहस्यकथा वाचन जिवंत राहू लागलं. पण एक दिवस नशिब बिघडलं. फिरतीवर जाणार म्हणून गेलेले आण्णा न जाता घरी परतले आणि मी सापडलो. तसं संतापानं थरथरत आण्णा ओरडले.

'तुला मराठीत सांगितलेलं समजत नाही ?'

आण्णा संतापानं कापत होते आणि मी भीतीनं कापत होतो. पण आत हुकमाचा एक्का माझ्या हातात होता. मी सगळा धीर एकवटून म्हणालो.

'आण्णा यात गैर काय आहे ?'

'मला उलट विचारतोस...?'

'आण्णा यशवंतराव चव्हाणं सुध्दा रहस्यकथा वाचतात.

'कुणा गाढवानं सांगितलं?'

'गाढवानं नाही वर्तमानपत्रांनी सांगितलय.'

'आण बघू.'

मग मी रद्दीतून तो सकाळ हुडकून आणला आणि तो आण्णांच्या स्वाधीन केला. त्यात यशवंतरावांनी सांगितलं होतं की जेव्हा जेव्हा राजकारणाचा ताण त्यांच्यावर पडे तेव्हा तेव्हा तो तो कमी करण्यासाठी ते बाबूराव अर्नाळकर वाचत. आण्णा गप्प झाले. पण त्यानंतरही मी रहस्यकथा वाचताना आण्णाना अनेकदा सापडलो पण आण्णा कधीच काही बोलले नाहीत. बाबूराव अर्नाळकरांच्या सर्वच्या सर्व एक हजार रहस्यकथा मी वाचल्या आहेत. अर्नाळकरांच्या सुबोध, आणि निर्मळ शैलीचा प्रभाव माझ्या लिखाणाच्या शैलीवर पडला आहे असं म्हटलं तरी चालेल.

पुढं आण्णांनी मला चरित्रं वाचायला सांगितली. ते मला आवडलं आणि आवडतंही. अगदी आजही ग्रंथालयात गेल्यावर कुणाचंही चरित्र काउंटरवर दिसलं तरी त्यावर मी झडप मारतो. या चरित्र वाचताना मी काही फक्त थोरा मोठ्यांचीच चरित्र वाचतो. खरं सांगायचं तर तीच मला जास्त भावून जातात. त्यांची दुःख, त्यांच्या अडचणी, त्यांच्या आर्थिक परिस्थित्या, त्यांना तोंड द्यावी लागलेली संकटं बघून त्यांच्यापेक्षा आपलं नक्कीचं बरं आहे ही भावना सुखावून जाते.

माझ्या वाचनात आलेल्या पुस्तकात अरुण साधूंचं मुंबई दिनांक आणि कर्नल मनोहर माळगावकरांचं वादळवाटा ही दुसऱ्या बाजीरावावर आणि नानासाहेब पेशव्यांच्या जीवनावरचं पुस्तक मला प्रचंड आवडली. मुंबई दिनांक हे त्या वेळच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवरच ओघवत पुस्तक आहे. हे पुस्तक मी घरी आणल्यावर वडिलांनी ते सहज चाळलं. त्यांना ते आवडलं. त्यांनी ते रात्री दहाला वाचायला घेतले आणि पहाटे पाचला पूर्ण केल्यावरच ते झोपले. सिंहासन नावाचा मराठी चित्रपट मुंबई दिनांक आणि सिंहासन या दोन कादंबऱ्यावर बेतला आहे. पुपुल जयकराचं इंदिरा गांधीच्यावरचं राखून राखून लिहिलेल पुस्तक आवडलं. पण त्यापेक्षा ब्रिटीश पत्रकार कॅथेरिन फ्रँकचं खुल्लम खुल्ला लिहिलेलं पुस्तकजाम आवडलं. तिचं मेहता प्रकाशननं मराठीत अनुवाद केलेलं पुस्तक एकदम झकास आहे. सुधीर फडक्याचं अर्धच लिहिलेलं चरित्र आवडलं त्यांच्या चिरंजिवानी श्रीधर फडक्यानी ते पूर्ण करावं अस आवर्जून वाटत.

तसच महाराणी गायत्री देवीच 'अ प्रिन्सेस रिमेंबर्स' हेही एक झकास पुस्तक आहे. महाराणी विजयाराजे शिंदेंच अपुर चरित्रही झकास. तसच रागिणी पुंडलिक, पाध्ये यांची पुस्तकही चांगली आहेत. जयश्री गडकर, लिला चिटणीस, भालजी पेंढारकर, शांताराम, विजय आनंद, दादा कोंडके, संगीतकार राम कदम, ना.घ.देशपांडे यांची चरित्रही चांगली

आहेत. दादा कोंडक्यांचं अनिता पाध्यांनी लिहलेल चरित्र दणकेबाज आहे. आनंद यादवाची, तीनही चरित्रात्मक पुस्तकं एक्सलंट या स्वरुपात मोडणारी आहेत.

गंमत सांगायची म्हणजे कर्नल मनोहर माळगावकराचं प्रिन्सेसच त्यांनीच मराठीत केलेलं रुपांतर आणि ना.सी.फडक्यांनी लिहिलेलं एक होता राजकुमार ही दोन्ही पुस्तकं एकाच वेळी वाचनात आली. ती कोल्हापूरच्या छत्रपती शहाजी महाराजांच्यावर लिहीली आहेत अस बोललं जातं.पण गंमत म्हणजे दोन्ही पुस्तकात नव्वद टक्के साम्य आहे. फरक आहे तो फक्त फक्त पात्रांच्या नावात. मनोहर माळगावकरांची इंग्रजी आवृत्ती अमेरिकेत गाजली तिथं तिला मोठे पुरस्कार मिळाले. पण दोन्ही पुस्तकात कमालीच साम्य आहे हे मात्र खर.

इतरही अनेक चांगली पुस्तकं वाचून झालीत. पण आता ती नीटशी आठवत नाहीत. माणसाला पुस्तकासारखा सच्चा दोस्त नाही हेच खर सत्य.

❖ ❖ ❖ ❖

*आज ग्रंथालयास भेट देण्याचा योग लाभला. ग्रंथालयाने नवीन इमारत बांधली असून अनेक नवे उपक्रम योजिले आहेत. हे ग्रंथालय साताऱ्यातील एक सांस्कृतिक केंद्र व्हावे, यासाठी शासनाने व जनतेने आर्थिक व अन्य प्रकारचे साहाय्य केल्यास ग्रंथालयास चांगले प्रोत्साहन मिळू शकेल.*

**(डॉ.यू.म. पठाण)**

---

*एकशे चाळीस वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या सातारा नगर वाचनालयाला ग्रंथ प्रदर्शनाच्या निमित्ताने भेट देता आली, याचा आनंद वाटतो. लेखक आणि वाचक यांच्या भेटीचे ठिकाण या दृष्टिने ग्रंथालयांना सांस्कृतिक जीवनात महत्वाचे स्थान आहे. या संस्थेचे पदाधिकारी ग्रंथालयाच्या विकासासाठी जे निष्ठेने परिश्रम करीत आहेत ते पाहून त्यांच्या कार्याबद्दल विशेष आदर वाटला.*

*सातारा नगर वाचनालयाला हार्दिक शुभेच्छा !*

**(वि.स. वाळिंबे)**

---

*आज येथील 'नगर वाचनालय' ह्या विख्यात सेवाभावी संस्थेला - ज्ञानाच्या पाणपोईला - भेट देण्याचा सुयोग प्राप्त झाला. वाचनालयांत उत्तम ग्रंथ-संग्रह आहे; पण त्याहूनही उल्लेखनीय आहे 'लोक-संग्रह' !*

*कार्यकर्त्यांत शिस्त नि एकजूट दिसून आली. मी ह्या संस्थेला चढते वाढते यश चिंतीतो.*

**(विद्याधर गोखले)**

# ।। मनोगते व प्रकट मुलाखती ।।




श्री.दामू अण्णा दाते यांची प्रकट मुलाखत
सोबत–श्री.सी.व्ही.दोशी,सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर



प्रा.प्रवीण दवणे,शेजारी डॉ.राजेंद्र माने,
डॉ.सौ.कोल्हटकर



नगर वाचनालयातपर्फे आयोजित वाचक व्यासपीठ
या कार्यक्रमात प्रसिद्ध कादंबरीकार श्री.बाबा कदम यांची
मुलाखत घेताना डॉ.बाळासाहेब माजगांवकर व प्रा.श्रीधर साळुंखे




सुप्रसिद्ध लेखिका मीना प्रभू सोबत–
सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर,सौ.प्रज्ञा मुळे




वाचक व्यासपीठ (९८–९९) श्री.गंगाधर महांबरे यांची
प्रकट मुलाखत घेताना डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर
व श्री.पद्माकर पाठकजी




महिला दिन विशेष–महिला प्रकाशकांच्या व्यथा सांगताना
सौ.देवयानी अभ्यंकर (कॉण्टिनेन्टल प्रकाशन)
सौ.सुनिताराजे पवार (संस्कृती प्रकाशन)
सौ.शशिकला उपाध्ये (चंद्रकला प्रकाशन)

## ।। काही अविस्मरणीय ।।



ज्येष्ठ अभिनेते (कै.) श्री.चित्तरंजन कोल्हटकर यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी सोबत श्री.अजय देवी




शतकोत्तर सुवर्णमहोत्सव प्रसंगी प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचा सत्कार करताना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे. सोबत– श्री.सी.व्ही.दोशी नगराध्यक्षा सौ.रंजना रावत उपनगराध्यक्ष श्री.शंकर माळवदे



वाचनालयाचे उपाध्यक्ष (कै.) श्री.बा.आचार्य यांचा सत्कार करताना कुलगुरू (कै.) श्री.देवदत्त दाभोळकर व गुरूवर्य (कै.) श्री.म.स.आपटीकर



'शतकोत्तर सुवर्णमहोत्सव' प्रसंगी वाचनालयाचे ज्येष्ठ सभासद श्री.बबनराव उथळे यांचा सत्कार करताना ज्येष्ठ साहित्यिक श्री.मधू मंगेश कर्णिक सोबत श्री.अजित कुबेर

# ।। काही अविस्मरणिय ।।




डावीकडून श्री.बा.आचार्य,डॉ.द.शि.एरम,
श्री.सुभाषराव जोशी,श्री.सी.व्ही.दोशी



कै.दादा वाडीकर स्मृती व्याख्यानमालेसाठी
देणगी देताना ॲड.श्री.मनोहर वाडीकर,आणि कुटुंबीय
सोबत– श्री.सी.व्ही.दोशी,श्री.राजेंद्र चोरगे,
श्री.राजेंद्र माने,सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर



महाराष्ट्र शासनाचे विशेष अनुदान स्वीकारताना
कार्यवाह श्री.अजित कुबेर,श्री.विद्याधर कुलकर्णी




भारतपाक सीमेवर अतिरेकी हल्ल्यात जखमी झालेले
लेफ्ट.केदार भिडे अनुभव कथन करताना सोबत
श्री.सी.व्ही.दोशी, प्राचार्य श्री.बरबडेकर,केदार भिडे
यांची आई सौ.मेघा व वडील श्री.दत्तात्रय भिडे.




## ।। काही अविस्मरणिय ।।

ग्रंथमहोत्सवात द्वितीय पारितोषिक विजेता
वाचनालयाचा चित्ररथ



ग्रंथदिंडीत पालखी खांद्यावरून नेताना
संचालक डॉ.बडवे,श्री.जोशी,श्री.कांबळे



सुप्रसिद्ध लेखिका सौ.वीणा गवाणकर
यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी



वाचनालयाचा वेबसाइट लोकार्पण सोहळा
हस्ते– डॉ.मोहन आपटे,डॉ.दत्तप्रसाद दाभोळकर
श्री.सी.व्ही.दोशी,श्री.युवराज पवार व इतर



# नगरवाचनालय : एक संस्कार देणारी पाठशाळा

प्रा.डॉ.शाम बडवे

शतकोत्तर हिरकमहोत्सव साजरा करीत असणाऱ्या या श्रीमंत छ.प्रतापसिंह महाराज(थोरले) नगरवाचनालयात मला माझ्या अल्पशा ज्ञानाने कार्यात आहे याचा अभिमान वाटतो.

माणसाला विकसित होत असताना अनेक संस्कारांची गरज असते. त्यामधे वाचन संस्कार, श्रवण संस्कार, सहवास संस्कार यांचे वेगळे महत्व आहे. या तीनही संस्कारामुळे माणसामधे दीसामाजी उन्नयन होते यात शंकाच नाही. हे तीनही संस्कार देण्याचे उत्तरदायित्व समस्त सातारकरांसाठी आपल्या नगरवाचनालयाने स्वीकारलेले आहे. त्यामुळेच सातारकरांसाठी ही संस्कार पाठशाळाच आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये. वाचनालयात असणारी एक लाख पुस्तके तर वाचकांना भरभरुन देत आहेतच. रोज नवनवीन ग्रंथांची त्यात भर पडत असते. तसेच वाचकांनी सुचवलेली पुस्तके खरेदी केली जातात. वाचकांच्या सूचनांचा आदर यामधे साध्य होतो. वाचक व्यासपीठ ही आगळी वेगळी संकल्पना वाचनालयाने जोपासलीय यामधे दर महिन्याला कमीतकमी एक कार्यक्रम असतो हे त्याचे वैशिष्ट्य ! यामधे ज्येष्ठ लेखक, कवि, पत्रकार, रंगकर्मी, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, उद्योजक यांना बोलावून त्यांचे विचार सर्व श्रोत्यांपर्यंत पोहोचवले जातात. लेखक पुस्तकांतून आपल्याला भेटतात. पण त्यांचे विचार प्रत्यक्ष त्यांना भेटून मिळणे हे संस्कारांसाठी खचितच वेगळेपण आहे. त्याने सहवास व विचारांचे आदान प्रदान साधले जाते. अशा प्रति भावंताना भेटणे ही वेगळीच पर्वणी असते. या वाचनालयात फक्त व्याख्यानेच नव्हे तर उदयोन्मुख कवि लेखक यांच्या पुस्तकांच्या प्रकाशनाचेही कार्यक्रम केले जातात. ते सुध्दा दिग्गज साहित्यकारांच्या हस्ते ! त्यामुळे त्यांच्या साहित्यकृती बदलाच्या कल्पना नवीन लेखक कवींना मार्गदर्शक ठरतात. वाचन संस्कृतीच्या अशा वेगळ्या संकल्पना यामुळेच महत्वाच्या वाटतात. शारदीय व्याख्यानमाला हीसुध्दा वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेने आयोजित केली जाते. कै.गुरुवर्य दादा वाडीकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ ही व्याख्यानमाला आयोजतानाही वेगळे उपक्रम आयोजण्यात येतात. यामधे सुध्दा चित्रपट, नाटक, संगीत, विज्ञान, वैद्यकीय, संस्कारक्षम अशा व्याख्यानांचे आयोजन केले जाते. त्यामुळे अभिरुची संपन्नता श्रोत्यांमध्ये जागृत होते. यामधे किर्तन प्रवचनांचाही समावेश असतो. विनोदी कथाकथन, कविता वाचन, नाट्यवाचन, सामाजिक समरसता, प्रथितयश डॉक्टरांच्या मुलाखती, शास्त्रज्ञांची व्याख्याने हा त्याचाच एक भाग होय. माझ्या वैयक्तिक आयुष्यात नगरवाचनालयाच्या कार्यक्रमांमुळे माझ्या मनाच्या उन्नयनाचे वेगळे संस्कार झालेत ज्यामुळे मला ज्ञानसंपन्नता आल्याचा आनंद मिळतोय.

संत साहित्याचा मानवी मनावर वेगळाच संस्कार होतो त्यासाठी तुकाराम बीज, एकनाथ षष्ठी यादिवशी त्यांच्या साहित्यांवर अभंग, ओव्या, श्लोक, भारुडे, कवने यांच्यावरही कार्यक्रम सादर केले जातात. सामाजिक प्रश्नांचे भानही वाचनालयास आहे त्यासाठी मानसिक विकार व त्यांची उत्तरे, दारुबंदी,

अंधश्रध्दा व रुढी परंपरा, स्त्रीभ्रूण हत्या या विषयावरही तज्ञांची व्याख्याने आयोजित करुन वाचकांच्या जाणीवा समृध्द करण्याचे काम वर्षभर केले जाते. बालवयापासून वाचनाची गोडी लागावी असे संस्कार व्हावेत म्हणून उन्हाळ्याच्या सुट्टीत लहान मुलांसाठी मोफत वाचनालय चालवले जाते. त्यामधे एक महिनाभर पुस्तके वाचून त्यांचे परीक्षण एका वहीत लिहून घेतले जाते. त्यामध्ये सतत एक महिनाभर येणाऱ्या वाचकास एक पुस्तक भेट स्वरुपात दिले जाते. विद्यार्थ्यांसाठी शांत वातावरणात अत्यल्प शुल्कात अभ्यासिकाही येथें आहे. बालवयापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत शिक्षणानुसार, वयानुरुप, आवडी प्रमाणे असे कार्यक्रम आयोजित करुन हे वाचनालय सातारकरांची सेवा करीत आले आहे. आता इतर वेबसाईट वरुन सर्व माहिती प्रसारीत केली जाते. व ई मेलवरुन सर्वांना आपल्या सूचना व मार्गदर्शन देता येण्याची सोय केली जात आहे. २ फेब्रुवारी १३ पासून नवीनतम अशा स्वरुपातले हे वाचनालय आपल्या सेवेसाठी परत तत्पर होत आहे. त्याची रचना आपल्याला निश्चीतच सुखावेल, आपल्यावर संस्कारांची बरसात करेल हे नक्की ! म्हणूनच म्हणावेसे वाटते की हे केवळ वाचनालय ग्रंथालय नसून संस्कार देणारी पाठशाळाच आहे जणू !

❖ ❖ ❖ ❖

*आज भाषणाच्या मुलाखतीच्या निमित्ताने वाचनालयाला भेट दिली. श्रोतृवृंद उत्तम वाटला. दिवसेंदिवस सांस्कृतिक कार्यक्रमांची पिछेहाट होत असलेली असत असताना हे वाचनालय नमुनेदार काम करीत आहे. शुभेच्छा.*

**(रवींद्र पिंगे)**

---

*लहानपणी नियमितपणे ह्या संस्थेत येत असे. विद्यार्थी दशेतील नगर वाचनालय आणि आताचे खूपच फरक जाणवला. कुणीतरी वाहून घेतल्याशिवाय अशा संस्था उभ्या रहात नाही हे प्रकर्षाने जाणवते. श्री.आचार्य हल्लीचे अध्यक्ष श्री.दोशी आणि त्यांचे सहकारी ह्यांचा सिंहाचा वाटा आहे हे नमूद करावेसे वाटते.*

*संस्थेच्या पुढील वाटचालीस 'कराड अर्बनचा' सहभाग असेल अशी ग्वाही देतो.*

**(द.शि. एरम, कराड अर्बन बँक)**

---

*बहि:शाल शिक्षणमालेनिमित्त येथें आलें असता वाचनालयात हिंडून सर्व इमारत पाहिली. वरच्या मजल्यावर ज्ञान वितरणासाठी सभा व खाली ज्ञानाचीं साधने ही व्यवस्था मोठी नामी आहे. रोजची दैनिके व मासिकपुस्तके पुरवून चालक चालक लोकांस वाचावयाची आवड उत्पन्न करीत आहे. इतर सर्व खोल्यांपेक्षा बाल वाचन विभागात बाल वाचकांची गर्दी पाहून मोठे कौतूक वाटले. पण सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे कॉलेजमध्यें जरुर पडणारी पुस्तके खरेदी करुन विद्यार्थ्यांची केलेली सोय दिवसेंदिवस सामान्य विद्यार्थ्यांस सर्व पुस्तके विकत घेणे कठीण होत चालले आहे. तेव्हा ही पाठ्य पुस्तकांची सोय करुन शिक्षण प्रसारास वाचनालय फार मोठी मदत करीत आहे.*

**(कमलाबाई देशपांडे)**



# शतकोत्तर हीरक महोत्सवी वर्ष साजरे करताना....

श्री.शिरीष चिटणीस

डॉ.विश्वास मेहेंदळे मला एक दिवस असे म्हणाले की, मला नगर वाचनालयामध्ये व्याख्यानासाठी का बोलावित नाहीत हे समजत नाही. मी माझा बायो-डेटा डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर यांचेकडे दिला आहे. आणि नंतरच्या काळामध्ये डॉ.विश्वास मेहेंदळे यांची वेगवेगळ्या विषयावर ३-४ व्याख्याने नगर वाचनालयाच्या पाठक हॉलमध्ये झाली. मी या संदर्भात अंतर्मुख होऊन विचार केला आणि माझ्या लक्षात आले कि, आपल्या जवळच शेजारी एखादी बाब अशी असते की ज्याची आपणाला किंमत अथवा महत्व काही वेळा लक्षात येत नाही. १६० वर्षाची परंपरा असलेल्या नगर वाचनालयातील पाठक हॉलनी विविध विचारवंतांची, राजकीय महत्वाच्या व्यक्तींची, सामाजिक कार्यकर्त्यांची आणि इतरांची व्याख्याने सातारकरांना दिली. तसेच स्वातंत्र्यपूर्वीच्या काळापासून जे वाचनालय वेगवेगळ्या परिवर्तनाचे साक्षीदार आहे त्या ठिकाणी आपणाला आपले मत व्यक्त करावे असे वाटलेच ! त्यामुळे दिल्लीपासून ते कन्याकुमारीपर्यंत ज्या डॉ.विश्वास मेहेंदळे यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली, एकपात्री प्रयोग केले त्यांना नगर वाचनालयाच्या पाठक हॉलची महती आणि आपले विचार या व्यासपीठावरुन मांडता आले पाहिजेत ही आग्रही भूमिका नक्कीच योग्य होती आणि त्या क्षणापासून माझे श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालयाकडे बघण्याची, चिंतन-मनन करण्याची दृष्टी पूर्णपणे चिंतनात्मक झाली आहे.

मनावर होणार एक उत्तम संस्कार म्हणजे वाचनसंस्कार ! गेली १६० वर्षे हा संस्कार करुन मने समृध्द करण्याचं काम सातारा नगरीतील नगर वाचनालय करीत आहे. एक उच्च दर्जाची सांस्कृतिक परंपरा जपण्याचं काम नगर वाचनालयाने केलं आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशातं साताऱ्याचे नगर वाचनालय प्रसिध्द आहे.

बालवयात गोळ्या-बिस्कीटं चॉकलेटच जेवढं आकर्षण असतं, तितकंच रंगीबेरंगी चित्र असणाऱ्या पुस्तकाचंही अप्रूप वाटतं. मग शब्दांची फुलपाखरं या मुलांना खुणावू लागतात आणि याच वयात नवनवीन शब्दांची गोडी निर्माण होऊ लागते. अशावेळी या बालकांना पुस्तकांच्या सुंदर जगाकडे वळविण्याचे काम पुस्तकं करतात. नगर वाचनालय हे एक असंच पवित्र मंदिर. पुस्तकांच्या दुकानाच्या काचेतून फक्त पहायला मिळणारी रंगीबेरंगी गोष्टींची पुस्तके बालकांना इथं हाताळायला मिळतात. तहान भूक विसरुन मुलं या वाचनालयात बसून पुस्तकांच्या विश्वात रममाण होतात. बडबडगीते, परिकथा, इसापनिती ते अगदी आत्मचरित्र, प्रवासवर्णनापर्यंत सर्व जगाचा फेरफटका इथं होतो.

१४ व्या ग्रंथ महोत्सवामध्ये समारोपाचे भाषण करताना गोव्यामध्ये मराठीची कास धरणारे व मराठीसाठी आपली सर्व ताकद पणाला लावणारे प्रसिध्द कवी व व्याख्याते आमदार विष्णु सुर्या वाघ यांनी असे व्यक्तव्य केले की, मनुष्याच्या आयुष्यात ३० वर्षापर्यंत तो जे जे वाचन करतो ते संगणकासारखे त्यांच्या

मेंदूमध्ये साठविले जाते आणि पुढील काळात त्याला के कधीही आठवते आणि त्या आठवणीने तो लिखाणही करुन शकतो. तसेच त्या त्या विषयांवर व्याख्यानही देऊ शकतो. मला हा लेख लिहावयाचा आहे म्हणून मी माझी पत्नी नयन मंत्रीशी चर्चा करीत होतो तेंव्हा ती आपल्या लहानपणीच्या नगर वाचनालयातील पुस्तकं वाचण्याच्या आठवणीने भारावून गेली. तिच्या लहानपणी घर भवानी पेठेत असल्याने सुट्टी मिळाली की कायम नगर वाचनालयात जाऊन मोफत वाचनालयामध्ये विविध पुस्तके हाताळणे आणि वाचन हा तिचा छंदच झाला होता. मला वाटते तिचे नाटकात, एकांकिकेत काम करणे, कविता करणे, विविध लेखन करणे अथवा पाठांतर असणे हे तिने लहानपणी नगर वाचनालयाशी जी वाचनाची संगत धरली त्याचाच परिणाम असावा. तिच्याकडे जी प्रतिभा आहे ते नगर वाचनालयामध्ये लहानपणी वाचनात घालविलेल्या वेळेचाच परिणाम असावा.

मी स्वत: १९६९ सालापासून साताऱ्याचा रहिवासी आहे. साधारणपणे इ.६वी ते बी.कॉम पर्यंत विविध कारणांनी विद्यार्थी वाचक म्हणून नगर वाचनालयाशी संपर्क होता. त्या काळात नगर वाचनालयाचे कार्यवाह वि.ल.चाफेकर आणि ग्रंथपाल वैद्य हे माझे पेठकरी असल्याने मला नगर वाचनालयाबद्दल जास्त अप्रुप होते. नंतरच्या काळात नगर वाचनालयाची वास्तू नवीन होत असताना मला व्यवसायासाठी त्या ठिकाणी गाळा (शॉप) मिळावे म्हणूनही मी प्रयत्न केले. १९८५ साली मी सातारा नगर परिषदेचा नगरसेवक झाल्यानंतर माझा संपर्क नगर वाचनालयाशी वाढला व वाचनही वाढले.

प्रबोधनकार ठाकरे यांनी लिहिलेली श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) आणि रंगो बापूजी गुप्ते ही पुस्तके नगर वाचनालयातून नेऊनच मी वाचली आणि साताऱ्च्या छत्रपतींच्या गादीचा जाज्वल इतिहास व माहिती यामुळे मी भाराऊन गेलो. नंतरच्या काळात ६६वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ७१ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन यामध्ये नगर वाचनालयाने जेवढी म्हणून मदत करता येईल तेवढी केली. तोच वारसा दरवर्षी ग्रंथ महोत्सवाला लेखक राजेंद्र माने यांच्या माध्यमातून नगर वाचनालयाने कायम ठेवला आहे. अशोक वाळिंबे यांनी मला नगर वाचनालयाचे आजीव सभासद करुन घेतल्यामुळे नगर वाचनालयाच्या भरभराटी मध्ये मला जास्त भावनिक व आत्मिक आनंद मिळत आहे.

❖ ❖ ❖ ❖

*बहि:शाल व्याख्यानांच्या निमित्तानें येथें आलों असता येथील सुप्रसिध्द वाचनालय पहावयास मिळालें व येथील वाचकांची संख्या, विविध वृत्तपत्रें, मासिकें आणि पुस्तकांचा अमाप संग्रह पाहून धन्यता वाटली. दोन्ही तिन्ही वेळां, बाल वाचकांची संख्याही पुष्कळ आढळली. येथील लोकप्रिय झालेल्या या वाचनालयाच्या कार्यक्षमतेचे सर्व श्रेय वाचनालयांच्या कार्यकर्त्यांना द्यावयास पाहिजे. स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि वाचनालयांत पाळावयाच्या सर्व नियमांचे पालन विशेषत्वानें आढळले.*

**(प्रा.प्र.चिं.शेजवलकर,पुणे)**

---

*गेले तीन दिवस मी या वाचनालयात व्याख्यानें देण्यासाठी येत आहे. वाचनालयात वाचन साहित्य विपुल असून वाचकसंख्या ही पुष्कळ आहे. टापटीप, स्वच्छता, पुस्तकें सापडण्याची सुलभता हे गुण दृष्टीस पडले. मी प्रदीर्घ काळापासून साताऱ्यात वारंवार येत असतों व संस्थेची प्रगति प्रत्येक वेळी नजरेस येऊन आनंद वाटत असतो. रा.आचार्य (कार्यवाह) यांस त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल धंन्यवाद देतों.*

**(चिं.वि.जोशी)**



# संदर्भ ग्रंथ

श्री.दासू वैद्य

पुस्तकं खूप असतात
ग्रंथालयात, दुकानात छापखान्यात
कपाटात टेबलावर
आणि रस्त्याच्या कडेला
अस्ताव्यस्त पडलेल्या रद्दीत,
पण हे पुस्तक निराळंच
कधी माझ्या घरात आलं
माहीत नाही,
मी मागितलं
की तू दिलंस आठवत नाही
आता हे पुस्तक अगदी घरातल्यासारखं
घरभर फिरत असतं
टकूटकू दुर्लक्षित करुन
अंथरुणात लोळणाऱ्या
एखाद्या सुप्त स्त्रीसारखं
हे गादीवर लोळत असतं
चष्मा नाकावर घसरला तरी
लेखनात मग्न असणाऱ्या चेहऱ्याच्या
अभ्यासूपणा याच्यात असतो
जेव्हा हे टेबलावर असतं
शाळेतल्या प्रार्थनेसाठी रांगत उभं रहावं तस कधी
शेल्फातल्या पुस्तकात जाऊन बसतं
थंडीत रात्रीत केव्हातरी जाग यावी
तेव्हा पायथ्याशी मांजरीच्या पिलासारखे
हे महाशय माझ्या अंथरुणावर
बसलेले असतात.
याला शेल्फातून कुणी काढलं
अंथरुणावर कुणी ठेवलं माहीत नाही.
एकदा तर हे आपलं खुर्चीत ठेवलेलं
एक वजनदार गृहस्थ आले
आणि सवयीनं खुर्चीत बसू लागले
जवळपास मी ही किंचाळलोच
'अहो खाली पुस्तकय'
अगदी चेंगरलच असतं
त्या गृहस्थांनी पुस्तक हातात घेतलं
चाळलं म्हणाले,
'वाचायला घरी नेऊ का ?'
मी म्हणालो
'हव तर कपाटातली सगळी पुस्तकं न्या
संदर्भ ग्रंथ घरी देता येत नाही'
कारण हे पुस्तक तुझं आहे
तू मला दिलंस
मनात हुरहुरता पाऊस कोसळत असताना.

(तूर्तास मधून)

❖ ❖ ❖ ❖



# पुस्तक श्रीमंत करतं ! वाचन घडवतं !

श्री.पुरुषोत्तम शेठ

नगर वाचनालयासारख्या सांस्कृतिक जीवन समृध्द करणाऱ्या साताऱ्यातील संस्थेला १६० वर्षे पूर्ण होतात, तेव्हा त्या संस्थेच्या संस्थापकापासून त्यांच्या वाढीस हातभार लावणाऱ्या व आज त्याचे संगोपन करणाऱ्या पिढीबद्दल मनाच्या एका कोपऱ्यात आदराचा उमाळा असतो. वाचनालय या शब्दातच अक्षरधनाची सेवा अभिप्रेत आहे.

जेव्हा प्राणी जगायच म्हणून जगतात का जगायचं ? हा प्रश्न चतुष्पाद प्राण्यांना, दिगंतराची झेप घेणाऱ्या पक्ष्यांना किंवा जंगलात वावरणाऱ्या चतुष्पाद प्राण्यांना पडत नाहीत. माणूस नावाचा द्विपाद प्राणी सातत्याने या प्रश्नाच्या चक्रव्यूहात अडकतो. तो कायम अस्वस्थ असतो. या अस्वस्थतेतूनच माणूस स्वतःला, स्वतःच्या अर्थ देण्याचा प्रयत्न करतो. त्याच जगणं तगणं नसतं, प्रगती करणे हे माणसाचे लक्षण आहे. मानवी शरीरात जवळजवळ ६० कोटी पेशी असतात. तर मानवी मज्जासंस्थेत जवळजवळ २८ कोटी सूक्ष्म मज्जापेशी कार्यरत असतात. माणसाचा अचाट मेंदू प्रतिसेकंदाला ३० कोटी ज्ञानखंड हाताळण्याची क्षमता असलेला हा अवयव ईश्वराने माणसाला दिला आहे. याचाच अर्थ इतर प्राण्यांसारख माणसाला कस जगत रहाव यासाठी नाही. ''इस जिनेका कोइ तो मकसद होगा यारों.'' यामुळेच माणसाने धुळीत अक्षरे शोधली. आपापल्या लिपीला जन्म दिला. दगडावरच्या चित्रापासून आजच्या अक्षरांपर्यंत प्रवास झाला. ही अक्षरे त्याच्या अनुभवाला विचार-संचयाचे स्वरुप द्यावे लागले. त्यातून ग्रंथ आले. ग्रंथ स्वान्त-सुखाय असले तरी इतरांना विचार देतात, प्रेरणा देतात. विचार हा मानवी जीवनाचा पाया आहे. त्यावरच यश, समृध्दी उभारली जाते. कल्पना हीच तर त्याला श्रीमंत बनविते. आणि ही पुस्तक त्यांच्या जगण्याला दिशा देतात. नव्या आयुष्याच स्वागत करायला शिकवितात. अपयशात धीर देतात. दुःखात प्रगल्भता आणतात. संकटात मनाने सुदृढ करतात. नकळत माणूस घडत जातो. इतरांचीही आयुष्य तो उजळवितो. स्वतःच जीवन आणि जगण सुंदर, समृध्द करता करता भोवतालच जग थोड अधिक सुंदर करुन जातो.

कृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली या ग्रंथावर लाखोंनी भाष्ये केली. या ग्रंथामुळे अनेकांना जीवनाचा आधार सापडला. ज्ञानेश्वर संपन्न झाले. मराठी माणसाच्या ओठी 'माऊली' शब्द त्यांच्या ज्ञानेश्वरीमुळे प्राप्त झाला. हजारो निरक्षर माणसानाही जीवनाचा अर्थ देता झाला. लोकमान्य टिळक तुरुंगात गेले. मंडालेच्या तुरुंगात त्यांच्यातला गणिती तत्वज्ञानाची कोडी सोडवू लागला. मला आचार्य भागवत म्हणाले, ''ज्याला 'थिसीस' लिहायच आहे त्यांनी गीता रहस्याची प्रस्तावना वाचावी. तार्किक मांडणीचा तो नमुना आहे.'' नकळत लोकमान्य टिळक सहा वर्षात घडत गेले. लोकमान्य टिळकांचा खगोलशास्त्रावरचा अधिकार याच काळात फुलला.

आचार्य विनोबा भावे धुळ्याच्या तुरुंगात गीता प्रवचन लिहिते झाले. मराठी भाषेच्या सुबोधतेचे वैभव गीता प्रवचनात आहे. साने गुरुजींसारखा लेखक मिळाला. विनोबांच्या सरळ सोप्या भाषेने गीता प्रवचनाच्या माध्यमातून अनेकांचे जीवन संपन्न झाले. ज्ञानेश्वरांनी ''अतिंद्रिय ते इंद्रियापरी मेळविन'' अशी प्रतिज्ञा केली होती. आचार्य विनोबा भावे यांनी ज्ञानेश्वरीला व गीतेला जगण्याचा अर्थ दिला. विनोबा भावे श्रीमंत झाले.

साने गुरुजी नाशिक जेलमध्ये असताना, एका वॉर्डनचा त्यांच्यावर डोळा होता. तुरुंगाच्या कायद्यात कैद्यांना गोळा करुन रात्री विशिष्ट वेळेनंतर जागण्याचा अधिकार नाही. तो वॉर्डन म्हणाला, ''मेरा जूता भी काला, दिल भी काला, पट्टा भी काला'' साने को अंधेरा आएगा ऐसी सीख दूंगा।'' साने गुरुजी कैद्यांना रोज श्यामच्या आईची कथा सांगत. हा वॉर्डन रोज ती ऐकू लागला. आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू पाझरु लागले. गुरुजी श्यामच्या आईची गोष्ट सांगत त्यांनी पाचव्या दिवशी साने गुरुजींचे पाय पकडले. म्हणाला, ''मेरे काले दिल मे उजाले की रोशनी आयी।'' याचाच अर्थ खुनशी माणसाच्या जीवनात बदल घडविण्याचे सामर्थ्य वाचनात आहे, ग्रंथात आहे.

मला कोणी विचारले गांधींचा जन्म केव्हा झाला ? तर सामान्य माणूस उत्तर देईल २ ऑक्टोबर १८६९, पण माझे उत्तर आहे. गांधीजींच्या जीवनात रस्कीनचे ''अॅन टू धिम लास्ट'' हे पुस्तक आले. गांधींनी वाचले. गांधी विचाराचा तात्विक भक्कम पाया या पुस्तकाने घातला. 'तळातला माणुस', 'आम आदमी' याला राजकारणात गांधींनी या पुस्तकाच्या विचाराने भारावून राजकारणात 'आम आदमी' ला स्थान दिले.

मराठी खंड काव्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाग्देवतेला विसरुन कसे चालेल ? 'तुजसाठी जनन मरण' या ओळींना राष्ट्रीय जीवनात पेटती मशाल म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अर्थ मिळवून दिला. ही त्यांच्या कवितेची किमया आहे. या कवितेत हजारोंना देशाची कुर्बानी शिकविली. कुसुमाग्रजांच्या 'गर्जा जय जयकार' या कवितेने असंख्य १९४२ च्या क्रांतीवीरांना प्रेरणा देते झाले.

स्मरणभूमीचे सनदी मालक शतयुध्दांचे मानकरी
रणफंदीची जात आमची, कोण आम्हा भयभीत करी !

या ओळी सुधीर फडकेंच्या गीतातून सीमेवरच्या जवानांसमोर बाहेर येतात. हरलेल्या जवानांची राष्ट्रप्रेमाची ज्योत अंगारात परिवर्तीत झाली.

पंडित जवाहरलाल नेहरुंना दिर्घ कारावास भोगावा लागला. या कारावासात पंडित नेहरु घडले. पंडित नेहरु वनस्पती शास्त्राचे व कायद्याचे विद्यार्थी ! याच नेहरुंनी इतिहासाची असंख्य पुस्तके वाचली. नकळत 'भारताच्या इतिहासाचा' शोध लागला. 'ग्लिमसेस ऑफ वर्ल्ड हिस्ट्री' हे पुस्तक जन्माला घातले. वाचनाने एका राजकीय नेत्याने इतिहासाचा मागोवा घेत आपले जीवन संपन्न केले.

अॅरिस्टॉटलने २२००-२३०० वर्षापूर्वी माणसाला शहाणे केले. अॅरिस्टॉटल वाचून तत्वज्ञानाचा विचार आपण करु शकत नाही. सज्जन माणूस सखोल असतो. तो चांगल्या आणि वाईट दोन्हीशी साधेपणाने वागतो. तो इतरांपेक्षा स्वतःला फार शहाणे समजत नाही किंवा स्वतःला वाजवीपेक्षा नीचही समजत नाही. सफलतेचा त्याला आनंद वाटत नाही की अपयशाचा विशाद. तो मुद्दाम भयानक गोष्टी शोधत नाही किंवा भयानक गोष्टी समोर आली तर घाबरुन जात नाही. त्याच उत्साह भंग कधीच होत नाही. तो आपल्या किंवा दुसऱ्याच्या बाबत वायफळ गप्पा कधीच मारत नाही. दुसरे आपली प्रशंसा करतात की नाही याबद्दल तो काळजी करत नाही. लोकांनी केवळ प्रशंसा करावी म्हणून तो कोणतेच काम करीत नाही. जे काम योग्य म्हणून त्याच्या सदूसद्विवेकबुध्दीला पटते, ते काम तो संकटाची पर्वा न करता करतो.

अॅरिस्टॉटलने २२०० वर्षापूर्वी पुस्तकांचं आपल्या जीवनातलं स्थान वरच्या वचनाने अधोरेखित केले आहे.

साताराच्या ग्रंथोत्सवात सर्वात जास्त खपाची पुस्तके व्यक्तित्व विकासाची होती. प्रेरणादायी पुस्तकांमधुन काही किमान प्रेरणा निश्चित मिळतात. आयुष्यात काही मिळविण्याची उमेद वाढते. मनाची बॅटरी चार्ज होऊ शकते. परिस्थितीनुरुप बॅटरी उतरते. डाऊन झालेली बॅटरी, पुन्हा-पुन्हा चार्ज करण्याचा उत्तम उपाय वाचनालयाची पायरी चढणे. अमेरिकेत 'अॅन्ड्रयू कार्नेजी' ही एक अजब अब्जाधीश व्यक्ती होती. एक तरुण पत्रकार त्याची मुलाखत घ्यायला गेला, तेव्हा कार्नेजींनी त्याला एक 'भन्नाट' कल्पना सुचविली. यशाचे रहस्य काय असत ते शोधून काढण्याची ! हिलने विचारले ''ते कस शोधायच'' कार्नेजी म्हणाला ''तू किमान ५०० यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती घे त्यातून तुला निश्चित काही रहस्य सापडेल.'' नेपोलियन हिलला ती कल्पना आवडली. २० वर्षे खपत विविध यशवंत, श्रीमंत व्यक्तींचा मुलाखती तो घेत राहिला. अखेर त्यान हे रहस्य शोधून काढल.

'Law Of Success' आणि Think and grow rich या पुस्तकाच्या माध्यमातून ते जगापुढ मांडलं. त्यांच्या पुस्तकाच्या लक्षावधी प्रती खपल्या. हिल स्वतः तर लक्षावधी झालाच पण त्याच्या पुस्तकातून ज्यांनी ते रहस्य उचललं, आत्मसात केलं तेही लक्षाधीश झाले. आज ज्यावर विश्वास असतो, तेच उद्या मिळवलं जातं. 'What your mind Can believe, your mind can also achieve !'

यशस्वी आयुष्य जगण्यासाठी जिद्द हवी असते, धैर्य हवं असतं, आत्मविश्वास हवा असतो.

प्रेरक पुस्तकाचं मुख्य सूत्र हेच आहे. ही प्रेरणा पुस्तकातून मिळते. मजेत जगणं ही फक्त काही मोठ्या नामवंत व्यक्तींची मक्तेदारी नव्हे. प्रेरक पुस्तकं तुमची आयुष्य बदलू शकतात.

ज्ञाननिष्ठा, वाचननिष्ठा यांचे जिवंत उदाहरण संशोधक प.र.गोडे. महाभारताची संशोधित आवृत्ती तयार करतांना लकडी पूल ओलांडला नाही. म.महोपाध्याय काणेंनी १०१२ च्या खोलीत धर्मशास्त्राचा इतिहास लिहिला. या व्यासंगाला भारतरत्न पदवीने सन्मानित केले गेले. पंडित राहुल सांकृत्यायन धर्मानंद कोसंबी उत्कृष्ट वाचक होते. वाचकांनी धर्मानंद कोसंबी प्रमाणे बी ब्रीफ बी शॉर्ट, गो आऊट एवढी कठोरता बाळगली तर खरी सरस्वती साधना होते.

नगर वाचनालयासारख्या संस्था यासाठीच आहेत. दररोज एक तास काम शिकून अज्ञान व्यक्ती सज्ञान होऊ शकते. दररोज १ तास पैसे कमवण्याचा उद्योग करुन मनुष्य २ दैनिक, २ साप्ताहिके, २ मासिके, १ डझन पुस्तके खरेदी करु शकेल इतका पैसा कमवू शकतो. दररोज एक तास वाचन करणारा एका वर्षात कित्येक हजार पानांचे अठरा ग्रंथराज वाचू शकेल. या वाचनाने आनंद तुमच्या जवळ येईल. आयुष्याचं ऋण तुम्ही चुकत कराल. प्रामाणिकपणे स्वतःचा उत्कर्ष साधता साधता इतरांचही आयुष्य तुम्ही उजळवाल. स्वतःच जगणं सुंदर समृध्द करता करता भोवतालच जगही तुम्ही सुंदर करुन जाल. या सुंदरतेचा मार्ग नगर वाचनालयाच्या १६० वर्षाच्या पायऱ्यात आहे. नगर वाचनालय आपल्या वाचकांना मानसिक श्रीमंतीसाठी पायघड्या अंथरुण तुमचे स्वागत करायला कटिबध्द आहे. पुस्तकाच्या माध्यमातून सुंदर जग आपण निर्माण करु या.

❖ ❖ ❖ ❖

*नगर वाचनालय सातारा या संस्थेच्या पदाधिकारी मंडळाचा परिचय होण्याचा सुयोग आला. वाचनालयाचे सर्व विभाग पाहिले. येथील कार्य अत्यंत सुसूत्रपणे चाललेलें पाहून समाधान वाटलें. सार्वजनिक वाचनालयाच्या पुढें अेक आदर्श म्हणून या नगर वाचनालयाचा उल्लेख करण्यास हरकत नाही.*

**(निर्मलकुमार फडकुले)**

---

*वाचनालयाला भेट देण्याची संधी लाभली आणि वाचनालयाच्या कार्या विषयी माहिती मिळाली. समाधान झाले.*

*वाचनालयानें उगवत्या पिढीसाठी जिव्हाळ्याने व निष्ठेने चालविलेला बाल विभाग पाहून फारच आनंद झाला. मुलांना वाङ्मय पुरवितानाच वाचनालयाने त्यांची वाचनाची रुचि देखील मार्गदर्शित केली तर अधिक चांगले होईल.*

*संस्थेस शुभेच्छा.*

**(राजा मंगळवेढेकर)**

# ।। काही अविस्मरणिय ।।



नगरवाचनालयातील कर्मचारी श्री.साठे यांच्या निवृत्तीप्रसंगी सत्कार करताना अध्यक्ष श्री.सी.व्ही.दोशी




आरोग्य विषयक व्याख्यान प्रसंगी दीप प्रज्वलन डॉ.शंतनू अभ्यंकर, डॉ.महानंदा शेटे,सोबत-डॉ.बडवे,डॉ.माने



ग्रंथालय कार्यकर्ते स्नेहमेळाव्या प्रसंगी प्रमुख पाहुणे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह व प्रसिद्ध लेखक श्री.मिलिंद जोशी दिपप्रज्वलन करताना त्यांचे समवेत श्री.महेंद्र मुंजाळ वाचनालयाचे उपाध्यक्ष श्री.युवराज पवार कार्यवाह डॉ.सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर व श्री.बा.ग.जोशी व डॉ.राजेंद्र माने



शालान्त परीक्षेत महाराष्ट्रात सर्वप्रथम आलेल्या गौरव कुलकर्णीच्या सत्कार प्रसंगी डॉ.अनिल पाटील,सोबत-श्री.सी.व्ही.दोशी, श्री.बाळासाहेब स्वामी

# ।। मान्यवरांचे स्वागत ।।



खा.श्री.छ.उदयनराजे भोसले यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी



आ.श्री.छ.शिवेंद्रराजे भोसले यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी



चंद्रपूर येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री.वसंत आबाजी डहाके यांचा सत्कार करताना वाचनालयाचे अध्यक्ष श्री.सी.व्ही.दोशी



ज्येष्ठ कवी श्री.मंगेश पाडगावकर यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी

# ।। मान्यवरांचे स्वागत ।।



श्री.छ.सौ.वेदांतिकाराजे भोसले
यांचा सत्कार करताना श्री.सी.व्ही.दोशी



दि कल्याण जनता बँकेचे अध्यक्ष
श्री.आघरकर यांचा सत्कार
करताना श्री.सी.व्ही.दोशी



आंतरराष्ट्रीय जलतज्ञ श्री.माधवराव चितळे यांचा
सत्कार करताना सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर




गुणवंत विद्यार्थी सत्कार प्रसंगी प्रमुख पाहुणे–
श्री.विद्याधर गोखले यांचा सत्कार करताना
श्री.सी.व्ही.दोशी व देवी कुटुंबीय

# ।। पुस्तक प्रदर्शन ।।



सातारा नगरवाचनालयातर्फे शिवराज्याभिषेक दिना निमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना अभिनेते डॉ.अमोल कोल्हे,डॉ.राजेंद्र माने,बाळकृष्ण मालूसरे, बा.ग.जोशी,अरूण गोडबोले,रविंद्र झुटींग,अभय देवरे.



अण्णाभाऊ साठे जयंती व लो.टिळक पुण्यतिथी
उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक
श्री.वामन होवाळ, श्री.मोहनराव पवार



शिवजयंती निमित्ताने भरविण्यात आलेल्या इतिहासकालीन संदर्भ ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे श्री.विजयकुमार क्षीरसागर (चार्टर्ड अकौंटंट) शेजारी वाचनालयाचे अध्यक्ष श्री.सी.व्ही.दोशी व कार्यकारी मंडळ सदस्य




'मानसिक आजार' या विषयाच्या ग्रंथ प्रदर्शन प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.अनिमिष चव्हाण आपले मनोगत व्यक्त करताना त्यांचे समवेत डॉ.राजेंद्र माने डॉ.सौ. ज्योत्स्ना कोल्हटकर, श्री.बा.ग.जोशी

# ।। मान्यवरांचे विचार ।।



वाचक व्यासपीठ ''आठवणी गो.नी.दांडेकरांच्या''
वक्त्या डॉ.सौ.वीणा देव (पुणे)
सोबत सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर




महिला सक्षमीकरण काळाची गरज
वक्त्या सौ.चेतना सिन्हा
संस्थापिका माणदेशी महिला बँक




माझा व्यवसाय माझी भरारी वक्ते
श्री.रामदास माने (पुणे)
सोबत श्री.सी.व्ही.दोशी, श्री.बा.ग.जोशी



कविसंमेलन वक्ते – कवी श्री.इंद्रजित भालेराव
सोबत वैदेही कुलकर्णी, प्रदीप कांबळे,श्रीधर साळुंखे,
राजेंद्र माने, श्री.निवास वारूंजीकर, ज्योत्स्ना कोल्हटकर




सदरबझार शाखा वर्धापनदिन वक्ते कवी श्री.दासू वैद्य सोबत
श्री.प्रदीप कांबळे, सौ.ज्योत्स्ना कोल्हटकर, डॉ.राजेंद्र माने




श्री.प्रतापसिंह महाराज (थोरले) यांचे जयंती निमित्त व्याख्यानात
बोलताना प्रमुख पाहुणे श्री. नितीन बानगुडे पाटील
व्यासपीठावर डॉ.राजेंद्र माने श्री.संभाजीराव पाटणे वाचनालयाचे
अध्यक्ष श्री.सी.व्ही.दोशी, उपाध्यक्ष श्री.युवराज पवार

# आशकमस्त फकिराचे वाचनवेड

सौ.वीणा देव

तळेगावला आमच्या घरी येणाऱ्या सगळ्यांनाच कुतूहल वाटे, की गोपाल नीलकण्ठ दांडेकर ह्या छोट्याशा गावात रहायला का आले असतील ?

ही जागा पहिल्या मजल्यावर होती चार-पाचखणी. माझ्या लहानपणी पुढल्या भागाला पत्रा होता. म्हणजे घर आणखी छोटं. पत्र्यावर आईनं ठेवलेल्या बटण गुलाब, तुळस, दवणा ह्यांच्या कुंड्या फक्त आठवतात मला. मग त्या पत्र्याच्या जागी एक खोली बांधली गेली-छोटीशीच. त्याला पुढं गॅलरी. ही सगळी जागा आप्पांची. त्यांच्या लेखनाची.

सुरुवातीला ते मांडीवर पाट घेऊन लिहीत असत. नंतर मग एक घडीची खुर्ची आली. तिच्यात उशी टाकून ते बसत. लिहायला एक लाकडाचा पॅड असे.

ती खोली अगदी त्यांचीच असल्यानं त्यांचा सर्व पसारा तिथंच असे - त्यांच्या खुर्चीभोवती. गॅलरीचं दार आणि खिडकी ह्यांच्या मधे पुस्तकांसाठी फळ्या ठोकलेल्या होत्या. त्यांवर त्यांना अत्यंत आवडणारी, आणि नव्यानं वाचायला असलेली पुस्तकं असत. 'सकलसंतगाथा', 'ज्ञानेश्वरी पेशवेकालीन महाराष्ट्र अशी काही पुस्तकं तिथं कायमची जागा पकडून बसलेली. जणू मालकी हक्काच्या जागा त्यांच्या बाकी पुस्तकं भाडेकरूंसारखी येत-जात असत. त्या फळ्या नेहमीच पुस्तकांनी ओसंडलेल्या असायच्या. त्याखाली पुन्हा पुस्तकांचे ढीग असायचेच. सत्यकथा, साधना, किर्लोस्कर ही नियतकालिकं आणि पुढं मग महाराष्ट्रातल्या कित्येक मासिकांचे ढीग तिथं असत. हे पुस्तका-मासिकांचे ढीग मग दोन खोल्यांमधल्या खांबापर्यंत जायचे. त्या मर्यादेपलीकडे मात्र पुस्तकांना जायला परवानगी नव्हती.

अप्पा अफाट वाचतात त्यांचा वाचनाचा वेगही 'जबरदस्त आहे. आणि झपाटाही. त्यामध्ये त्यांच्या काही खास आवडीनिवडी दिसतात. हालवाहनाची गाथासप्तशती त्यांनी अनेकदा वाचली. ऐतिहासिक काळावर प्रकाश टाकणारे ग्रंथ त्यांच्या विशेष आवडीचे. रामचंद्र अमात्यांच आज्ञापत्र स.आ.जोगळेकरांची गोदावरी, सह्याद्री. शेजवलकरांनी लिहिलेलं शिवचरित्र ही पुस्तकं सतत मधून मधून वाचतात अनेकदा. आता गेल्या काही वर्षात प्रसिध्द झालेले कमल गोखल्यांचे शिवपुत्र संभाजी, बाबासाहेबांच शिवचरित्र यासारखे ग्रंथही सारखे वाचत असतात. म्हणजे गेली जवळ जवळ तीस पस्तीस वर्ष मी त्यांना ऐतिहासिक ग्रंथ वाचताना पाहते आहे. त्यांत ऐतिहासिक कादंबऱ्यांना फारस स्थान नाही. संशोधनपर पुस्तकांना आहे मात्र इतिहासज्ञासारखे सतत कागदपत्रांच्या रानात ते शिरलेले मला दिसलेले नाहीत.

विनोदी लेखन वाचणं हा त्यांचा विशेष विरंगुळा जेव्हा खूप झपाट्यानं कादंबरी लेखन चाले तेव्हा विनोदी पुस्तक हमखास त्यांच्या खुर्चीजवळ गादीजवळ दिसत. कोणतही पान काढून ते वाचायला सुरवात

करीत आणि त्यावेळी आपल्याशीच खुदखुदू हसत. श्रीपाद कृष्ण, चिं.वि.जोशी, पु.ल.देशपांडे, द.मा.मिरासदार, बाळ गाडगीळ, जयवंत दळवी यांची विनोदी पुस्तक त्यांनी कित्येकदा वाचली असतील याखेरीज असंख्य पुस्तक ते वाचतात. विशेषतः हा नवनवीन प्रसिध्द होणारी मला वाटत समवयस्कांपेक्षा तरुण लेखकांची पुस्तकं वाचायला त्यांच प्राधांन्य आहे. त्र्य.वि. सरदेशमुखांची 'बखर एका राजाची' 'अश्या बग्याची रुक्मिणी' भारत सासण्यांचं 'चिरदाह' माधव कोंडविलकरांच 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' अश्या कलाकृतींना त्यांनी मनापासून दाद दिलेली मला आठवते. निःसंदिग्ध अशी असे ती.

रेखा बैजल या नव्या पिढीच्या कथा लेखिकेच्या पहिल्या वहिल्या अनेक कथा वाचून आप्पांनी त्यांना प्रोत्साहन दिल्याच मला स्मरत. मला ठावूक नसणारी पण ज्यांना आप्पांनी शाबासकी दिली आहे अशी कित्येक माणस मला त्यांच्याकडे भेटतात. आप्पांची अनेक पत्र आल्याचे आणि त्यामुळे बळ लाभल्याच सांगतात.

हे झाला नामवंताच पण उत्साही लेखकांचीही शेकडो हस्तलिखित त्यांनी वाचली आहेत त्यांना प्रस्तावने दाखल मजकूर लिहून दिला आहे. त्यातली काही खरोखरच चांगली असायची काहींच्या बाबतीत आप्पांनी याला का बर म्हटल असेल ? असा प्रश्न पडायचा. कधी हस्तलिखित चाळून, तर कधी पुस्तक प्रसिध्द झालेली पाहून गो.नी.दांडेकरांची प्रस्तावना किंवा कौतुक त्या पुस्तकावर मिरवायच. अश्या वेळी आमच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह असे.

" आप्पा या लेखनात कौतुक करण्यासारख काय आहे ? ".

"अग, नवीन लेखक आहे. विषय बरा निवडलाय. त्याला माझ्या सारख्यान प्रोत्साहन द्यायला हवं.".

इथं बरेचदा त्यांचा भिडस्तपणा आणि कर्तव्यबुध्दी आडवी येत असावी परंतु त्यापेक्षा सहनशीलता अधिक.

'आशक मस्त फकीर'मधून साभार

लेखिका :- डॉ.सौ.वीणा देव

❖ ❖ ❖ ❖

*मी मागें कुमार विभागाच्या उद्घाटनासाठीं आलों होतो. प्रगति खूप झाली आहे हे पाहून आनंद होतो. हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणू असेंच विकसित होत जावो ही सदीच्छा.*

**(गोपीनाथ तळवळकर)**

---

*एकशे बारा वर्षे ज्ञानाची साधने पुरविणारी ही संस्था कोणाही माणसाच्या आदराला पात्रच राहील. साताऱ्यासारख्या महाराष्ट्रातील मानाच्या नगरींत ही उत्कृष्ट संस्था म्हणून काम करीत आहे. चालकांना धन्यवाद ! संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो ही शुभेच्छा !*

**(वि.स.पागे)**

# ग्रंथालय तुमच्या गावी

**श्री.संभाजीराव पाटणे**

आजचे युग आधुनिक ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञानाचे आहे. जगभर ज्ञानाची विविध क्षेत्रे विकसित होत आहेत. आम्ही भारतीय मात्र आजही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या पायरीवर आहोत. महान भारतीय परंपरेचा आम्हास अभिमान आहे. आमच्या पूर्वजांनी नालंदा, तक्षशिला सारखी विद्यापीठे निर्माण केली. ग्रंथांची निर्मिती केली. ग्रंथालय पर्व उभे केले. संत तुकोबारायांनी 'शब्दाचे आमुच्या जीवाचे जीवन। शब्द वाटू धन जनलोकां।।' असे सांगून शब्दाला देव मानले. शब्दाचीच गौरवपूजा केली. या गौरवपूजेचा मान ग्रंथालय रुपी देव्हाऱ्यास द्यावा लागतो. समर्थ रामदासांनी 'जे जे काही आपणास ठावे। ते ते दुसऱ्याशी शिकवावे ।।' असे सांगून 'ऐसा ग्रंथ जपूनि लिहावा। प्राणीमात्रांस उपजे हेवा। ऐसा पुरुष तो पहावा।। म्हणती लोक ।।' असा उपदेश केला.

साडेतीनशे वर्षापुर्वी या लोकशिक्षकाने ग्रंथांचे महत्व सांगितले. समाजाला शहाणे करण्यासाठी ग्रंथालय चळवळ विकसित करुन ग्रंथालय तुमच्या गावी कसे निर्माण होईल याचा सामाजिक जाणीवेने, गांभीर्याने मनापासूनचा प्रयत्न व्हायला हवा. प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा, याची गरज असते. शरीराला भूक तशी मनाला ज्ञान संपादनाची भूक लागायलाच हवी. ग्रंथालये ही आमची ज्ञानकेंद्रे आहेत. ज्ञानमंदिरे आहेत. ग्रंथालयामधूनच संस्कृती समजते. आमची प्राचीन परंपरा आणि पूर्वजांचे जीवन यांचा मागोवा ग्रंथातून घेता येतो. मानवी मनामध्ये संपन्न विचारांचे बीजारोपण करण्यासाठी तत्ववेत्यांच्या ग्रंथांचा उपयोग होतो. मं.गांधी, म.फुले, यांच्यांसारख्या महात्म्यांनी सुध्दा ग्रंथातूनच आपल्या जीवनाला आकार दिला. वाचनाची गोडी लागली की ज्ञानसंपदेने माणूस खुलतो. फुलतो, आणि वाढतो. सर्व प्रकारची ग्रंथ संपदा एकाच व्यक्तीला आपल्या घरी उपलब्ध करता येत नाही. सार्वजनिक ग्रंथालये ही आमची ज्ञान-धन खनिजे आहेत. भारतात ६०,००० सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्या बरोबरच वेगवेगळी विद्यापीठे, महाविद्यालये, विविध शिक्षण संस्था तसेच अनेक सार्वजनिक उपक्रम, ग्रंथालयाच्या मार्फत जनतेला ज्ञानसंपन्न बनविण्यासाठी प्रयत्नशील असतात. भारताप्रमाणेच महाराष्ट्राला आणि आपल्या सातारा जिल्ह्याला एक ग्रंथालयीन परंपरा आहे.

**- ग्रंथालयीन परंपरा -**

साताराचे शिल्पकार व ग्रंथप्रेमी राजे श्री.छ.प्रतापसिंह महाराज यांनी १८२५ च्या सुमारास आपल्या राजवाड्यात सर्व प्रकारच्या ग्रंथांचा संग्रह केला. त्यांचे हे स्वतःचे ग्रंथालय त्यांचे बंधू, श्री.छ.आप्पसाहेब महाराज यांनी सांभाळले. आप्पासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी महाराणी सगुणाबाई यांनी हे ग्रंथालय जागेसह लोकांच्या स्वाधीन केले. १८५३ साली स्थापन झालेले वाचनालय म्हणजेच आजचे श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय होय. १८५७ साली कराड येथे नेटिव्ह जनरल लायब्ररी होती. ही

लायब्ररी १९५२ साली नगर पालिकेने आपल्याकडे घेतली. तेच आजचे नगर वाचनालय कराड आहे. लोकहितवादींनी वाई येथे तहसीलदार असताना सुमारे शतकापूर्वी सुरु केलेल्या वाचनालयाचे आजचे रुप म्हणजे लोकमान्य टिळक स्मारक संस्थेचे ग्रंथसंग्रहालय होय. १९३३ च्या सुमारास श्री.सखाराम बळवंत पाटणे यांनी मराठा मोफत वाचनालय सुरु केले. त्यातूनच आजचे ब्राहमो समाजाचे श्री.शिवाजी वाचनालय निर्माण झाले. पाटणचे श्रीमंत नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय, फलटणचे श्री.छत्रपती शिवाजी वाचनालय, पाचगणीचे विद्यार्थी वाचनालय, मेढ्याचे महात्मा गांधी वाचनालय, कोरेगावचे श्री भैरवनाथ वाचनालय, दहिवडीचे आझाद वाचनालय, रहिमतपूरचे हिंद वाचनालय, त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील वाचनालयांची १९८१ साली संख्या २०९ होती. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाने गेली ३५ वर्षे ग्रंथालय चळवळ नि:स्पृह भावाने वर्धिष्णू ठेवली आहे. स्व.बाबुरावजी गोखले यांनी १९६७ साली जिल्हा ग्रंथालय संघाची स्थापना केली. सर्वश्री र.पु.कुलकर्णी विठ्ठलराव जगताप, डॉ.शिवाजीराव चव्हाण, विठ्ठल पाटील, श्री.बा.आचार्य, आदींच्या बरोबरच सर्वश्री लक्ष्मणराव पाटील, शंकरराव गाढवे, लक्ष्मण माने, मदन भोसले, आदींनी तीन दशकांहून अधिक काळ ही चळवळ वाढवली. ग्रंथालय चळवळ ही लोक चळवळ झाली. तर यशवंतराव चव्हाणांचे संस्कार संपन्न महाराष्ट्राचे स्वप्न साकार होईल असे विद्यमान अध्यक्ष संभाजीराव पाटणे यांना वाटते. डॉ.नलावडे, श्री.भोसले, सौ.नंदा जाधव, प्रा.घाडगे, डॉ.राजेंद्र माने, सौ.वर्षा कोडगुले, श्री.अजय कदम, श्री.भगवान राक्षे, श्री.संतोष लाड, श्री.यादव, श्री.पार्टे, श्री.दिगंबर बडवे, श्री.उबाळे, श्री.क्षीरसागर, इ. ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते ग्रंथालयीन परंपरा वर्धिष्णू करीत आहेत. सातारा जिल्हा ग्रंथालय संघाने आजवर ३९ वार्षिक अधिवेशन घेवून ग्रंथालयांच्या विकासासाठी आणि नवीन ग्रंथालये स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

### जिल्ह्यातील ग्रंथालये-

महाराष्ट्रात १२८५९ वाचनालये आहेत. सोलापूर जिल्ह्यात ९८४, कोल्हापूर जिल्ह्यात ७२७, पुणे जिल्ह्यात ६०५, सातारा जिल्ह्यात ४३५ व सांगली जिल्ह्यात ३९४ वाचनालये आहेत. सातारा जिल्ह्यात १४९८ गावे आहेत. सुमारे ३० टक्के गावात सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सहकारी संस्था, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था, शिक्षण संस्था या गावोगाव पहावयास मिळतात. परंतु वाचन संस्कृती विकसित करुन ज्ञानसंपन्न पिढी बनविण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात ग्रंथालयाव्दारे घडवण्याची गरज आहे. ग्रंथालय हे गावाचे भूषण असते. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात ९९, कोरेगाव तालुक्यात २६, खटाव तालुक्यात ३३, खंडाळा तालुक्यात २५, जावली तालुक्यात १७, पाटण तालुक्यात ४०, फलटण तालुक्यात ६५, महाबळेश्वर तालुक्यात ४, माण तालुक्यात ५४, वाई तालुक्यात २७, सातारा तालुक्यात ४५, ग्रंथालये आहे. एका जिल्हा वाचनालयाबरोबर 'अ' वर्गात ९, 'ब' वर्गात ६४, 'क' वर्गात १६८ व 'ड' वर्गात २५१ वाचनालये आहेत. 'अ' वर्गातील वाचनालयात २,५६०००/- वार्षिक अनुदान मिळते. 'ब' वर्गातील वाचनालयास रुपये १,२८०००/- अनुदान मिळते. 'क' वर्गातील वाचनालयास रुपये ६४०००/- आणि 'ड' वर्गातील वाचनालयास रु.२००००/- वार्षिक अनुदन मिळते. मिळणाऱ्या अनुदानात ग्रंथालयास अनुदानाच्या १० टक्के रक्कम वर्गणीतून व देणगीतून घालावी लागते. निम्मा खर्च सेवकांच्या पगारावर व निम्मा खर्च ग्रंथ खरेदी, वृत्तपत्रे, नियतकालिके व इतर बाबींवर करावा लागतो. ग्रंथालयाचा कार्यभार कार्यकारी मंडळामार्फत सेवकांना सांभाळावा लागतो. हा सेवक वर्ग गेली ५० वर्ष तुटपुंज्या पगारावर काम करीत आहे.

### सेवकांची दुरावस्था-

मुंबई सरकाराचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी ग्रंथालय चळवळीस चालना दिली. १९३९ साली मुंबई सरकारने एक ग्रंथालय समिती नेमली या समितीमुळे या ग्रंथालयास अनुदान मिळू लागले. जिल्हा वाचनालयास वार्षिक ४०००/- रुपये मिळत. तालुका वाचनालयास वार्षिक रु.४५०/- अनुदान मिळत असे. या अनुदानात हळूहळू वाढ झाली. १९६७ साली ग्रंथालय कायदा झाला. या कायद्यात ग्रंथपालाच्या तसेच सेवकांच्या पगाराविषयी तसेच सेवाशर्ती विषयी कोणतीही तरतूद नाही. ग्रंथपालाकडून संस्थेच्या आणि वाचकांच्या मोठ्या अपेक्षा असतात. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी त्याला पुरेसा पगार मिळायला हवा. 'अ' वर्ग ग्रंथालयाच्या ग्रंथपालास ४००० रुपये, 'ब' वर्गासाठी रुपये ३०००, 'क' वर्गासाठी रुपये २०००, आणि 'ड' वर्गासाठी रुपये १०००, अ व ब वर्गातील लिपीकासाठी रु.२०००/-, व सेवकास रुपये १०००/- व रुपये १५००/- वेतन मिळते. गवंड्याच्या हाताखाली काम करणारा मजुर सुध्दा दररोज रुपये ३००/- मिळतो व आणि हे पदवीधर ग्रंथपाल दररोज रु.६०/- ते रु.१००/- मिळवतात. सेवकांच्या उपासमारीचा विचार कोण करणार ? दोन वर्षापूर्वी दुप्पट अनुदानाचे गाजर दाखवण्यात आले. गतवर्षी दिडपट अनुदान जाहीर झाले. पडताळणीचा शासकीय प्रयोगही झाला. आता सर्वच सार्वजनिक ग्रंथालयाची अनुदाने तिप्पट करण्याची गरज आहे. या अनुदान वाढीबरोबर 'ग्रंथालय तुमच्या गावी' ही योजना शासकीय सहाय्याने वेगवान करावी. यशवंतरावजी चव्हाणानी प्रत्येक गावी ग्रंथालय असावे ही अपेक्षा व्यक्त

केली. त्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे त्यानिमित्त त्यांना आदरांजली म्हणजेच 'गाव तिथे ग्रंथालय' निर्माण.

**ग्रंथालय तुमच्या गावी-**

प्रत्येक गावातील प्रमुख नागरिकांनी एकत्र येऊन ग्रंथालय सुरु करण्यासाठी एक छोटी सभा घ्यावी या सभेत ७ ते २१ सदस्यांचे कार्यकारी मंडळ करावे. मंडळाचे पदाधिकारी ठरावावे. ३०१ पुस्तके खरेदी करावीत. त्याची किंमत रु. २५०००/- च्या वर असावी. धर्मादाय आयुक्ताकडे विश्वस्त कायद्यानुसार नोंदणी करावी. जिल्हा ग्रंथालय संघ तसेच नजीकचे सार्वजनिक ग्रंथालय यासंबंधीची माहिती देईल. ग्रामीण भागात शहराप्रमाणे ज्ञानाच्या परंपरा वर्धिष्णु करण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञान व इंटरनेटची सुविधा असणारी सर्व प्रकारच्या ज्ञानाची केंद्रे ग्रंथालय प्रत्येक गावी व्हावीत ही अपेक्षा !

❖ ❖ ❖ ❖

*वाचनालयाला आज भेट देण्याचा योग आला. आपले वाचनालय हे मला खरे शहराचे भूषण वाटतें. वाचनालय पहाण्याचा जेंव्हा योग येतों तेंव्हा माझी मान नेहमीच लवलेली असते. आदरान मराठीचे वैभव पाहून अभिमानान अशी उपकारकारक संस्था अत्यंत आत्मियतेनें चालू ठेवल्याबद्दल चालकांना धन्यवाद.*

*सर्व शुभेच्छा.*

**(रणजित देसाई)**

---

*ज्या वाचनालयात मी हायस्कूल विद्यार्थी असतांना मराठी साहित्य वाचले, त्या वाचनालयात आल्यावर अनेक सुखद स्मृति जागृत झाल्या.*

*साताराचे वाचक हे चोखंदळ व चिकित्सक. त्यांच्या अभिरुचीवर संस्कार करणाऱ्या या वाचनालयाचे साताराच्या सांस्कृतिक जीवनात फार महत्वाचे स्थान आहे.*

*या वाचनालयाचा सतत विकास होवो आणि येथून सातारा जिल्ह्यातील ग्रंथालय चळवळीस चालना मिळो हीच सदिच्छा.*

**(ग.प्र.प्रधान)**

---

*वाचनालयात आल की मला नेहमीच माहेरी आल्यासारखं वाटतं. ओळखीची, आपली, प्रेमाची माणसं भेटण्याचा आनंद होतो. तोंच आज परत झाला-कधीही विसरणार नाही.*

**(ज्योत्स्ना देवधर)**

# प्रेम : ग्रंथांचे आणि ग्रंथपालाचे

**श्री.प्रवीण दवणे**

वाचनाचं वेड किती झपाट्यानं कमी होतं आहे. याचं अधिक निराश करणारं चित्र मी दरवर्षी वर्गात अनुभवतो. दहावीची शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले तरी कसे असा प्रश्न पडणारे ते पंधरा-सोळा वर्षांचे कोवळे जीव मन व्याकूळ करतात. वाचता काय ? वाचलंय काय ? कोण लेखक आवडतो ? इत्यादी प्रश्न विचारल्यावर एक घाबरी शांतता वर्गात पसरते. एखादुदुसरा विद्यार्थी जी नावं घेतो ते पाहिल्यावर पाठ्यपुस्तकातले ज्ञानेश्वर, केशवसुत, आगरकर, गोविंदाग्रज इत्यादी साहित्यिक यांच्या काळजावर उतरवायचे कसे हा प्रश्न भेडसावत राहतो.

न वाचता उत्तीर्ण होऊ शकणारी भयानक परीक्षापद्धती त्यांना 'वरच्या वर्गात ढकलत' राहते. म्हणून हजारो रुपयांच्या चळती मोजणारे पालक स्वतः तर अनेक कारणांच्या ढाली पुढे करून वाचत नाहीतच. परंतु वाचनाचं महत्त्वच न कळल्यामुळे आपल्या मुलांनीही वाचावं असं त्यांना वाटत नाही. मला तर वाटतं- एक आख्खा पेपर बाह्यवाचनाचा हवा. वर्षाच्या सुरुवातीला पन्नास उत्तम पुस्तकांची नावं लिहून द्यावीत आणि त्या वाचनाची चाचणी घेतली जावी. पूर्वी सर्व शाखांना आवश्यक असा मराठीचा एक पेपर पदवी परीक्षेपर्यंत होता. आता ती 'आवश्यकता' काढून टाकली आहे. एकीकडे मराठीचे गोडवे गायचे. दांभिक भाषणे झोडावयाची आणि एकीकडे न वाचून पुढे सरकता येणारी शिक्षणपद्धती सुरू करायची; या साऱ्या कल्पकताशून्य नियोजनामुळे एक वाचनशून्य तरुणांची पिढीच्या पिढी आम्ही निर्माण करत आहोत !

सार्वजनिक वाचनालयांमध्येही विद्यार्थ्यांसाठी सवलती आवश्यक आहेत. एकीकडे आम्ही त्यांना वाचनाचा आग्रह करावयाचा आणि दुसरीकडे त्यांना साधनसामुग्री उपलब्ध करून द्यायची नाही हे बरोबर नाही. अनेक महाविद्यालयांत अभ्यासाव्यतिरिक्त पुस्तके विद्यार्थ्यांना देत नाहीत. हा प्रकार घृणास्पदच आहे. वाचनालयाची शोभा ग्रंथ नाहीत, वाचले जाणारे ग्रंथ आहेत हा दृष्टिकोन हवा !

शिक्षकही अनेकदा जुन्या पदवीच्या तुटपुंज्या पुंजीवर अनेक वर्षं गुजराण करीत असतात. नोटस् एकदा सुरुवातीच्या उत्साहाच्या काळात लिहून ठेवायच्या, मग फक्त वरचे कव्हर बदलायचे असा खाक्या असतो. प्रत्येक क्षणी इतक्या नित्य नव्या ज्ञानाची-विज्ञानाची भर पडत असते की, पाच वर्षांपूर्वी पोस्ट ग्रॅज्युएट झालेला मनुष्य पुढे अजिबात वाचन केलं नाही तर दहावीच्या पातळीवर येतो हे अटळ सत्य आहे. सतत नवं नवं वाचणारा, त्या पुस्तकांचे संदर्भ देणारा शिक्षकच नव्या वाचनाची प्रेरणा देऊ शकतो. 'रिता' माणूस समोरच्याला कसा 'भरणार ?' इन्स्पेक्शनच्या काळात शिक्षकाने वर्षभरात काय वाचन केले याचा पुरावा म्हणून वाचनालयाचे कार्ड बघतात. तिथे 'सुखरूप सुटका' व्हावी म्हणून चार-पाच दिवस एक पंधरा-वीस पुस्तकांची नुसती नोंद केली जाते. 'कागदावर सर्व ओ.के. हवं- काळजावर नसलं तरी चालेल' अशी आपली नवी समाजव्यवस्था आम्हाला विनाशाकडेच नेते आहे.

मुलांनी पुस्तकं परत दिली नाहीत तर ग्रंथपालाकडून वसुली केली जाते. या ...... कित्येक शाळांचे ग्रंथपाल काचेच्या कपाटात पुस्तके सुरक्षित ठेवतात. ग्रंथपालावर असे मूर्ख बंधन असेल तर ते काढून टाकायला हवे. त्याला मुक्तपणे आपले काम करू देण्याची मोकळीक हवी. शाळेत नवा वर्ग वाढवा, तुकड्या वाढवा अशी हाकाटी दरवर्षी ऐकू येते. पण मुलांच्या संख्येच्या तुलनेत वाचनालयाची जागा किती आहे याचा कधी विचार होतो का ? शाळेला, महाविद्यालयांना प्रशस्त, सुंदर ग्रंथालय हवे अशी मागणी ऐकूच येत नाही. कारण ..... अनेक मोठ्या गैरसोयी उरलेल्या असतात. शाळा, महाविद्यालय म्हणजे अनिर्बंध पोरांना काही तास डांबून ठेवण्याचा पांजरपोळ नाही. त्यांना पूर्ण माणूस घडविण्याचे ते आरोग्यधाम आहे हा दृष्टिकोनच नाही. एखादी पंचवार्षिक योजना देशातील सर्व शाळा आणि महाविद्यालये अत्याधुनिक करण्यासाठी राबवायला हवी. आमच्या नेत्यांचे या देशावर जेव्हा प्रेम जडेल तेव्हाच या गोष्टी घडू शकतील, अन्यथा केवळ दिवास्वप्नच ठरेल. काही वेळा वाटतं, मनात आणलं तर हे मंत्री, आमदार, खासदार केवढं करू शकतील. पण विकासयोजनांबाबतही सुसूत्रता नाही, एकवाक्यता नाही. दिशा नाही, श्रद्धा नाही-काही नाही ! भारत देश आला दिवस आपला ढकलतोय ! खायला कसंबसं कदान्न मिळालं की जीव जगला जातो. हवा फुकटचीच आहे, माणसं आपलं मरेपर्यंत जगताहेत झालं !

ग्रंथांवर पोटच्या पोराप्रमाणे प्रेम करणारे ग्रंथपाल हवेत ! महत्त्वाच्या पुस्तकांच्या नोंदी, विषया वार वर्गवारी, महत्त्वाच्या मजकुराची टिपणी, अध्यापकांना पुस्तके वाचण्याचा आग्रह, विषयाच्या तयारीसाठी योग्य संदर्भ पुरवण्याचा प्रसन्न उत्साह या गोष्टींनी चैतन्य येईल. पण काही ग्रंथालयातील ग्रंथपाल पाहिले की त्यांना काही विचारावं, चर्चा करावी असं वाटतच नाही. ढिम्म बसलेले असतात. गंगेत रेनकोट घालून उतरावं तसे ग्रंथसमुदायातही हे आपले कोरडेच असतात. इतरांना मदत राहिली, पण आत्मविश्वासाला ही संधी आहे असे मानले तरी चेहऱ्यावर थोडी हालचाल जन्मू शकेल.

त्यांच्या आर्थिक अडचणी असतील तर शासनाने त्वरित लक्ष घालायला हवे. योग्य कुवतीची बुद्धिमान प्रतिभावंत माणसे या पदाकडे वळावीत म्हणून आकर्षक आर्थिक श्रेणी असणं आवश्यक आहे. पण ज्या देशात शिक्षणच जेथे अनुत्पादक क्षेत्र मानून शिक्षकाला भिकाऱ्याप्रमाणे रस्त्यावर उतरायला लागते, तेथे ग्रंथपाल, ग्रंथ यांच्याकडे कोण लक्ष देणार ? एखाद्या महान साहित्यिकाचे साहित्य कमी किंमतीत उपलब्ध होण्यासाठी बिचाऱ्याला मरावे तरी लागते किंवा शंभर वर्षांचे तरी व्हावे लागते. मुद्रणव्यवसायाला, हेतुपूर्ण पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्या प्रकाशकाला आर्थिक अभय मिळाले तर ग्रंथविश्वाला आरोग्याचे दिवस येतील.

हे सगळे माझ्यासारख्याने कळवळून लिहित राहायचे. लेख वाचणारे पदावर नसतात. पदावर आहेत त्यांना पदावर लोंबकळत राहण्यासाठी वाचायला वेळ नसतो. वाचक आपले 'खरंच लिहिलंय ते' असं म्हणणार !

दिवस उलटला जाणार...
काहीही घडल्याशिवाय...
काहीजण समर्थनाच्या ढाली पुढे करणार.
पण समस्येत कुणीही लक्ष घालणार नाही.
ग्रंथ वाट पाहत आहेत रसिक वाचकाच्या स्पर्शाची.
परीस वाट पाहत आहे लोखंडाची !

❖ ❖ ❖ ❖


*वाचनालयाला आज भेट दिली. तेथील उत्तम ग्रंथ व उत्साही माणसे पाहून आनंद झाला. ह्या ग्रंथालयाला मी इच्छितो.*

**(पु.भा.भावे)**

---

*नगर वाचनलयानें मुलांसाठी केलेल्या उपक्रमाच्या संबंधात साताऱ्याची पुनर्भेट झाली. मुलांचे कथाकथन ऐकून व मुलांसंबंधी विशेष आस्था असलेल्या व्यक्तींचा सहवास मिळून फार आनंद झाला. या उपक्रमांना व नगर वाचनालयाला सुयश चिंतिते.*

**(सरिता पदकी)**



# एका जगप्रसिद्ध ग्रंथालयात

अरुणा ढेरे

'एक महिन्यासाठी लंडनला चल', असं माझा एक मित्र मला म्हणाला. त्याची बायकोही त्याच्याबरोबर निघाली होती. खरं तर लंडनला इतक्या सहजपणे एरवी मी निघाले नसते. मध्यमवर्गीयांच्या स्वप्नांना मनाच्या, जनांच्या आणि मुख्यतः धनाच्या किती मर्यादा असतात !

पण तरी त्याचा मनापासूनच्या आग्रहाचा शब्द होकारानं उचलावासा वाटला तो दोन कारणांनी. एक कारण तसं बालिशच होतं. काही वर्षांपूर्वी अमेरिकेतून विद्यापीठाच्या वतीनं घालवलेली एक सेमेस्टर संपवून परत येताना इंग्लंडला थांबणं मनात असूनही शक्य झालं नव्हतं. आणि या वेळी शक्य झालं तर युरोप बघण्याची संधी मला गमवायची नव्हती.

पण त्याहीपेक्षा अधिक उसळी घेतली ती मनातल्या अभ्यासाच्या ओढीने. त्याआधी एका सदरलेखनाच्या निमित्तानं मी माझ्या आवडीच्या अभ्यासात मनापासून गुंतले होते आणि एकोणिसाव्या शतकातल्या सामाजिक प्रबोधनाविषयी, राजकीय घडामोडींविषयी आणि स्त्रीजीवनाविषयी पुष्कळ वाचत होते. त्या वाचनातून असं लक्षात आलं की, भारतीय समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या अनेक महत्त्वाच्या घटनांचे आणि व्यक्तींचे संदर्भ तत्कालीन ब्रिटिश राजवटीशी फार सूक्ष्मपणे जोडले गेले आहेत. ज्यांना भारतमित्र असं आपण म्हणू शकू अशा कितीतरी व्यक्तींविषयी मला त्या काळाच्या संदर्भात कुतूहल होतं.

मित्रानं विचारलं तेव्हा तेच कुतूहल मनातून उसळून वर आलं आणि मी लंडनला पोचलेसुद्धा. मात्र पासपोर्ट आणि व्हिसा इतक्या ऐनवेळी मिळाला की जाणं शक्य आहे की नाही, या दुविधेतच मी अखेरपर्यंत राहिले आणि पूर्वतयारी म्हणून आपल्याला नेमकं काय शोधायचं आहे, पाहायचं आणि मिळवायचं आहे याचा पुरता विचार करताच आला नाही. म्हणून ओंजळीत घेऊन आले ते अगदी एवढंसं काहीतरी.

पण मला त्याविषयी लिहायचं नाही. त्या निमित्तानं जे अफाट आणि तरीही अतिशय सुविहित असं ज्ञानभांडार मी पाहिलं त्याविषयी थोडं लिहायचं आहे. आपल्याकडे अभ्यासकाला त्या तऱ्हेचं संदर्भभांडार उपलब्ध होऊ शकलं तर ज्ञानाची क्षितिजं त्यानं कोणत्या सीमेला नेऊन भिडवली असती याची जाणीव मनात जी खंत निर्माण करते, त्या खंतीपोटी लिहायचं आहे. प्रश्न केवळ आर्थिक समृद्धीचं पाठबळ असण्या-नसण्याचा नाही, तर तो विशेष दृष्टीचाही आहे. ग्रंथालयांचं प्रयोजन नेमकं ओळखून कार्य करण्याचा आहे; याच्या साक्षात्कारापोटी लिहायचं आहे.

हे लिहिताना माझ्या डोळ्यांसमोर सारखा येतो आहे तो व्यंकटराव कुलकर्णींचा चेहरा. वृद्ध असूनही वृद्धत्वाच्या फारशा खुणा शरीर-मनावर न वागवणारा सौम्य सुजाण चेहरा. तो प्रथम दृष्टीला पडला तो अगदी योगायोगानं.

मी तेव्हा मला हवी असलेली काही दुर्मिळ पुस्तकं कुठे मिळतील याची चौकशी लंडननिवासी मराठी मंडळींकडे करीत होते. मधू अभ्यंकर ह्या, मराठी कलाक्षेत्राला मित्र म्हणून परिचित असणाऱ्या लंडननिवासी मराठी गृहस्थांनी (यांना गमतीनं काहीजण मराठी मंडळींचे ब्रिटनमधील राजदूत म्हणतात.) मला 'फॉइल्स' चं नाव सुचवलं. लंडनमधलं हे अनेक मजली असं पुस्तकांचं भव्य दुकान मी आधीच धुंडाळलं होतं. केवळ अफाट अशा त्या ग्रंथसागराकडे पाहताना थी थक्क झाले होते, पण मला हवी असलेली दुर्मिळ पुस्तकं तिथे नव्हती. ते ऐकून अभ्यंकर मला म्हणाले, "तर मग पर्याय एकच. तुम्ही ब्रिटिश लायब्ररीसाठी थोडा वेळ काढा. तिथे तुम्हाला बहुधा ती पुस्तकं मिळतील आणि झेरॉक्सही करून घेता येतील. तुम्ही व्यंकटराव कुलकर्णींना भेटा. ते माझे चांगले मित्र आहेत आणि ब्रिटिश लायब्ररीमधूनच ते आता निवृत्त झाले आहेत. शिवाय ते युनिव्हर्सिटीच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज्' मध्ये सध्या रोज असतात. ब्रिटिश म्युझियमच्या मागेच आहे युनिव्हर्सिटी. मी तुम्हाला व्यंकटरावांचा फोन देतो. ते नक्कीच तुम्हाला मदत करतील."

मी फोन केला आणि अगदी सहजपणे कुलकर्णींनी मला मदत करण्याचं मान्य केलं. "उद्या साडेदहा वाजता मी म्युझियमच्या मेन हॉलमध्ये तुमची वाट पाहतो. रिसेप्शन काउंटरजवळ थांबतो. पांढरी दाढीवाला म्हातारा सहज ओळखाल तुम्ही." ते म्हणाले.

माझ्या हातात दहा-बारा दिवस होते. नंतर पॅरिसला जायचं आम्ही ठरवलं होतं. या दहा दिवसांत मी काय काय करू शकणार होते याचा अंदाज मला नव्हता. पण ते नंतर पाहू. आधी लायब्ररी पाहून तर घेऊ, असा विचार करून मी निघाले. निघाले म्हणजे माझ्यासाठी तेही एक धाडसच होतं. एकटीनं लंडनच्या एका उपनगरातून मध्य लंडनमध्ये येणं म्हणजे धाडसच की. मुंबईदेखील एकटीनं हिंडण्यासाठी जिला अवघड वाटते तिनं हे धाडस कसं करावं ?

पण मी निघाले आणि पोचताना कळलं की ते मुळी साहस नव्हतंच. अगदी सहजसोपं होतं सगळं. दीड तासांचा तो सुंदर प्रवास किती आरामशीर होता ! लंडन ट्रान्सपोर्टच्या तिकिटांची, किमतींची आणि प्रवासाच्या वेगवेगळ्या 'झोन्स' ची माहिती देणारं लहानसं बुकलेट मला अंडरग्राउंड स्टेशनवरच मिळालं होतं. आणि स्टेशनबाहेरच्या बसस्टॉपवर उभं राहून मी ते पाहिलं तेव्हा, टॉटनहॅम कोर्ट रोडला बहुधा मला उतरावं लागेल असं नकाशावरून लक्षात आलं होतं.

मला सगळंच सोप झालं. तिन्ही बाजूंनी काचेच्या भल्या-थोरल्या खिडक्यांमधून लंडनचं दर्शन असं सुरेख होत होतं की तास-दीडतास कसा गेला मला कळलंही नाही. प्रत्येक बसस्टॉपवर स्टॉपचं नाव आणि पुढे येणाऱ्या स्टॉपचं नाव होतंच. मला जिथे उतरायचं होतं त्याआधी जरा सजग होऊन मी स्टॉपवरची नावं वाचताना अचानक मला म्युझियम स्ट्रीटचा बसस्टॉप पुढचाच आहे हे लक्षात आलं आणि मी त्याच स्टॉपला उतरले. रस्ता क्रॉस करून समोरच्या लेनच्या टोकाशी पोचले तर म्युझियमचंच आवार लागलं.

ब्रिटिश म्युझियम हे केवळ लंडनमधलंच नव्हे तर जगातलंही एक प्रख्यात आणि भव्य म्युझियम आहे. १७५३ मध्ये स्थापन झालेलं हे म्युझियम सर्वांसाठी विनामूल्य खुलं आहे. प्रेक्षकांसाठी अनेक प्रकारच्या सोयी-सुविधांनी युक्त असं हे म्युझियम जुन्या प्रतिष्ठित अशा दगडी इमारतीत आहे.

मी प्रवेशद्वारातून आत मुख्य हॉलमध्ये प्रवेश केला तेव्हा दहा वाजून दहा मिनिटं झाली होती. हॉल माणसांनी तुडुंब भरुन वाहात होता. दहा मिनिटं उशीर झाला असता तरी चाललं असतं पण आता लवकर आले आहे तर मागे जाऊन लंडन युनिव्हर्सिटी तर पाहून येऊ असं म्हणत मी पुन्हा बाहेर पडण्यासाठी वळणार तोच एक शुभ्र पांढऱ्या दाढीतून हसणारे गोरे म्हातारे गृहस्थ माझ्यासमोर आले. तेच व्यंकटराव कुलकर्णी होते. "थोडा लवकरच आलो तुमच्यासाठी. म्हटलं आधी पोचावं आपण." ते म्हणाले.

मग म्हणाले, "चला, आधी आपण म्युझियममधून थोडा फेरफटका मारू या. मग तुम्हाला लायब्ररीकडे घेऊन जातो. आपल्याला थोड्या गप्पाही करता येतील आणि परिचयही होईल. चालेल ना ?"

मी त्यांच्याबरोबर म्युझियम पाहिलं. दोन-तीन तास आम्ही बोलत-बोलत वेगवेगळे विभाग पाहात होतो. तसं तर आठवडाभर रोज एकेक विभाग पाहायला हवा असं ते संग्रहालय आहे. पण गाईड तुम्हाला नव्वद मिनिटांत त्याची एक झलक दाखवतो-दाखवू शकतो. मी मात्र नंतर पुन्हा जाऊन पाहण्यात रमले ती ग्रीस आणि रोमच्या अवशेषांमध्ये, पश्चिम अशियाच्या आणि इजिप्तच्या विभागामध्ये आणि आपल्याला जवळच्या वाटणाऱ्या 'ओरिएंटल कलेक्शन' मध्ये. तसा तर इथे नाण्यांचा आणि पदकांचा स्वतंत्र विभाग आहे, चित्रांचा आणि हस्तलिखितांचा स्वतंत्र विभाग आहे. शिवाय इथे अभ्यासवर्ग आहेत, भाषणं आहेत, शिबिरांचं आयोजन आहे. संग्रहालयाला जोडून एक आकर्षक शैक्षणिक उपक्रमांचं जाळंच निर्माण झालं आहे.

पण त्या सगळ्याचा अनुभव घेणं माझ्यासारख्या उडत-उडत आलेल्या महिन्याभराच्या प्रवाशाला शक्यच नव्हतं. म्हणून केवळ

म्युझियमचं थोडंफार दर्शन एवढंच समाधानाचं मानून मी लक्ष पुरवलं ते लायब्रीतून मला हव्या असलेल्या पुस्तकांकडे. प्रथम जेव्हा कुलकर्णी मला लायब्रीच्या भागात घेऊन गेले तेव्हा त्यांनी माझी परीक्षाच घ्यायचं मनोमन ठरवलं असावं. ते मला म्हणाले, ''आता या कॉरिडॉरमध्ये मी इथे थांबतो. तुम्ही समोरच्या ऑफिसमध्ये आत जा. तुमची ओळख थोडी सांगा, काम सांगा आणि ते तुम्हाला रीडर्स पास देतात का ते बघा. ते चार्ज करतीलच तुम्हाला, पण एवढ्या थोड्या दिवसांसाठी, ओळख नसताना पास मिळेल का नाही मला शंका आहे. पण तुम्ही विचारून तर पाहा. नाही म्हणाले तर मग मी येईन चीफ लायब्रीयनला भेटायला.''

मी एकटीच आत शिरले. काउंटरवर एक चुणचुणीत मुलगी काम करीत होती. मी तिच्याशी बोलले. माझी ओळख पटवण्यासाठी माझ्याजवळ कुणाचं कसलं पत्र नव्हतं, की, माझ्याजवळ कुणा संस्थेचं कसलं पद नव्हतं. व्यक्तिगत पातळीवर माझ्या अभ्यासाचा, पुस्तकांचा थोडा तपशील फक्त माझ्याजवळ होता. तो मी दाखविला आणि मला दहा दिवसांसाठी रीडर्स पास देण्याची विनंती केली.

त्या मुलीनं माझ्याबद्दलच्या माहितीवरुन नजर टाकली आणि म्हणाली, ''ओ.के.देते मी पास. पण मला वाटतं की तुला हवी ती पुस्तकं इथे नाही मिळणार. ती 'इंडिया ऑफिस' लायब्रीत मिळतील. तू आधी तिथें जाऊन येतेस का ? हा फॉर्म घेऊन जा सोबत. फोटो आहेत दोन तुझ्याजवळ ?''

सुदैवानं जवळ फोटो होते. फॉर्म मी तिथेच भरुन दिला. फोटोही दिले. मग ती म्हणाली, ''आता तू आधी इंडिया ऑफिसमध्ये जाऊन ये. तिथं तुला हवी ती पुस्तकं मिळाली नाहीत तर मग ये इकडे. इथे स्लीपस् भरुन टाकून जा म्हणजे उद्या सकाळी आल्या-आल्याच तुला कामाला लागता येईल. काही पुस्तकं लगेच मिळतील.'

''किती चार्ज भरायचा मी पासकरता ?'' मी विचारलं.

''चार्ज ?'' तिनं नवलानं माझ्याकडे पाहिलं, ''ओऽ नो. नथिंग. तुझी ही माहिती पुरेशी आहे आम्हाला.'' ती म्हणाली आणि तिनं मला तळहाताएवढं लहानसं फोल्डर दिलं. ब्रिटिश लायब्रीच्या विविध विभागांचे पत्ते त्यामध्ये होते. तिनं इंडिया ऑफिसच्या पत्त्यावर खूणही केली होती.

मी बाहेर आले. कुलकर्णींना सगळं सांगितल्यावर त्यांनाही बरं वाटलं. ''अरे वा ! अभ्यासकांना असं वागवता आलं पाहिजे आपल्याही देशात.'' ते म्हणाले, ''चला, आता मी तुम्हाला इंडिया ऑफिसकडे घेऊन जातो. मग आपण जेवू या, माझ्या स्कूलच्या कँटिनमध्ये. आणि एक लक्षात ठेवा, जोवर इथे लायब्रीत येणार आहात, तोवर रोज माझ्याबरोबर जेवायचं. माझ्या पाहुण्या तुम्ही. जेवण मी देणार रोज तुम्हाला !''

त्या प्रेमळ माणसाकडे नुसतंच पाहिलं आणि त्यांच्याबरोबर इंडिया ऑफिसकडे निघाले. ती इमारत जुनी. तिथली कागदपत्रं दुर्मिळ होती पुष्कळशी. अधिकृत रेकॉर्डसूच्या स्वरूपात ब्रिटिशांच्या अमदानीतला भारत त्यांतून अभ्यासकांपुढे सहज येऊ शकत होता. पण मला हवी असलेली पुस्तकं तिथे नव्हती. म्हणून आम्ही पुन्हा म्युझियमकडे परतलो.

म्युझियममध्ये न शिरता वळसा घालून मागच्या रस्त्याला गेलं की 'युनिव्हर्सिटी ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज' हा विद्यापीठाचाच एक विभाग. अनेक देशांचे विद्यार्थी तिथे विविध पौर्वात्य विद्यांचा अभ्यास करतात. आय्.एम्.पी. रेसाईड हा त्या विभागाचा प्रमुख. मराठी बोलणारा आणि मराठीची चांगली समज असणारा प्राध्यापक. माझ्या वडिलांचा तो स्नेहीच होता. पण तो निवृत्त होऊन पाच-सात वर्षे लोटलेली आणि त्यानं वाढवलेला, जोपासलेला मराठी ग्रंथसंग्रहही दुर्दैवानं विभागाच्या लायब्रीतून काढून कुठेतरी अडगळीत टाकलेला. मराठीची ती दुरवस्था समजली आणि खिन्न मनाला इतर पुस्तकं पाहण्याचीही उमेद वाटेना. ''पुन्हा पाहीन. उद्या-परवा.'' मी म्हटलं आणि सरळ आम्ही विभागाच्या तळघरामधलं कँटिन गाठलं. मोजके पण चवदार पदार्थ, मोठ्ठा हॉल, भरपूर प्रकाश. मी त्या जेवणघरावर लोभावलेच. पुढे आठ दिवस कुलकर्णींच्या उबदार, आर्जवी सहवासात मी तिथे जेवत राहिले. भरपूर थंडीच्या आणि पावसाच्या तेव्हाच्या दिवसांना त्या वृद्धाच्या आतिथ्यशीलतेचा सुरेख उबारा मिळाला आणि ती आठवण अजूनपर्यंत मनासाठी उरली-पुरली आहे.

दुसऱ्या दिवशी मी लायब्रीत पाऊल ठेवलं तेव्हा कुलकर्णी बरोबर नव्हते. पण माझ्यासाठी एका अदभुत जगाचं दार इतक्या सहजपणे उघडलं होतं की मला इतर कशाची आवश्यकता जणू वाटतच नव्हती आणि कसली जाणीवही होत नव्हती. काउंटरवरच्या मुलीनं दाखवलं त्या टेबलाशी मी गेले आणि मला 'रीडर्स पास' मिळाला.

वर माझा फोटो असलेलं ते लहानसं कार्ड घेऊन मी राउंड रीडिंग रूमकडे जाणारा पॅसेज ओलांडला आणि अक्षरशः स्तिमित होऊन बघत राहिले. भव्य निळ्या घुमटाखालची ती प्रचंड वर्तुळाकार रीडिंग रुम होती. मधे वर्तुळाचा आस असावा तसा ग्रंथालयसेवेचा लाकडी काउंटर, अगदी मध्यभागी लहान-लहान खिडक्यांमागे तसे लहानशा वर्तुळाकारात बसलेले, पुस्तकांची देवघेव करणारे कर्मचारी आणि अगणित

आऱ्यांप्रमाणे त्या मध्यकेंद्रापासून मोठ्या परिघापर्यंत जाणाऱ्या लाकडी आसनांच्या ओळी. काही क्षण मी नुसतीच ते भव्य ज्ञानक्षेत्र पाहात राहिले.

शेकडो माणसं तिथे बसली होती. त्यांचे पोशाख वेगवेगळे, वयं आणि रंगरूप वेगवेगळी, देश आणि भाषा वेगवेगळ्या आणि तरी तरी ज्ञानाच्या अवकाशानं त्यांना वेढून असं एकाकार केलं होतं की तिथं फक्त अभ्यास करणारी माणसं होती. यापरतं दुसरं अस्तित्व त्यांना तिथे नव्हतंच.

मला सांगितलं होतं तसं मी केलं. एका रांगेतली एक खुर्ची स्वत:साठी निवडली. तिच्यासमोर टेबल होतं आणि मागे लहान लाकडी स्टँडसारखी उंच फळी पार्टिशन बनून राहिलेली. तिला एक मोठा हूक, एक आडवा कप्पा, त्या कप्प्याखाली लहानशी ट्यूबलाईट आणि समोर प्लॅस्टिक फोल्डरमध्ये काही सूचनावजा कागदपत्रं. माझा सीटनंबर होता N-12.

खुर्चीवर कोट अडकवून मी समोरची कागदपत्रं चाळली. ग्रंथालयाच्या सर्व विभागांचा नकाशा दाखवून कोणती सोय कुठे असेल, पुस्तकं या ग्रंथालयात तुम्हाला कशाप्रकारे उपलब्ध होऊ शकतील, त्यासाठीची पद्धती काय आहे, मदत करणारी आणि संबंधित माणसं आणि विभाग कुठे आहेत, वैयक्तिक कॉम्प्युटर्स, टायपिंग मशिन्स आणि इतर तांत्रिक साधनांचा वापर करण्याची सोय कुठे कशी आहे, कोणकोणते कॅटलॉग्ज् ग्रंथाच्या प्राथमिक शोधासाठी तुम्हाला उपलब्ध आहेत आणि ते कुठे आहेत याखेरीज टेलिफोन, अपंग आणि अंध व्यक्तींसाठीच्या सोयी-सुविधा, हरवलेल्या वस्तू, कॅफेटेरीया यांसारख्या सेवांच्या उपलब्धीविषयीची माहितीही समोर होती.

पुस्तकांसाठी सरळ जाऊन तुम्ही उचलून पाहू-घेऊ शकता, असे काही विभाग होते. त्यांची माहिती बुकलेटमध्ये होती. जी पुस्तकं ग्रंथालय कर्मचारी तुम्हाला देणार त्या पुस्तकांसाठी स्लीप कशी भरावी इथपासून आकृतीसह बारीक-सारीक सूचना त्यात होत्या. एकदा ते सगळं तुमच्यासमोर आलं, तुम्ही पाहिलं, समजून घेतलं की ते महाग्रंथालय तुम्हाला सर्वांगानी भेटण्यात कसलाही अडथळा नाही.

मी तर रीडर्स हातात पडण्यापूर्वी, आदल्या दिवशीच दहा पुस्तकांची मागणी करणाऱ्या स्लीप्स भरून टाकल्या होत्या. त्यामुळे मी काउंटरशी गेले तेव्हा माझ्यासाठी तीन पुस्तकं तयार होती आणि उरलेली चार थोड्याच वेळात माझ्या सीटवर आणून दिली जाणार होती. आणखी तीन पुस्तकं मात्र मला 'नॉर्थ लायब्ररी' म्हणून दुसऱ्या एका विभागात जाऊन तिथल्या गॅलरीत बसून वाचावी लागणार होती.

मी पुस्तकं घेऊन परतले. माझी पर्स, माझा कोट, माझी फाइल सगळं सीटवर तसंच होतं. दहा दिवस जरी ते तसंच ठेवलं असतं तरी त्याला कुणी हात लावला नसता. मी सीटवर बसले. समोरचा लहानसा स्वच्छ प्रकाशाचा दिवा लावला, पुस्तकांपैकी एक पुढ्यात घेतलं, दोन समोरच्या कप्प्यात ठेवली, पर्स हुकाला अडकवून ठेवली आणि पुन्हा एकदा त्या ऊबदार, महावर्तुळावरच्या भव्य निळ्या घुमटाकडे नजर टाकली. "आता मला दुसरं काही नको." मी मनात म्हणाले.

आणि खरंच त्या दहा दिवसांत मला दुसरं काहीही नको होतं. सकाळी नऊ वाजता मी बस पकडत असे. घरापासून फर्लांगभर अंतरावर तर बसस्टॉप. लंडनच्या रेडब्रिज नावाच्या त्या उपनगरातल्या टुमदार घरांपुढच्या देखण्या हिरवळी आणि त्याहून देखण्या फुलबागा पाहात मी स्टॉपवर येई. तिथे येणारी बस मला थेट म्युझियम स्ट्रीटवर घेऊन जाई. साडेदहा वाजता मी बसमधून उतरून रस्ता क्रॉस करून एक लहानशी लेन पार करी की समोर म्युझियम. दीड वाजेपर्यंत मी वाचत नोट्स घेत बसत असे. अधूनमधून मी मागवलेली पुस्तकं माझ्या सीटवर आणून दिली जात.

दीड वाजता उठून मी फक्त पर्स उचलून, कोट अडकवून बाहेर पडायची आणि म्युझियमच्या मागच्या रस्त्यानं युनिव्हर्सिटीत व्यंकटराव कुलकर्णींकडे जायची. कँटीनबाहेरच ते माझी वाट पहात बसलेले असत. नाना तऱ्हेच्या पत्रकांची, नोटिसांची, आवाहनांची, जाहिरातींची भिंतीवर गर्दी असे. भोवती मुलं-मुली अनिर्बंध वावरत असत. कँटीनमध्ये भरपूर गर्दी. सेल्फ सर्व्हिसनं हवे ते पदार्थ घेण्यासाठी जाताना मला मात्र निवडीला वाव नसे. कारण शाकाहारी पदार्थ एकच असायचा. पण कुलकर्णींबरोबर तो जेवणाचा अर्धा-पाऊण तास फार मजेत, शांत उबदार गप्पांमधे जायचा आणि ते मला फार आवडायचं. परतून कामाला लागेपर्यंत अडीच वाजत यायचे. मग मी पुन्हा अभ्यासाला लागायची ती संध्याकाळी आठपर्यंत. घरी परतायला साडेनऊ पावणेदहा व्हायचे. पण थकवा अजिबात नाही आणि मनभर सुखद अशी एक काम छान होत असल्याची जाणीव.

नॉर्थ लायब्ररीत तीन दुर्मिळ पुस्तकांसाठी मी दोन दिवस बसले. हवा तसा फिरवून घेता येणारा दिवा आणि मोठी मासिकं किंवा नकाशे पसरण्यासाठी वेगळे बोर्ड्स तिथे होते. बारीक तपशील पहाण्यासाठी भिंग मिळू शकत होती. त्या ग्रंथालयात काही म्हणजे काहीही अडचण न येता अभ्यासक काम करू शकत होता; कारण अतिशय लहान-सहान तपशिलाचाही विचार करून ते ग्रंथालय जास्तीतजास्त वापरता येईल अशा सुविधा, कार्यपद्धती आणि सेवा तिथे राबवल्या जात होत्या. कमी होती ती माझ्याच पूर्वतयारीची.

म्हणून परतले तेव्हा मनात पुष्कळच काही होतं. आपल्याकडे दोन-तीन महिने कदाचित मी पुस्तकं कुठे, कोणत्या ग्रंथालयात मिळतील ते पाहण्यात घालवले असते. काही पुस्तकं मला मिळालीच नसती. जी मिळाली असती त्यासाठी माझा वेळ केवळ वैयक्तिक पातळीवर उत्तम वा वाईट काम करणाऱ्या ग्रंथपालांवर आणि ग्रंथालय सेवकांवर अवलंबून राहिला असता. मला सहजपणे झेरॉक्स करणं किंवा अन्य साधनं उपलब्ध असणं हे तर दुर्मिळपणेच शक्य झालं असतं.

इथे मात्र वैयक्तिक भले-बुरेपणाचा संबंधही येऊ न देता अतिशय विधायकपणे अभ्यासकाला केंद्र मानून, त्याच्यासाठी समृद्ध ग्रंथभांडार खुलं करण्याचाच दृष्टिकोन असणारं ग्रंथालय मला दिसलं होतं. दोनशे वर्षांपेक्षा ते जुनं होतं आणि तिथे दीड कोटी पुस्तकांचा, हस्तलिखितांचा आणि इतर लिखित साधनांचा साठा होता. विशेष संशोधनासाठी स्वतंत्रपणे अनेक सेवा उपलब्ध होत्या. 'वाचकांचा सल्लागार' हे एक विशेष पदच तिथे निर्माण केलेलं होतं आणि कोणताही अभ्यासक थेटपणानं अगदी सहज त्या सल्लागारापर्यंत अडचणीच्या वेळी पोहोचू शकत होता. मला तर लायब्ररीत काम करायला मिळावं, यासाठीच त्या सल्लागारबाईंना-नीना इव्हान्सना-भेटावं लागेल असं सुरुवातीला वाटलं होतं. पण माझा परिचय पाहून, कोणतीही फी न आकारता किती साध्या-सहजरीतीने मला तिथे प्रवेश मिळाला, याचं आश्चर्य आणि कौतुक आजही माझ्या मनातून जात नाही. एखादी संस्था आपल्या ध्येयवाक्याला जागून कशी विकसित होते हे पाहावं ते ब्रिटिश ग्रंथालयात. या ग्रंथालयाला सार्थ अभिमान आहे की ते संशोधन, नवनिर्माण आणि पांडित्य यांच्यासाठीच उभं आहे. ते अभिमानानं म्हणतं आहे.

The British Library exists to serve scholarship, research & inovation.

(साभार पुनर्मुद्रित)

❖ ❖ ❖ ❖

*नगर वाचनालयास आज व्याख्यान देण्याच्या निमित्ताने मी आलो होतो. येथील कार्यकर्ते व कर्मचारी यांनी हे फार मोठे व उपयुक्त असे ज्ञानोपासनेचे कार्य चालविले आहे. एकूण व्यवस्था, अगत्य आणि आतिथ्य माला न्हदयस्फूर्ती वाटले. या वाचनपालयाच्या वास्तूच्या विकासाची योजना चांगली आहे. ती लवकर पुरी व्हावी, हीच सदिच्छा.*

**(हेमंन्त विष्णु इनामदार, पुणे.)**

---

*मी या नगर वाचनालयात दोन दिवस व्याख्यानाच्या निमित्ताने आलों होतो. पूर्वीही या वाचनालयांत येऊन गेलेलो होतो. त्याची प्रगति आणि सुव्यवस्था पाहून फार आनंद वाटला.*

**(ग.त्र्यं.माडखोलकर)**

---

*नगर वाचनालयाचे वाढते कार्य पाहून फार आनंद झाला. त्यांना सुयश चिंतितो.*

**(अनंत काणेकर)**



# श्री.श्री.बा.आचार्य यांच्या आठवणी

**श्री.अ.अ.वैद्य**

गेली दीडशे वर्षाची परंपरा असलेली सातारा शहरातील भूषण असलेली जुनी संस्था हजारो वाचकांचे ज्ञानपीठ असलेले हे वाचनालय १६० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. हे ऐकून अतिशय आनंद झाला. ह्याच वाचनालयात कार्यवाहपदी असलेले सन १९४७ पासून सदैव कार्यवाह व उपाध्यक्षपद सांभाळणारे श्री.बा.आचार्य माझी सेवा १९५६ पासून १९९२ पर्यंत त्यांची सेवा करण्याचे वाचनालयाचे मी भाग्य समजतो.

श्री.बा.निवृत्त होऊन वयोमानाप्रमाणे नाशिक येथे मुलाकडे (मधुकडे) स्थायिक झाले. नाशिक येथे स्थायिक होऊन वाचनालयाची ओढ कमी झाली नव्हती. वाचनालयात फोन व मलाही फोन करत. महाराष्ट्रात वाचनालयात इतके वर्ष कार्यवाहपदी सेवा करणारे श्री.बा.आचार्य होते.

नाशिकहून वाचनालयात फोन आला. ३१ जानेवारी २००७ रोजी त्यांचे निधन झाले. लगेच सकाळी वर्षा कोडगुले हिने माझ्या घरी फोन केला. श्री.बा.गेलेत. त्यांच्या आठवणीतील सेवा जी केली ती मनात आली ती आठवण लिहित आहे.

जुन्या वाचनालयात कार्यवाहपदी श्री.बा. हे वाचनालयात अतिशय काटकसरीने दहा हजार ग्रँट मध्ये ग्रंथ खरेदी, फर्निचर, नोकर पगार हे खर्च भागवत होते. ते नवरात्रोत्सवात स्वतः पुण्यास जावून व्याख्याने ठरवत व लगेच आम्हा सेवकांना फोन येत व व्याख्यानाचे बोर्ड लिहा, प्रसिध्दी द्या मी येतोच आहे. त्यावेळी आम्ही सर्व सेवक वर्ग आनंदाने काम करत असू. त्यांची जी शिस्त आम्हाला लागली होती. त्यामुळे त्रास होत नसे. परगावी खेड्यातून साखळी योजनेमार्फत ग्रंथ प्रदर्शने भरविणे, पं.नेहरु, महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर, हा त्यांचा कटाक्ष असे. आताही खंड पडत नाही. आमच्या वेळी मुंबईचे ग्रंथालय संचालक कृ.द.पुराणिक व त्यांचे सहकारी ग्रंथालय तपासणीसाठी येत. स्वतः पुराणिक साहेब यांना जुने ग्रंथ व्यवस्थित ठेवलेले पाहून त्यांना आनंद होत असे. आताही खंड पडला नाही.

एक आठवण सांगतो. मी नवीन घर बांधले. त्यांनी पत्र पाठवले मी येऊ शकत नाही. पण त्यांनी मला पत्र पाठवून शुभेच्छा दिल्या. त्यांच्या सहीचे पत्र मी जपून ठेवले आहे.

आता वाचनालयाची इमारत भव्य झाली आहे. राजा राममोहन रॉय फौंडेशनतर्फे अनुदान मिळते. त्या अनुदानात मोठी कपाटे करुन जुने ग्रंथ, मासिके, पोथ्या, हस्तलिखिते हे सर्व साहित्य वाचनालयाने जपून ठेवले आहे तर त्यासाठी वरचा हॉल राखून ठेवून त्या हॉलला श्री.बा.आचार्य जुने ग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ, त्यांचे नाव देऊन चिरकाल स्मृती राहील. आम्हा सर्व सेवकांचा आजी-माजी लाख प्रणाम.

❖ ❖ ❖ ❖



# इथे ग्रंथाच्या पानांसोबत पंख ही मिळतात

**श्री.प्रदीप कांबळे**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेब एके ठिकाणी असे म्हणतात की, ''एखाद्या गावात देवालय नसले तरी चालेल पण माणसाला देवपण देणारे ग्रंथालय असेल तर ते गाव खरे समृध्द असते.''

समृध्दता या शब्दाचा अर्थ अनेक जण अनेकांच्या पध्दतीने लावतात. भौतिक आणि क्षणभंगुर सुखांचा विचार करणारी समृध्दता केवळ संपत्ती मधून मिळते. पण क्षितिजापलिकडची मनशांती, समाधान आणि प्रगल्भता मिळते ती फक्त ग्रंथातूनच.

'' ज्ञानतृष्णा - गुरुनिष्ठा
सदा अध्ययन दक्षता
एकाग्रता महत्वेच्छा
विद्यार्थी गुणपंचकम !''

हे शिकवतात ते ग्रंथ. या तेजाच्या वलयामधूनी जन्माला येणारी क्रांती नेहमीच विजयाशी बांधील असते. ग्रंथांच्या सहवासात आयुष्याचे सोने होते ही कवीकल्पना नाही. ते एक वास्तव आहे. १६० वर्षाची समृध्द परंपरा असणाऱ्या श्री.छ.प्रतापसिंहमहाराज नगरवाचनालयाच्या वास्तूमध्ये गेली १६० वर्षे हा ज्ञानयज्ञ सुरु आहे. या यज्ञाच्या अग्नीदिव्यातून अनेक तत्वज्ञ पंडीत, प्रतिभासंपन्न लेखक आणि कवी निर्माण होताना आपण पाहिले आहेत.

माझा या वाचनालयाशी संबंध गेल्या २० वर्षाचा आहे. या वीस वर्षाच्या अनुभवातून मी काही शिकलो, समजलो, जे लिहू शकलो त्यात ग्रंथालयाचा वाटा महत्त्वाचा आहे. ''इय भेदाभेद अमंगल'' असा दावा ज्ञानदेवांनी भागवत धर्मामध्ये केला होता. खऱ्या अर्थाने हे मुक्तद्वार ग्रंथालय आहे. पाठक हॉलमध्ये २० वर्षापुर्वी एका कविसंमेलनात कविता सादर करण्याचा योग आला आणि तेव्हापासून माझ्या आयुष्यात वाङ्मयलेण्याचा परीसस्पर्श झाला. वसंताच्या आगमनाने कोकिळेला कंठ फुटावा तसा मी कविता लिहित गेलो. , वाचत गेलो. ८५ हजारापेक्षाही अधिक शाश्वत ग्रंथांच्या सोबत राहिल्यामुळे मी स्वत:ला जगातला सर्वाधिक श्रीमंत माणूस समजतो. माझ्या आईवडिलांनी श्रीमंतीची व्याख्याच मुळी ज्ञानाशी जोडल्यामुळे पूर्वजन्मीचे पूण्यकर्म म्हणून मी नगरवाचनालयाशी जोडलो गेलो. कोणताही निवेदनाचा प्रसंग असो, व्याख्यानमाला जाण्याची तयारी असो, दुर्मिळ ग्रंथासंबधातील माहिती असो ती उपलब्ध नाही असे कधी होत नाही.

साताऱ्यामध्ये पुष्कळ मंदिरे आहेत पण नगरवाचनालयाची पायरी चढताना अनेकजण पायातल्या चपला बाहेर काढून आत येताना मी पाहिले आहे. सकाळची सोवळी पूजा करण्यापेक्षा वाचनालयात जावून थोडे वाचावे ही वेगळी ग्रंथपूजा याच साताऱ्यात घडते आहे.

एखादा दिपस्तंभ अढळ का असतो तर तो आपली जागा सोडत नाही कारण दिशा दाखवायला तो कधी चुकत नाही. साताऱ्याच्या मातीला अनेक महापुरुषांचा परीसस्पर्श झाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पहिली केस जिंकली तेव्हा त्यांना ५०० रुपये मानधन इथेच मिळाले. त्यांच्या पत्नी रमाबाई यांनी त्यांना बाजारहाट करावयास सांगितले व त्या वाट पहात बसल्या. रात्री ११ वाजता बाबासाहेब आले. रमाबाईंनी सूप घेतले व त्या पिशव्या त्यांनी सूपात ओतल्या पण त्या पिशव्यातून धान्य आणि राशन पडले नाही तर त्या सूपात पडली कायद्याची पुस्तके. रडणाऱ्या रमाबाईंची समजूत घालताना बाबासाहेब म्हणतात की, ''ही पुस्तके मी वाचली नाहीत तर आपला समाज वाचणार नाही.'' हा शाश्वत विचार सांगणाऱ्या बाबासाहेबांना याच साताऱ्यात अक्षरगंध मिळाला. संपूर्ण जगभरात ज्यांची स्मृतीचित्रे गेली त्या लक्ष्मीबाई टिळकांना अक्षरांचा संग याच साताऱ्यात मिळाला. माणसाची वाणी ही जग जिंकू शकते अशी ईश्वरी देणगी मिळालेल्या प्राचार्य शिवाजीराव भोसल्यांची शब्दफुले फुलली ती याच नगरवाचन मंदिरात. प्रतिभावंत कवी, लेखक लिहते झाले आणि समाज मनावर आपला अमूल्य ठसा उमटवत राहिले ते केवळ याच नगरवाचनालयामुळे. म्हणूनच साताऱ्यातील प्रत्येक वाचकाला अभिमान वाटावा असे वाचनालय १६० वर्षे पूर्ण करीत आहे. वाचकासमोर केवळ दोन पाने उघडून देण्याचे काम या ग्रंथालयाने केले नाही तर पानांवर गरुडाचे पंखही देण्याचे काम या वाचनालयाने केले आहे. म्हणूनच इथल्या वाचकांना नम्रपणे सांगावेसे वाटते की,

''पाखरा वाढव आपली सोच
आणि वाढव आपली पोहच
तुझ्याचसाठी पिकले फळ हे
खुपस आपली चोच ।।''

❖ ❖ ❖ ❖



## या पुस्तकात दडलय काय ?

**श्री.अ.अ.वैद्य**

प्रत्येक सार्वजनिक वाचनालयात ग्रंथ देवघेव विभागात ग्रंथ जमा करतांना अनेक गमतीदार अनुभव येतात. पुस्तक वाचतांना वाचक खूण म्हणून पोस्ट पाकिटे, अंतर्देशीय पत्रे तसेच पोस्टात टाकण्यासाठी कार्डे पाकिटे त्या पुस्तकात तशीच रहातात. आणि विशेष म्हणजे कांही वाचक नोटाही खूण म्हणून ठेवतात. मा.कार्यवाह यांना सांगून ज्याचे त्याचे पैसे असतील त्यांना देण्यात येतात. व काहींची पोस्टात टाकण्यासाठी जबाबदारीही घ्यावी लागते. कारण एकदा वाचक पुस्तक घेवून गेला की तो जमा करण्यासाठी चार-आठ दिवस येत नाही. आल्यावर मात्र माझे पाकीट कार्ड पोस्टात टाकण्यासाठी होते आंम्ही ते जबाबदारीने टाकतो (कार्यवाह यांचे सांगणेवरुन) एकदा मात्र मजेशीर घटना झाली. शाहुपूरीतून एक वाचक (कुलकर्णी) धावत आले आणि म्हणाले माझे पाकीट पुस्तकात होते ते द्या. मी म्हणालो आपले पाकीट पोस्टात टाकले आहे. तेच कुलकर्णी आठ दिवसात आले आणि म्हणाले ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी फार महत्वाचे काम केले आहे. त्या पाकिटात मुलीची पत्रिका होती त्याचे उत्तर आले मुलगी पसंत आहे. सर्वांचे आभारी आहोत. मे महिन्यात कुलकर्णी स्वतः येऊन लग्नपत्रिका देऊन सर्व स्टाफला लग्नाचे व जेवण्याचे अगत्याचे आमंत्रण देऊन गेले. पावसाळ्यात छत्र्या विसरणे, चष्मे विसरणे हे नित्याचेच ते त्यांना परत देता येतात. थोडक्यात सर्व कर्मचारी वर्गांना बारीक-सारीक जबाबदारी घेऊन काही गोष्टी लक्षात ठेवून कराव्या लागतात.

❖ ❖ ❖ ❖



# आणि ग्रंथोपजीवियें इयें विशेषीं लोकीं इयें

श्री.विद्याधर पुरुषोत्तम गोखले

संत ज्ञानेश्वरांनी 'भावार्थदीपिके' चा समारोप करताना मागितलेल्या पसायदानात 'ग्रंथोपजीवी' असा शब्द वापरला आहे. 'ग्रंथोपजीवी' म्हणजे ज्यांचा चरितार्थ ग्रंथांवर चालतो ते. म्हणजे ग्रंथ लिहिणारे, मुद्रित करणारे, प्रकाशित करणारे, विक्री करणारे, वितरण करणारे, मग ते लेखक असतील, प्रकाशक असतील, मुद्रक असतील, विक्रेते असतील वा ग्रंथपाल असतील. मुद्रणकलेचा आरंभ आणि उपयोग सुरु होण्यापूर्वी लिहिले गेलेले ग्रंथ वाचकांपर्यंत पोचविण्यापेक्षा श्रोत्यांना ऐकवण्याकडे आणि जतन करण्याकडे अधिक लक्ष असावे, त्यातूनच 'तैलात् रक्षेत, जलात् रक्षेत, रक्षेत शिथिल बंधनात् । मूर्खहस्ते न दातव्यम्' असे ग्रंथांचे मनोगत व्यक्त करणारे सुभाषित निर्माण झाले असावे. मुद्रणकलेचा सर्रास वापर सुरु झाल्यानंतर वाचकांपर्यंत ग्रंथ सहज, सुलभ येऊ लागले आहेत. आता आधुनिक तंत्रज्ञानामुळे कागदावर मुद्रित झालेल्या पुस्तकांच्या ऐवजी 'इ बुक' उपलब्ध होऊ लागले आहे. तरीही कागदी पुस्तकांचा ग्रंथ सहजी आटोपेल अशी शक्यता फारच कमी आहे. शिवाय इच्छा असूनही पत नसल्यामुळे किंवा ऐपत असूनही वैयक्तिक ग्रंथ संग्रहाला मर्यादा असल्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्व आणि उपयुक्तता अबाधित आहेत. लेखक-प्रकाशक वितरकांबरोबर 'ग्रंथालय' या संस्थेचा समावेशही 'ग्रंथोपजीवी' मध्ये करावा लागेल.

'ग्रंथालय' ही संस्था प्राचीन असली तरी ग्रंथपालनाचे शास्त्र हे अगदी अलीकडचे आहे. भारतात ग्रंथपालनशास्त्राचा पाया डॉ.रंगनाथन यांनी घातला. त्यांनी ग्रंथालयातील ग्रंथांचे नोंदीकरण, वर्गीकरण, सूचिलेखन, संदर्भसहाय्य, व्यवस्थापन या बाबींचे चिकित्सापूर्ण विश्लेषण केले तथापि या बाबी म्हणजे ग्रंथ आणि वाचक यांची भेट घडविण्याची साधने आहेत. डॉ.रंगनाथन यांच्या दृष्टीने प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक भेटावयास हवा, प्रत्येक वाचकाला त्याला हवे ते पुस्तक मिळावयास हवे आणि वाचकाचा व ग्रंथपाल-सेवकांचा वेळ वाचावयास हवा ही या शास्त्रामागची भूमिका आहे. ही भूमिका साक्षेपाने ज्या ग्रंथालयाला पाळली जाते ती ग्रंथालये खऱ्या अर्थाने 'ज्ञानाची सदावर्ते' असतात.

लेखक-प्रकाशक ते ग्रंथालयादी ग्रंथोपजीवी लेखन-प्रकाशन-वितरणाचा खटाटोप करतात ते वाचकांसाठी. त्या वाचकांचे महत्व अनन्यसाधारण आहे. वाचकाशिवाय ग्रंथालय ही कल्पनाच अशक्य कोटीतील आहे. चांगला वाचक हीही एका अर्थाने 'ग्रंथोपजीवी' च. समर्थ रामदासांच्या शिकवणीप्रमाणे तो 'प्रसंगी अखंडित वाचत' असतोच. रामदासांनी ग्रंथ वाचनासंबंधी केलेली मार्गदर्शनपर सूत्रे येथे उद्धृत करणे उचित होईल. रामदास म्हणतात, 'ग्रंथमात्र धांडोळावा.' म्हणजे ग्रंथाचे वाचन अथपासून इतिपर्यंत लेखकाची भूमिका समजून घेऊन वाचावा. अन्यथा ग्रंथातील एखादा परिच्छेद, मधलेच एखादे वाक्य, क्वचित एखादा शब्द त्याची संदर्भसंगती न पाहता लेखकाची भूमिका म्हणून समजला जातो नि कित्येकदा

ग्रंथ वा ग्रंथकार गैरसमजाचा बळी अशा वरवर वाचणाऱ्या वाचकांची संभावना होऊ शकतो. 'समग्र ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण । तो दुरात्मा दुरभिमान' अशी रामदासांनी केली आहे.

रामदासांचे आणखी एक सूत्र म्हणजे 'वाचिलेची वाचावे.' आपण पूर्वी वाचलेले पुस्तक पुन्हा वाचू लागलो तर पुन:प्रत्ययाचा आनंद तर मिळवतोच पण बऱ्याच वेळा तोच ग्रंथ पुन्हा वाचताना नवा दृष्टिकोन लक्षात येतो, पूर्वी लागलेल्या अर्थाचा, विचाराचा बारकावा कळून येतो आणि त्याचा आनंदही वेगळाच असतो.

तर असे 'ग्रंथमात्र धांडोळणारे' 'वाचिलेची असणारे' वाचक म्हणजे ग्रंथालयाचा पाठकणा असतात. असे ज्ञानाची लालसा असणारे वाचक, त्यांच्यासाठी सेवा-सुविधा पुरविण्यासाठी धडपडणारे दूरदृष्टीचे संचालक, सेवातत्पर ग्रंथालय सेवक यांची प्रदीर्घ परंपरा साताऱ्याच्या नगर वाचनालयाला लाभली आहे. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल' निश्चितच असतो.

❖ ❖ ❖ ❖

आज जागतिक ग्रंथदिन व ज्येष्ठ नाटककार शेक्सपिअर यांच्या पुण्यतिथी या निमित्त आयोजित कार्यक्रमास उद्घाटक म्हणून उपस्थित राहिलो. आनंद वाटला. नवी उमेद, नवी दिशा अशाच छोट्या कार्यक्रमातून मिळते. मला मिळाली. शुभेच्छा ! धन्यवाद !

**(तुषार भद्रे)**

---

श्री.छ.प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा या ग्रंथालयाच्या शतकोत्तर हीरक महोत्सवी कार्यक्रमाच्या निमित्ताने घेतलेल्या कार्यशाळेस उपस्थित राहण्याचा योग आला. जिल्ह्यातील ग्रंथालयाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. त्याबद्दल ग्रंथालयाचे अभिनंदन !

राजश्रयाने स्थापन झालेले हे ग्रंथालय लोकाश्रयावर अत्यंत चांगल्या प्रकारे वेगवेगळ्या उपक्रमाद्वारे लोकशिक्षणाचे कार्य करीत आहे. त्या कार्यास हार्दिक शुभेच्छा !

**(कुमठे वा.ह., सहाय्यक ग्रंथालय संचालक, पुणे)**

---

आपल्या नगर वाचनालयामध्ये अनेक चांगले उपक्रम सातत्याने होत आहेत. अशा उपक्रमांसाठी आपण घेत असलेले कष्ट अनुकरणीय असून हे कार्य असेच वृद्धिंगत व्हावे हीच सदिच्छा !


**(प्रा. दीपक ताटपुजे)**

---

वाचनालयाच्या शतकोत्तर हीरक महोत्सवी व्याख्यानमालेत 'आचार्य अत्रे' या व्यक्तिमत्वावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल वाचनालयाचे मन:पूर्वक आभार.

या वाचनालयाचा आणि माझा अनेक दिवसांचा संबंध आहे. वाचनालयाची भरभराट होवो हीच सदिच्छा !

**(डॉ. विश्वास मेहेंदळे)**



# माझा बालपणीचा सर्वात जवळचा जिवलग मित्र

श्री.दत्तप्रसाद दाभोळकर

१९५५ साली मी एस.एस.सी. पास झालो. नंतर भारतभर किंवा जगभर या ना त्या कारणाने भरपूर भटकलो. बरोबर ५० वर्षांनी म्हणजे २००५ साली दमून भागून म्हातारपण निवांतपणे टिवल्याबावल्या करीत घालवण्यासाठी सातारला परत आलो. सातारला आल्यावर खर तर सर्वप्रथम त्या मित्राला भेटायला गेलो.

मित्राला भेटल्यावर खूप आनंद झाला आणि खूप वाईटही वाटले. खर तर हीच भावना सातारा शहराला पाहूनही झाली होती. कुठेतरी, काहीतरी चुकले होते. जगभर नव्हे तर भारतातही हिंडताना कायम जाणवत होते की भोवतालचे वास्तव झपाट्याने बदलतय. प्रत्येक छोटे मोठे शहर पाच वर्षांत, पूर्णपणे ओळखता येणार नाही इतके बदलतय. नवे प्रशस्त रस्ते, नवे उद्योगधंदे, कामकाजात दंग असलेली माणसे. सारे नवे कोरे करकरीत असे. 'या चक्राची गती भयंकर' म्हणून भोवतालचे वास्तव सर्वत्र बदलत होते.

माझा सातारा मात्र ५० वर्षांपूर्वी होता तसाच होता. नाही म्हणायला थोडा बदल झाला होता. ५० वर्षांपूर्वी या गावाच्या सीमा, कोटेश्वर मैदान, माची, नवग्रह मंदीर, पोलिस हेडक्वार्टर्स, उष्टारखान मैदान येथे संपत होत्या. गावात मिणमिणते दिवे होते. साऱ्या गावात दोन तीन मोटारी आणि तीन चार मोटार सायकली होत्या. गावात ॲटोरिक्षा नावाला नव्हत्या. फक्त टांगे होते. आता सीमा वाढल्या होत्या. गावात मोटारी आणि दुचाकी दुथडी भरून वहात होत्या. रस्ते मात्र तसेच होते.

महत्वाचे म्हणजे मी गाव सोडले त्यावेळी सातारा 'पेन्शनरांचे गाव' म्हणूनच ओळखले जात होते. पेंगुळलेली माणसे भोवताली आहेत असे वाटावे अशी परिस्थिती. मात्र नंतर.जाणवले ५० वर्षांपूर्वी या म्हाताऱ्यांच्या किंवा पेन्शनरांच्या गावाने चमत्कार केले होते. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या गावांची दोन दोन ओळीत ओळख करून देताना, सातारा शहराबद्दल अनंत काणेकर म्हणाले होते

सातारचा म्हातारा
तुरूतुरू चढतो अजिमतारा

आणि हे खरे होते. या पेंगुळलेल्या, पेन्शनरांचे समजले जाणाऱ्या गावाने अक्षरशः चमत्कार केले होते. कर्मवीरांनी श्रमावर आधारीत स्वावलंबी शिक्षण व्यवस्था या गावात सुरू झाली. चिरमुलेंनी विमा आणि युनायटेड वेस्टर्न बँक असे आदर्श निर्माण केले. आयुर्वेद अर्कशाळा उभी राहिली. आणि आजही ज्या रचनेचा अभ्यास झाला पाहिजे अशी आर्य-आंग्ल वैद्यकीय शिक्षणाची, महाराष्ट्रात नव्हे तर भारतातील पहिल्या अभ्यासक्रमाची सुरूवात झाली.

हे सारे सातारा शहरातच का झाले, याचा आम्ही शाळकरी विद्यार्थी विचार करावयाचो, त्यावेळी आम्हाला वाटायचे हे आमच्या जिवलग मित्रामुळे झालय. या गावात मध्यवर्ती ठिकाणी एक सुंदर ग्रंथालय

उभे आहे. त्यावेळी त्याला नगर वाचनालय असे सुटसुटीत नाव होते. पण याच्या मागे श्री. छत्रपती प्रतापसिंह महाराज यांची प्रेरणा असणार, त्यांचा आशिर्वाद या ग्रंथालयावर सदैव, कुठूनही असणार हे जाणवायचे. त्यावेळी आम्ही एलफिस्टनचे एक चरित्र वाचले होते. असामान्य कर्तृत्वाचा हा प्रशासक. भारतातील अनेक संस्थानातील अनेक संस्थानिक याने पाहिले आणि जोखले. त्याने नोंद केली होती, 'ग्रंथाची आवड असलेला, प्रतापसिंह महाराजांसारखा दुसरा राजा मी भारतात पाहिलेला नाही.'

समाजजीवनात 'सहाय्यक' (catalyst) ही भूमिका शेवटी ग्रंथालय पार पाडते. युनायटेड वेस्टर्न बँकेने नंतर आपली ओळख 'आपुलकीनी वागणारी माणसे' म्हणून दिली. मला नक्की वाटते ते बोधवाक्य त्यांनी माझ्या या बालपणीच्या मित्रापासून घेतले असणार. आमचे हे ग्रंथालय मस्त आणि मोकळे होते. पुस्तकांचा अद्‌भुत खजिना होता. साप्ताहिके, वृत्तपत्रे, छानपणे लटकावलेली असत. महिना पाच आणे म्हणजे आजचे तीस पैसे अशी त्यावेळी भारदस्त वाटणारी वर्गणी होती. खेड्यातून आलेल्या वा ही रक्कम न झेपणाऱ्यांना हसत हसत पूर्ण सवलत देणारी कारभारी मंडळी होती. याच ग्रंथालयात चाफेकरांचे ज्ञानविकास मंडळ आणि असे अनेक उपक्रम चालत. या ग्रंथलयाने जवळचा मित्र मानून मला आणि माझ्या अनेक मित्रांना घडवले आणि नकळत या सहाय्यकाच्या मदतीने गावातील अनेक संस्था पण उभ्या राहिल्या असणार.

नंतर जगभर ग्रंथालये काय कमी पाहिली ? दिल्लीचे 'इंडिया इंटरनॅशनल', 'सप्रू हाऊस', 'तीन मूर्ती ग्रंथालय' अगदी रशिया आणि अमेरिकेतील पाहिजे ते पुस्तक त्याक्षणी तत्परतेने पुढे ठेवणारी ग्रंथालये. पण अगदी खरे सांगतो, प्रत्येकक्षणी अगदी अपरिहार्यपणे आठवले ते साताराचे माझे वाचनालय. पंचतारांकीत संस्कृती वाईट नाही. पण आईच्या किंवा मावशीच्या मायेने जवळ घेणं, गप्पा गोष्टी करीत आमच्या बालपणात वाढवले ते या ग्रंथालयाने.

सातारला ५० वर्षांनी परत आल्यावर या मित्राला भेटायला गेलो. खूप आनंद झाला आणि खूप वाईट वाटले. मग जाणवले माझा सातारा बदलला नाही याचे कारण हे ग्रंथालय वाढले नाही, बदलले नाही, म्हणजे सातारकरांनी हे काम केले नाही.

सातारा बदलावा, पुढे जावा असे वाटत असेल तर आता या ग्रंथालयाने कात टाकून सळसळत पुढे गेले पाहिजे. महाराष्ट्रातील साऱ्या ग्रंथालयांना पथदर्शक म्हणून पुढे आले पाहिजे. खूप गोष्टी करता येतील. संपूर्ण संगणकीकरण. पाहिजे त्या पुस्तकाची पूर्ण माहिती, कोणी घेतले, केव्हा परत देणार, त्याचा पत्ता व दूरध्वनी. आणि आपण नोंदवलेले पुस्तक घरपोच देणारी यंत्रणा. एक ना अनेक खूप गोष्टी करता येतील. सातारा पुढे जावा असे वाटत असेल तर 'देणाऱ्याचे हात हजारो' म्हणून आपण सातारकरांनी पुढे झाले पाहिजे.

❖ ❖ ❖ ❖

ग्रंथालय हे मला देवालयाइतकेच पूज्य आहे. इथे शारदीय व्याख्यानमालेत शारदेची शब्द उपासना करता आली याचा आनंद मनी दाटला आहे. जाणकार श्रोते, वाचनालयाचे कार्यवाह श्रीयुत बा.ग. जोशी व सर्व मान्यवर यांच्याशी जुळलेला स्नेहबंध नेहमीच आनंद दरवळासारखा असेल हे निश्चित. प्राचीन ओव्यांमध्ये 'सातारा नित्य नवा' असे म्हटले आहे. आजही त्याची प्रचिती येते.

मनःपूर्वक शुभेच्छा !

(सौ. स्नेहा शिनखेडे)



# आपली वाचन संस्कृती

श्री.किशोर बेडकिहाळ

आजकाल अनेक शब्दांना उद्योग हा शब्द लावण्याचा 'उद्योग' केला जातो. अमुक उद्योग, तमुक उद्योग अशा शब्दांमुळे 'उद्योगा'ची प्रतिष्ठा वाढते. कदाचित जागतिकीकरणाने निर्माण केलेले हे नवे वास्तव, असे आपण म्हणू शकू, म्हणूनच कदाचित अशा शब्दांकडे गांभीर्याने बघायचे कारणही नाही असेही कोणी म्हणेल. पण 'संस्कृती' या शब्दाबाबत मात्र असे म्हणता वा करता येणार नाही. 'संस्कृती' हा शब्द खूपच व्यापक असून तो 'धर्म' या शब्दापेक्षाही मोठा मानला जातो व आहे. एखाद्या व्यावहारिक शब्दाला 'संस्कृती' हा शब्द लावण्याची सध्या फॅशन झाली आहे. उदाहरणार्थ, खाद्यसंस्कृती, मद्यसंस्कृती, कार्यसंस्कृती वगैरे. बऱ्याचदा इंग्रजी शब्दांचे प्रतिशब्द म्हणूनही यांचा वापर होतो. म्हणूनच त्या त्या विशिष्ट क्षेत्रातील प्रश्नांचा, तपशिलाचा विचार करताना 'संस्कृती' हा नंतर चिकटलेला शब्द आपण फारसा गांभीर्याने घेत नाही. 'संस्कृती आणि उद्योग' हे दोन्ही शब्द व्यवहारात जवळपास सारख्याच पध्दतीने वापरले जातात. खरे तर हे योग्य नाही, पण एवढे भाषिक भान दाखवायला कुणाला वेळ नाही व त्याची गरजही कुणा मराठी अभिजनांना वाटत नाही. त्या ऐवजी मराठी भाषेचा उथळ व हिंसक अभिमान बाळगणे सोईचे असते, तेवढी मारपीठ केली की आपली भाषिक कर्तव्ये संपतात.

यामुळेच आजकाल 'संस्कृती' हा शब्द लावून 'वाचन संस्कृती' असा शब्द वापरण्याचा प्रघात पडला आहे. अनेक साहित्यिक, सांस्कृतिक कार्यक्रमाच्या व्यासपीठांवर हा शब्द सध्या उच्चरवाने वापरला जात आहे. हा शब्द वापरण्यामागे वाङ्मयीन पर्यावरणातले घटक आघाडीवर आहेत. पुस्तकांच्या खपांचे आकडे समोर टाकून वा ठेऊन वाचन संस्कृती कशी पसरत आहे व रुजत आहे, हे सध्या ठसवले जात आहे. म्हटले तर हा एक प्रकाशकीय 'उद्योग' आहे. कारण त्यांना आपला पुस्तकांचा 'माल' खपवायचा असतो. त्यांच्यासाठी लोकांनी 'वाचले' पाहिजे, हे आवश्यक आहे. त्यामुळे वाढत्या खपाचे वर्णन जणू काही रुजणारी 'संस्कृती' या शब्दाची जोड देऊन ते करतात. एवढेच ! संमेलनातून अनेक पुस्तकांचे स्टॉल्स लागतात. ग्रंथजत्रा भरतात. त्याही वेळी किती खप झाला याची चर्चा प्रामुख्याने होत असते. वाचन संस्कृतीचा 'खप' हा जणू एकमेव दर्शक (Indicator) आहे, असे आज मानले जाताना दिसते. त्यामुळे 'काय' वाचले जाते ? व 'काय' वाचायला हवे, यांसारखे प्रश्न चर्चेतून बाजूलाच पडतात. वाचनातून व्यक्ती व समूहाच्या वर्तनात काय घडते, काय घडायला हवे याची चर्चा आणि संस्कृतीशी संबंध जोडायचा तर वाचन व्यवहाराचा आणि संस्कृतीचा संबंध काय असतो, सध्या काय दिसतो अशा प्रश्नांची चर्चा या चर्चाविश्वात प्रविष्टच होत नाही. म्हणून तूर्तास 'संस्कृती' हा शब्द आपण (सुसंस्कृतपणे, दुर्लक्षाने नव्हे) बाजूला ठेवून याचा विचार करायला हवा. खरे तर आपण 'वाचन सवयी' हा शब्द Reading Habits या अर्थाने वापरायला हवा. 'सवयी' हा शब्द जास्त नेमका होईल, कारण संस्कृतीत 'सवयी' सामाविष्ट

होतात, पण केवळ 'सवयी' म्हणजे संस्कृती म्हणता येत नाही. शिवाय 'संस्कृती' या शब्दाच्या व्यापकपणाचे दडपणही आपल्या 'वाचन सवयी' समजावून घेताना आड येणार नाही.

वाचन या गोष्टीचा थेट संबंध साक्षरतेशी आहे, पण ही साक्षरता कामचलाऊ असून उपयोग नाही. अगदी महाराष्ट्रापुरता विचार केला तरी काय चित्र दिसते ? महाराष्ट्राची लोकसंख्या दहा कोटीच्या आसपास. साक्षरता सुमारे ७५% ते ८०% (स्त्रीपुरूषांची मिळून व स्त्रियांची साक्षरता-त्यांच्या घटत्या जन्मदराप्रमाणे पुरूषांच्या मानाने कमीच आहे.) म्हणजे जवळपास ७/८ कोटी महाराष्ट्रात साक्षर आहेत. यात साक्षरतेचा प्राथमिक भाग पूर्ण केलेली म्हणजेच लिहिलेले वाचता येणे, सही करता येणे या प्रकारची कामचलाऊ साक्षरता संख्येने बऱ्यापैकी आहे व यांचा वाचन व्यवहाराशी संबंध कमीच आहे. मराठीत एखाद्या पुस्तकाचा जास्तीत जास्त खप कितीही आवृत्त्या निघाल्या तरीही कोटीच्या घरात जात नाही, म्हणजेच पुस्तके वाचणाऱ्यांची संख्या साक्षर लोकसंख्येच्या सुमारे १/७ एवढीसुध्दा नाही. म्हणजेच 'वाचन संस्कृती' असा गंभीर शब्दप्रयोग केल्याने या संस्कृतीची कक्षा तर विस्तारत नाही, उलट ही संकृती (अनेकार्थाने) किती संकुचित आहे, हेच स्पष्ट होते. या वाचणाऱ्या मंडळींमध्ये पुन्हा अनेक स्तर आहेत. काही केवळ वृत्तपत्रे वाचतात, त्यातही विशिष्ट कारणासाठी वाचणारेही आहेत. उदाहरणार्थ, मटक्याचे आकडे, लॉटरीचा निकाल, चुटके, राशीभविष्य, मनोरंजक (व उथळ) चुरचुरीत बातम्या, उत्तान छायाचित्रांच्या रंगीत सिनेपुरवण्या अशा अनेक कारणांनी वृत्तपत्रे वाचली जातात. (खपातला जाहिरातदार हा घटक इथे विचारात घेतलेला नाही.) अग्रलेख, मधल्या पानावरचे लेखन, रविवार आवृत्त्यांमधले विशेष लेखन, परिसंवाद, वाचकांचा पत्रव्यवहार यासाठी वर्तमानपत्रे वाचणारे पुन्हा थोडेच आहेत. मराठीतील कोणत्याच वृत्तपत्रांचा रोजचा खप १०/१२ लाखांपर्यंत जात नाही. जे वर्तमानपत्रांचे तेच पुस्तकांचेही. बड्या-बड्या ग्रंथजत्रांमध्ये, साहित्य संमेलनांमध्ये करोडो रुपयांची विक्री होत असल्याचे आपण ऐकतो-वाचतो. या खपाची साहित्यप्रकारावर आधारित अचूक वर्गवारी आज उपलब्ध नाही. पण निरीक्षणांनी जे दिसते त्यात क्रमिक पुस्तके, स्पर्धापरिक्षांची पुस्तके, छंद, विपणनशास्त्र, विविध कौशल्ये, पाकशास्त्र, धार्मिक या प्रकारातल्या पुस्तकांचा खप लक्षणीय आहे. ललित साहित्य या प्रकारांमध्येही कथा-कादंबऱ्या या कवितांपेक्षा थोड्या जास्त खपतात. महाराष्ट्रात कविता वाचण्याऐवजी 'ऐकण्याची' प्रथा अधिक मान्यता पावली आहे. ललित प्रवासवर्णनांना तुलनेने कमी मागणी. वैचारिक वाङ्मयाची गोष्ट तर करवयासच नको. अतिशय दर्जेदार असणाऱ्या वैचारिक पुस्तकांचा खप २/३ आवृत्त्यांपलीकडे जात नाही. अपवादात्मकरित्या एखाद्या वैचारिक पुस्तकाची दुसरी आवृत्ती वर्षभरात निघते. पुन्हा ही पुस्तके खपली तर ती महाविद्यालये, शाळा, विद्यापीठे यांच्या ग्रंथालयात जातात, तेथेही ती बऱ्याचदा वाचकांची वाट पाहत धूळ खात पडून असतात. फार थोड्या वाचकांकडून त्यांची हाताळणी होते. कित्येक नामांकित वाचनालयांची पुस्तक खरेदी तपासली तर वाचकांनी आवर्जून वाचलीच पाहिजेत, अशी कित्येक पुस्तके खरेदीच होत नाहीत. आजच्या वाचक व वाचाळ मध्यमवर्गाचा फुरसतीचा वेळ व माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेतला तर मोठ्या प्रमाणावर ग्रंथांचे वाचन हे त्या त्या क्षेत्रातील अभ्यासकांपुरतेच राहणार असे दिसते. पूर्वी अतिशय गाजलेले ग्रंथ हप्त्याहप्त्यांत का होईना वाचले जायचे, आता तेही अशक्य दिसते. उर्वरीत वाचक चटपटीत कथा-कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या (ज्यातून इतिहास शोधण्याचा वा कादंबरीलाच इतिहास समजण्याचा वेडगळ प्रयत्न होतो, तो वेगळाच) चरित्र-आत्मचरित्रे, व ललित लेखन यातच घुटमळत राहतो. अलीकडे स्त्रियांचेही वाचनगट, वाचन भिशीगट तयार होताना दिसतात. एक प्रक्रिया म्हणून अशा गटांचे स्वागतच करायला हवे. अस्वस्थ करणारे ललित लेखन, तसेच कादंबऱ्या, सामाजिक विषयांवरील पुस्तके, वगैरे अशा गटांमध्ये प्रामुख्याने वाचले जाताना दिसते. पण या प्रकारच्या वाचनातून येणारी आत्मसमृद्धता, जाणिवेची संपन्नता, या गटांच्या सामाजिक व्यवहारात प्रकट होताना दिसत नाही. अशा गटांची किंवा व्यक्तिश: असे वाचन करणाऱ्यांपैकी बहुसंख्याकांची सामाजिक मूल्ये, सामाजिक जाणिवा फारच क्षीण असल्याचे प्रत्ययाला येते. राजकीय-सामाजिक प्रश्नावरचे या वाचकवर्गाचे भाष्य येथे ऐकायला मिळते, तेथे अत्यंत उथळ, वरवरची, पूर्वग्रहदूषित विधाने ऐकून या गटांची कीव करावीशी वाटते.

इतिहास, परंपरा, वर्तमान राजकारण, समाजकारण, संस्कृतिकारण यांच्या चर्चा आज वैचारिकदृष्ट्या पोकळ, पूर्वग्रहाने युक्त अशा होताना दिसतात. राजकारणाबद्दलची व नव्या सामाजिक गटांच्या सहभागाने नित्य विस्तारणाऱ्या राजकीय प्रक्रियेविषयीची तुच्छता तर ठायी ठायी दिसते, पण नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांची व सकारात्मक पुढाकाराची जाणीव त्या मानाने क्षीणच दिसते. विधायकतेच्या नावाखाली वरवर राजकारणाचा संबंध नसलेले जे समाजकारण-संस्कृतिकरण आज दिसते, (उदाहरणार्थ, महारांगोळी, मेंदी, खुस-खुशीत आत्मकथनात्मक कार्यक्रम, प्रतिष्ठानांचे महोत्सव, दिवाळी पहाट, अनेक वृत्तपत्रांचे महिला, बालविषयक उपक्रम इत्यादी) त्याचेही स्वरूप, कसल्याचप्रकारच्या विसंवादाची वा संघर्षाची जाणीवही होऊ देत नाही. त्यामुळे प्रश्न आहेत पण सकारात्मक सामाजिक जाणिवा नाहीत, अशी चिंता उत्पन्न करणारी स्थिती आज पाहायला मिळते. आजच्या वाचनप्रेमींचे जीवनव्यवहारही

त्यांच्या आधीपासून चालत आलेल्या मूल्यांनी प्रेरित असतात. त्यात वाचनाचा प्रभाव म्हणून फार मूलगामी बदल होताना दिसत नाहीत. म्हणून अस्वस्थ करणारी पुस्तके वाचली जाऊनही ही अस्वस्थता सामाजिक उपक्रमांशी कृतिशीलपणे मोठ्या प्रमाणावर जोडून घेतली जाताना दिसत नाही.

आजच्या वाचनप्रेमींमध्ये अनेक मोठे सरकारी अधिकारी, इतर क्षेत्रातील, कंपन्यांमधील उच्चपदस्थ, कलावंत यांचाही समावेश होतो. एका अर्थाने आधुनिकत्व, आधुनिक विचार, आधुनिक मूल्ये यांच्याशी परिचय असणाऱ्या अशा व्यक्तींची खासगी जीवनमूल्ये तपासली तर वाचन व्यवहाराचा कोणताही व्यावहारिक परिणाम यांच्या सवयी व व्यवहारांवर झालेला सापडणार नाही. आपण वाचनसंस्कृतीचे (प्रतिष्ठित) वाहक आहोत व आपण वाचतो, याचा अभिमान बाळगणारे आजचे मध्यम-उच्चमध्यमवर्गीय सामाजिक गट, त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील धार्मिक, सांस्कृतिक व्यवहार उंची वस्त्रालंकार, संपत्ती, दागिने इत्यादींचे प्रदर्शन करून पार पाडतात. मानसिक बौद्धिक पातळीवर स्वत:ला प्रगल्भ मानणारे हे गट मूल्यपातळीवर 'वाचन प्रभावाच्या' बाहेरच राहताना दिसतात. हे गट ते स्वत: मानत असलेला त्यांचा तथाकथित वरचा दर्जा, प्रतिष्ठा व व्यवस्थेतील त्यांचे हितसंबंधांवर आधारित कौटुंबिक व सामाजिक व्यवहारांना कोणताही धक्का न लागणाऱ्या चौकटीतच त्यांचा वाचनप्रभाव मर्यादित राहील याचाही प्रयत्न करतात. शेतकरी शेतीची मशागत करतात, तर लेखक माणसांच्या मनाची मशागत करतात, असे आपण गौरवाने म्हणतो. शेतीतली मशागत समाजाला उपयुक्त असणारे पीक निर्माण करते. मात्र आजच्या संदर्भात मनाची मशागत कोणतेच पीक निर्माण करत नाही असे दिसते.

लोकशाही राज्यपद्धती व घटनेने दिलेली नागरी स्वातंत्र्ये हा आपल्या सर्वांच्या जगण्याचा आधार आज अधिकाधिक औपचारिक ठरत असल्याचा प्रत्यय देणारा आजचा काळ आहे. या काळातील जगण्याचे आधार आता जीवघेणी स्पर्धा, द्रव्यबळ, माध्यमे, बाजारपेठ व हिंसा या पंचशीलांनी व्यापले आहेत. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी साध्य-साधनांची तमा न बाळगणारे मानस, द्रव्यबळाची निरंतरता टिकवण्यासाठीची (क्रूर वाटणारी) धडपड, माणसांच्या सामाजिकतेचा अवकाश कमी करणारी व त्याला मट्ठ प्रेक्षक बनवणारी माध्यमे, जीवनाची सर्व क्षेत्रे बाजारपेठेच्या नियमात आणण्याचे आजचे नवभांडवलशाहीचे प्रयत्न व आपापली राजकीय-सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी बिनदिक्कत हिंसेचा वापर करणारे सामाजिक गट या साऱ्यांचा परिणामी माणसाची 'सामाजिकता' आज संकोच पावताना दिसते आहे. आर्थिक, भौतिक व मानसिक सुरक्षा हेच आज वांछनीय उद्दिष्ट बनू पाहत आहे. दुसऱ्या बाजूला केवळ हक्कांच्या विस्ताराच्या आग्रहातून व जगण्याच्या हव्यासी पद्धतीतून फोफावणारा व्यक्तिवाद व्यक्तिस्वातंत्र्याला पर्याय बनू पाहत आहे. माणसांचे व्यक्तिमत्वच जिथे दुभंगत आहे तिथे माणसांच्या 'जाणिवा' स्वतंत्र होणे दुरापास्त वाटावे असा आजचा माहोल आहे. संवेदनशीलता व सोशिकता-सहनशीलता यांचा अंत होतो की काय, याची भयशंका निर्माण व्हावी अशा आजच्या सामाजिक स्थितीत जीवनाला गांभीर्याची बैठक असावी, या ऐवजी नागरिकत्वाकडून मट्ठ ग्राहकत्वाकडे प्रवास करणे माणसांना सोपे जाते असे दिसते.

लेखक-वाचक एकमेकांना घडवतात असे मानण्याचा काळ आता मागे पडून वाचक आता लेखकांना घडवत आहे, हे त्यामुळेच म्हणावे लागते. स्वत:च्या कविता, कथा, कादंबऱ्या, ललित लेखन यापैकी प्रेक्षकांना काय रुचेल/आवडेल, त्याचे तंत्रबद्ध सादरीकरण करून श्रोते/प्रेक्षकांची/भूक भागवण्याच्या मनोरंजन उद्योगात अनेक लेखक आता दिसू लागले आहेत. हे लेखक (खरे तर उत्पादक) या सादरीकरणाद्वारा आपल्याच साहित्यकृतींचे (विकाऊ) उत्पादनात (Product) रुपांतर करत आहेत. या पुढच्या काळात वाचकांनी लेखकाला घडवण्याचा हा उत्पादक उद्योग आपल्या वाङ्मय व्यवहारात वाढला व अधिकाधिक वाचककेंद्री उत्पादनाच्या स्वरूपात साहित्यकृती पुढे आल्या तर आश्चर्य वाटायला नको. त्यामुळेच या क्षेत्रात आता मागणी-पुरवठ्याचा अर्थशास्त्रीय सिद्धान्त प्रत्ययाला येत आहे.

आजचा प्रकाशकीय व्यवहार वाचकांकडे 'ग्राहक' म्हणून पाहतो, त्यामुळे त्याच्या लेखी 'खप' हा उत्पादनाचा मुख्य निकष राहतो. आपल्या जीवनाला एक गंभीर बैठक आवश्यक आहे, ही जाणीवच ज्या आजच्या 'ग्राहक' समाजात क्षीण होत आहे, त्या समाजात चांगला वाचक, चांगला लेखक तयार होण्याची प्रक्रियाही कठीण व दुर्मिळ असणार. जगण्याच्या इतर व्यवहारातील 'जमले तर एक काम करायचे' ही समज आजच्या वाचनसवयीच्या मुळाशी दिसते. त्यामुळे वाचन करणे म्हणजे विचार करणे, तो अनुभव, भोवतालचे वास्तव याच्याशी ताडून पाहणे व त्यातून शक्य त्या कृतीची वाट शोधणे वा अशा कृतीशी शक्य त्या पातळीवर जोडून घेणे, ही प्रक्रियाच घडत नाही. म्हणूनच अशा प्रकारचे आवाहन व आवश्कता नसणारी 'वाचा व विसरा' अशा स्वरूपाची वाचनप्रक्रिया जोरदार वाढताना दिसते. ऐतिहासिक कादंबऱ्यांचा खप, स्वयंपाक व तत्सम माहिती देणाऱ्या (व्यावसायिक) पुस्तकांचा वाढता खप याची साक्ष देतो. ज्यांना मुळातच सामाजिक जाणिवा, परंपरा वा संस्काराद्वारा मिळाल्या आहेत, ते वाचनप्रक्रियेकडे डोळसपणे पाहतात. पण जे केवळ पारंपरिक मूल्य चौकटीत घडले. त्यांची सामाजिक जाणीवबुद्धी आजच्या वाचन संस्कृतीत 'स्वतंत्र' होताना दिसत नाही.

'जाणीव' स्वतंत्र होणे ही कोणत्याही सामाजिक कृतींची पूर्वशर्त असते. आजची तथाकथित वाचन संस्कृती-जी ग्राहकीय सामाजिकतेत जोपासली जातेय तेथे, ही जाणीव स्वतंत्र करायला उपकारक ठरत नाही. हे आजचे कटु वास्तव आहे. म्हणूनच वाचक व्यासपीठे, वाचक भिशी इत्यादीं सारखं व तत्सम उपक्रमांची संख्या, वाढती असूनही, (जीवन गांभीर्याच्या बैठकीअभावी) साप्ताहिके, पुरवण्या, दिवाळी अंक, विशेषांक यांचा प्रचंड मारा होत असूनही आपली सामाजिक जाणीव व तिच्याशी संबंधित वर्तुळे विस्तारताना दिसत नाहीत. केवळ आपली वाचनसाक्षरता टिकून राहणे वा ठेवणे हेच मोठ्या प्रमाणावर आपल्या वाचन सवयीचे स्वरूप व प्रयोजन दिसते. सत्ता-संपत्ती-ऐश्वर्याचे ओंगळ प्रदर्शन, अधिकाधिक अ-सामाजिक होऊन जगणे 'वैयक्तिक' होत होणे, हिंसक व आक्रमक पद्धतीने आपल्या अस्मिता जोपासणे, गोंजारणे, अन्यायअत्याचाराच्या संदर्भात 'मूक' राहणे, सार्वजनिक प्रश्नांवर 'संवेदनशून्य' राहणे आदी आपले मूलभूत दुर्गुण आपल्या वाचन सवयींच्या कक्षेबाहेरच राहिल्याचे दिसते. ते या उथळ वाचन साक्षरतेमुळेच. म्हणूनच 'वाचन' शब्दाच्या जोडीला 'संस्कृती' हा शब्द लावण्याची गंभीर चूक आपण सहजपणे नेहमीच करत असतो, पण प्रत्यक्षात 'संस्कृती'पासून आपण शतयोजने दूर असतो हे आपल्या अस्मितांच्या आपल्यावरील विध्वंसक प्रभावावरून सहज स्पष्ट होते. अन्यथा ज्या समाजात वाचन संस्कृती रुजत आहे असा आपला दावा आहे, त्या नागरी समाजात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या दिवसेंदिवस होणाऱ्या संकोचाने काही ना काही खळबळीची, प्रतिकाराची चुणुक दिसायला हवी होती व ती व्यापकही व्हायला हवी होती. 'वाचन संस्कृती'च्या आजपर्यंतच्या चर्चेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संकोचाची दखल न घेता ती रुजते आहे, असे म्हणणे हे कोडग्या मनाचे लक्षण ठरते. म्हणूनच अस्मितांच्या विध्वंसक प्रभावावर मात करणाऱ्या वाचन सवयी ज्या दिवशी आपण निर्माण करू, त्याच दिवशी 'वाचन संस्कृती' या शब्दप्रयोगाला आपण पात्र ठरू, असे म्हणावेसे वाटते, ते त्यामुळेच.

❖ ❖ ❖ ❖

शारदीय व्याख्यानमालेच्या या उपक्रमात साताराचा एक अभ्यासक म्हणून मला बोलायची संधी मिळाली हा मी माझा सन्मान समजतो.

आपल्या भावी वाटचालीस शुभेच्छा !

**(अ.ह. जोशी)**

---

नगर वाचनालय, मोठ्या प्रमाणावर स्पर्धा घेत आहे, हीच गोष्ट अभिमानास्पद आहे.

आजचा कार्यक्रम अनेकांच्या सहकार्यातून उत्तम पार पडला. भरघोस बक्षिसे होती. विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद ओसंडून जाणारा होता.

सर्व टीमवर्कचे अभिनंदन.

**(विनिता जोशी)**



# गाव तेथे ग्रंथालय आणि ग्रंथालय चळवळ

सौ.नंदा जयसिंग जाधव

ग्रंथालयांना द्याल समृध्दी । वाढेल जनमनांची बुध्दी ।।
गाव तेथे ग्रंथालय चळवळ प्रसारात व्हावया वृध्दी
मंत्र्यासह सर्वांनी व्हावे ऋध्दी सिध्दी ।।

१९६७ साली ग्रंथालय कायदा झाला. आज या गोष्टीला जवळजवळ ४६ वर्षे पूर्ण झाली आहेत. तरी देखील 'गाव तेथे ग्रंथालय' ही संकल्पना राबविण्यात आपल्याला ५०% देखील यश आलेले नाही. महाराष्ट्रात केवळ ७५०० पर्यंत ग्रंथालय कार्यरत आहेत. व्यावसायिक आणि शैक्षणिक दृष्ट्या ही संख्या अल्प आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि सुसंस्कृत घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे. आणि ग्रंथालय हे शिक्षितांना सुशिक्षीत आणि सुसंस्कृत करण्याची प्रभावी साधन आहे. असे असताना आपल्या महाराष्ट्रात ग्रंथालये उत्साहाने चालू केली जातात आणि कारणांमुळे अल्पावधीत ती अकार्यक्षम होऊन हळूहळू ती बंद पडतात. ती का बंद पडतात याचा मागोवा शासनाने घ्यायला हवा.

ग्रंथालयातील महत्वाचे घटक म्हणजे वाचक, ग्रंथ आणि ग्रंथपाल. सध्या दृकश्राव्य माध्यमांमुळे समाजातील सर्व स्तरातील वाचनाकडे वळविणे जिकीरीचे काम झाले आहे. स्वस्त वर्गणीमध्ये चांगल्या दर्जाचे वाचन साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रंथालयांना अनुदान अपुरे पडते. त्यामुळे ग्रंथालयापुढे डोंगराएवढ्या समस्या आहेत. शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे त्यात वाढच होत आहे. वाढत्या किंमतीमुळे दर्जेदार साहित्य घेताना ग्रंथालयाची दमछाक होते परिणामी सुसंस्कृत वाचक वर्ग ग्रंथालयाकडे दुर्लक्ष करतो. स्वबळावर ह्या संस्था चालविण्याइतपत लोकवर्गणी जमा होत नाही. परिणामी ग्रंथालयांना ना जनाधार लाभला ना शासनाने प्रोत्साहन दिले.

ग्रंथालयामध्ये वाचक, ग्रंथ असले तरी ग्रंथपालाशिवाय ग्रंथालय चालविणे अशक्य आहे. ग्रंथपाल हा केवळ सेवक नसून वाचनालयात येणाऱ्या वाचकांचा मार्गदर्शक ही असतो. सध्याच्या माहितीच्या युगात आणि इंटरनेटच्या जगात ग्रंथपालावरील जबाबदारी वाढली आहे. समाजातील अनेक मोठ्या व्यक्तिंना घडविण्यात ग्रंथालयाचा ग्रंथाचा आणि ग्रंथपालाचा सहभाग असतो. काळाची पावले ओळखून जो आपलं ग्रंथालय अत्याधुनिक करण्याचा जमेल तेवढा प्रयत्न करतो तो खरा ग्रंथपाल. ग्रंथपाल हे पद मोठे वाटत असले तरी सार्वजनिक ग्रंथालयामध्ये वाचक, ग्रंथ असले तरी ग्रंथपालाशिवाय ग्रंथालय चालविणे अशक्य आहे. ग्रंथपाल हा केवळ सेवक नसून वाचनालयात येणाऱ्या वाचकांचा मार्गदर्शक ही असतो. सध्याच्या माहितीच्या युगात आणि इंटरनेटच्या जगात ग्रंथपालावरील जबाबदारी वाढली आहे. समाजातील अनेक मोठ्या व्यक्तिंना घडविण्यात ग्रंथालयाचा ग्रंथाचा आणि ग्रंथपालाचा सहभाग असतो. काळाची पावले ओळखून जो आपलं ग्रंथालय अत्याधुनिक करण्याचा जमेल तेवढा प्रयत्न करतो तो खरा ग्रंथपाल. ग्रंथपाल

हे पद मोठे वाटत असले तरी सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपाल आणि तेथील सेवक वर्ग अत्यंत उपेक्षित राहिला आहे. त्याला कोणत्याही सवलती, रजा नाहीत. परिणामी ग्रंथपालाला ग्रंथालयाबद्दल आपुलकी वाटत नाही.

शासनाला जर खरोखरच 'गाव तेथे ग्रंथालय' ही संकल्पना राबवायची असेल तर ग्रंथालय कार्यकर्ते, वाचक, ग्रंथपाल आणि शासन धोरण यांचा सहभाग महत्वाचा आहे. केवळ कधीतरी अपुरे अनुदान वाढवून ग्रंथालये सुस्थितीला येणे अशक्य आहे.

ग्रंथालय चळवळ सुदृढ होण्याकरिता दात्याचे दातृत्व, कार्य कार्याचे कर्तृत्व चळवळीतील नेतृत्व आणि शासनाचे पितृत्व मिळाले तर ग्रंथालय चळवळीला गती येईल आणि ग्रंथालयांना उर्जितावस्था प्राप्त होईल.

साहित्यामुळे संस्कृती घडते.
वाचनाने माणूस घडतो.
माणसा माणसाने देश घडतो. असतो.

तर असे 'ग्रंथमात्र धांडोळणारे' 'वाचिलेची असणारे' वाचक म्हणजे ग्रंथालयाचा पाठकणा असतात. असे ज्ञानाची लालसा असणारे वाचक, त्यांच्यासाठी सेवा-सुविधा पुरविण्यासाठी धडपडणारे दूरदृष्टीचे संचालक, सेवातत्पर ग्रंथालय सेवक यांची प्रदीर्घ परंपरा साताऱ्याच्या नगर वाचनालयाला लाभली आहे. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काल' निश्चितच असतो.

❖ ❖ ❖ ❖

'बालगंधर्व लिहिताना' या विषयावर बोलण्यासाठी परत नगर वाचन मंदिरात आलो. आता हे माझं 'होम ग्राऊंड' भासणारे व्यासपीठ झालंय.

उत्तम पुस्तकांचा संग्रह, मनमिळाऊ स्टाफ आणि दर्दी प्रेक्षक - श्रोते त्यामुळे आनंददायी असतं इथं येणं, ऐकणं, बोलणं !

**(अभिराम भडकमकर)**

---

राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त नगर वाचनालयामध्ये आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटन निमित्ताने दूरदृष्टीच्या समाजधुरीण व्यक्तिमत्वाचा पुसटसा स्पर्श स्वतःच्या व्यक्तिमत्वाला होऊ देण्याची संधी आज लाभली ! या प्रकारचे उपक्रम सातारकरांना खचितच 'पोषक' ठरतील ! धन्यवाद !

**(डॉ. अनिमिष चव्हाण)**

---

एखादे ग्रंथालय १६० वर्षे सुरू रहावे हा वाचन संस्कृतीचा मोठा विजय आहे. नेटाने आणि निष्ठेने ही ग्रंथदिंडी विद्यमान पदाधिकाऱ्यांनी पेलून धरली आहे. त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. गेली ३० वर्षे मी या वाचनालयात येतो आहे. ते सतत प्रगत होत आहे हे पाहून मोठे समाधान वाटते. अशीच उत्तरोत्तर प्रगती या ग्रंथालयाची होत राहो.

**(सुनिल चिंचोळकर, पुणे)**



# मुक्काम पोस्ट नगर वाचनालय, सातारा

सौ.कुंदा कुलकर्णी

मी.सौ.कुंदा कुलकर्णी. वर दिलेला माझा कायमचा पत्ता. २९ वर्षापुर्वी आम्ही सातान्यात आलो. ४-५ घरात भाड्याने राहिलो. समाजकार्याची आवड व माणसे जोडण्याची आवड यामुळे पत्र व्यवहार प्रचंड, (मोबाइलमुळे आता आटोक्यात आला) बँक L.I.C. पोष्ट इथे संगणकीकरणामुळे जुनेच पत्ते राहिले. टपाल त्या त्या पत्यावर येतं मग घरमालक त्यावर मु.पो.नगर वाचनालय असा शेरा मारुन पोष्टमनकडेच परत देतात. सध्या मी ''आनंदवन'' मध्ये दुसऱ्या मजल्यावर रहाते. मग पोष्टमन देखील पायऱ्या चढण्याचा त्रास न घेता मु.पो.नगर वाचनालय लिहून आपली जबाबदारी पूर्ण करतात. कांही का असेना माझे टपाल योग्य वेळी मला अचूक मिळते.

मला व माझ्या मुलांना वाचनाची अतोनात आवड. सातारला आल्यानंतर पहिली चौकशी केली. वाचनालयाची व लगेच सभासद झाले त्यावेळी टी.व्ही नव्हता. त्यामुळे रोजचे पेपर्स, मासिके वाचण्यासाठी मी व माझी मुले रोज वाचनालयात जात असू. त्यावेळी आम्हाला इतर कुठलीही चैन (सिनेमा,नाटक) परवडत नव्हती पण या वाचनालयाने आम्हाला खूप विरंगुळा दिला.

२००९ साली मुलांनी स्वत:चा प्लॅट घेतला पण तोपर्यंत भाड्याची चार घरे बदलून झाली होती. बदललेले पत्ते शक्य तितक्या ठिकाणी मी कळवत गेले पण अजुनही विशेषत: बँक, पोष्ट, L.I.C. (संगणकीकरणामुळे) जुन्या पत्यावरच पत्र व्यवहार होतो. लग्न पत्रिका, भेटकार्डे वगैरे पत्रे अजूनहि जुन्या कुठल्यातरी पत्यावर येतात. पण आमचे हुशार घरमालक c/o नगरवाचनालय सातारा असे लिहून परत करतात. नगर वाचनालयाचे सेवक मी दिसताक्षणी माझ्याकडे सुपुर्द करतातं. समाजकार्याची आवड, अनेक संस्थांत पदाधिकारि, असंख्य नातेवाईक व स्नेहीजन त्यामुळे माझा जनसंपर्क बराच मोठा आहे. बरेचजण तिथेच भेटतात व न चुकला पीर मशिदीत प्रमाणे तुम्ही रोज इथे येताच असे कळले म्हणून आले.'' असा खुलासा देतात. वेळेची बचत होऊन अनेक समाजोपयोगी कामे मला तिथे सहज करता येतात.

वाचनालयात सतत अनेक कार्यक्रम होत असतात. त्यानिमित्ताने वाचन, श्रवण, चिंतन, मनन होते. अनेक मान्यवरांच्या ओळखी होतात. संसार, नोकरी या चक्रातून मधली ३० वर्षे व्यासपीठ लाभले नव्हते. वाचनालयात अनेक कार्यक्रमांचे सूत्र संचालन करण्याचे भाग्य मिळाले. त्यात सहभागी होताना मनापासून आनंद होतो.

माझी सध्याची ओळख ''नगर वाचनालयाच्या कुलकर्णी मॅडम'' अशीच आहे. मी कोणत्याहि कार्यालयात कामानिमित्त गेले कीं माझे काम शांतपणे ऐकून घेतले जाते. वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन लावला जातो. नगर वांचनालयाच्या कुलकर्णी आल्या आहेत. अमुक काम आहे.'' ताबडतोब माझे काम

''फत्ते'' होते. अनेक प्रसंगी अनेक व्यक्ति भेटतात ओळखीच हासू दाखवतात. माझ्या चेहऱ्यावरचे अनोळखी भाव टिपून खुलासा करतात. तुम्ही नगर वाचनालयाच्या ना? आम्ही तुम्हाला ओळखतो. वगैरे.

मी मुळातच माणूसवेडी आहे. वाचनालयाने मल असंख्य सुहृद दिले. इथल्या ओळखीमुळं अनेक ठिकाणी निवेदक, परीक्षक, अध्यक्ष या नात्याने आमंत्रणे मिळत गेली. प्रत्येक कार्यक्रम वेगळा, विषय वयोगट, वातावरण पाहून बोलावे लागते. संदर्भासाठी वाचनालयात अनेक पुस्तकं मिळतात. ऐकणारे म्हणतात तुमच बोलण खूप अभ्यासू '' पण अंदरकी बात मी लगेच सांगते व तुम्ही ही सभासद व्हा वाचनाचा आनंद घ्या असे सांगून अनेकांना या वाचनालयाच्या छायेत आणून ज्ञानदानाचे पुण्य मिळवते.

वाचनालय माझे दुसरे घर आहे. नोकरीवरुन थकून रोज तिथे मी विरंगुळ्यासाठी जाते. अनेक मित्रमैत्रिणी, नातेवाईक भेटतात. विचारांची, निरोपांची, सुखदु:खाची, देवाण-घेवाण होते. थकवा कुठल्याकुठे पळून जातो. मस्तपैकी चार्जिंग होऊन नव्या उमेदीने मी घराकडे परतते.

२९ वर्षापुर्वी साताऱ्यात येतांना अनेक चिंता, व्यथा, वेदना प्रश्नचिन्हे होती. पण वाचनालयाने सावली दिली. दिलासा दिला. सौ.ज्योत्स्नाताईंच्या मार्गदर्शनामुळे भरपूर व्यासपीठ मिळाले. सेवक वर्गाने उदंड प्रेम दिले. कामसू, सेवाभावी सेवकवर्ग व तनमनधन अर्पून वाचनालयाला प्रगति पथावर नेणारे सर्व तज्ञ संचालक, मा.अध्यक्ष सी.व्ही.दोशी सर यांचे दृढ नेतृत्व यामुळे वाचनालयाचा वटवृक्ष दिवसेंदिवस जोमाने फोफावत आहे. आज वाचनालयाला १६० वर्षे पूर्ण झाली. त्यावर अनेक शून्य वाढत जातील. वाचनालय दिमाखाने ज्ञानदानाचे कार्य करत राहील. माझ्या प्रमाणेच अनेक जण नवीन नवीन पत्यावर बदलत गेले तरी कायमचा पत्ता मु.पो.नगर वाचनालय असे समजून संपर्कात आणि ऋणात रहातील. वाचनालयाच्या बाबतीत मूळ पंक्तीत थोडासा बदल करुन म्हणावे वाटते.

अनंतहस्ते पुस्तकरुपाने
देता किती घेशील दो करांने ?

❖ ❖ ❖ ❖

*सातारा येथील नगर वाचनालय पाहून आनंद झाला. दीडशे वर्षाहून ही जुने असे हे वाचनालय आहे. आरंभीच्या काळातील ग्रंथसंग्रह ही येथील अमूल्य ठेव होय. तिचे विशेष आस्थेने संरक्षण होणे अवश्य आहे. वाचना बरोबरच श्रवण हेही ज्ञान प्रसाराचे एक महत्वाचे साधन होय. या दृष्टीने सुरु केलेल्या वाख्यानमालांच्या उपक्रमाबद्दल मी कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.*

**(वि.भि.कोलते)**

---

*आज नगर वाचनालयात येण्याचा योग आला. इथलं कामकाज बघून आणि वाचकांची गर्दी बघून समाधान वाटलं.*

**(सरोजिनी बाबर)**

# असा बालगंधर्व...

**श्री.अभिराम भडकमकर**

("बालगंधर्व" या गाजलेल्या चित्रपटाचे लेखक, नाटककार, दिग्दर्शक, अभिनेते अभिराम भडकमकर यांची "असा बालगंधर्व..." ही पहिलीच कादंबरी राजहंस या मातब्बर प्रकाशनसंस्थेतर्फे येत्या सहा डिसेंबर रोजी नाट्यसंमेलनाध्यक्ष श्रीकांत मोघे यांच्या हस्ते व बालगंधर्व चित्रपटाचे कर्ते नितीन चंद्रकांत देसाई, ज्येष्ठ साहित्यीक विश्वास पाटील यांच्या उपस्थितीत प्रकाशीत होत आहे. त्या निमित्ताने या कादंबरी बद्दल...लिहिताहेत अभिराम भडकमकर)

नाट्यगुरु बी.व्ही.कारंत नेहमी सांगायचे, "नाटक मे स्पेशलायजेशन नामकी कोई चीज नहीं होती. कलावंतानं भरपूर मेहनत अभ्यास करावा आणि लहान मूल जसं जत्रेत सगळीकडे कुतुहल भरल्या नजरेनं पहात फिरत रहातं तसं फिरत रहावं. " नाटकं, सिनेमे लिहील्यावर अभिनय दिग्दर्शन करता करता कादंबरी लेखनाचा विचार मनात येणं हे माझ्या दृष्टीनं असंच काहीसं आहे. स्वत:च स्वत:वर शिक्का मारुन घेणं किंवा जगानं मारलेले शिक्के मुकाटपणे स्विकारत जगणं माझ्या स्वभावातंच नसावं.

या सगळ्याची सुरुवात झाली ती बालगंधर्व चित्रपटापासून. नितीन चंद्रकांत देसाईंनी हे वेडं धाडस करायचं ठरवलं, सुबोधनं पंधरावीस पुस्तकांचा गठ्ठा आणून टाकला.... आणि तेव्हा कल्पनाही नव्हती की या दोघांनी मला गंधर्वनगरीत आणून सोडलय... आणि सिनेमानंतरही बराच काळ माझं इथे वास्तव्य असणार आहे.

राजहंस प्रकाशनचे श्री. दिलीप माजगावकर यांनी मला जेव्हा गंधर्वांवर चरित्र लिहीणार का असं विचारलं तेव्हा कादंबरी की चरित्रं असा एक विचार मनात आला. पण फॉर्म चा विचार न करता मनातलं लिहून काढत रहायचं असं ठरवून मी लिहायला सुरुवात केली. ते करताना काय लिहायचं याचं एक धूसर रेखाचित्र मनात होतं पण काय लिहायचं नाही हे मात्र स्पष्ट होतं. कारण वि.ग.कानेटकरांचं एक विधान मला फारच आवडतं. ते म्हणतात, "इतिहास वाचून माणूस बेभान होतो, पण भानावर येतोच असं नाही. " मराठी संगीत रंगभूमीचा सुवर्णकाळ, ते वैभव, ऐश्वर्य हे वाचून वाचकानं आनंदानं बेभान व्हायला हवंच होतं, पण या सगळ्या वाचनप्रवासानं त्याला तो काळ, त्या काळाची आव्हानं, त्यातून घडलेली रंगभूमी, समाज या सगळ्याचं एकनव्यानं भान यायला हवं असं वाटत होतं. पण मीही एक नाटकवालाच. त्यामुळे माझ्या मनात गंधर्वांची इमेज जवळ जवळ देवत्वाचीच. त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकातूनही हीच प्रतिमा कसोशीनं जपलेली. त्यांच्या उतारवयातच त्यांना पाहिलेली माणसं आज हयात आहेत. तीही सत्तरी पार केलेली. त्यामुळे बालगंधर्व, तो काळ या बद्दल खूप हळवी... या सगळ्यातून या कादंबरीतून गंधर्वांच्या माणूसपणाचा शोध घ्यायला हवा असं वाटत राहिलं आणि त्यासाठी वास्तवतेचा पदर ढळू न देता त्या सगळ्या काळाचं एक कल्पनाचित्रं रेखाटत जायचं असं ठरवून टाकलं. आणि यासाठी गरजेचं होतं

कादंबरीचंच अवकाश. खरंतर गंधर्वांचं आयुष्यंच एखाद्या कादंबरी सारखं. त्यांच्या आयुष्यातले प्रसंग चढउतार पहाता ते कुणा नाटककारानं रचल्यासारखे... रंजक, उत्कंठावर्धक...रोमांचकारी. मुळापासून हलवून टाकणारे, डोळ्यात पाणी उभं करणारे ...चरित्रात लोकांच्या बोलण्यातून त्यांच्या विषयीच्या कथा दंतकथा, आख्यायिकांमधुन ते ऐकायला मिळतात. पण मला कुतुहल होतं ते या सगळ्या प्रसंगातून जाताना गंधर्वांची मानसिक स्थीती काय असेल ? आणि ती टिपणं, तिची कल्पना करणं मला खूप आव्हानात्मक वाटत होतं. अन्यथा गंधर्वांच्या गौरवार्थ पानं भरुन काढणं कठीणं नव्हतं. गंधर्वांचं आणि गंधर्वकाळाचं ग्लोरीफीकेशन करण्यापेक्षा त्या काळाची आणि त्या काळानं घडवलेल्या गंधर्वांचीही सर्वार्थानं चिकित्सा करण्याचं आव्हान मी समोर ठेवलं होतं.

सगळ्यात महत्वाचं कुतूहल होतं ते गंधर्वांमधल्या अभिनेत्याबद्दल. पुरुष जन्म घेतलेल्या, वागण्यात बोलण्यात हळुवारपणा असेल पण जराही स्त्रैणता नसलेले गंधर्व स्त्री भूमिकेत उभे रहात तेव्हा स्त्रीसौंदर्याचा तो अनुपम अविष्कार होता असं म्हटलं जाई, आणि नुसतं देखणेपणच नव्हे तर भारतीय स्त्रीत्वाची ते एक व्याख्याच बनुन राहिले होते. या भूमिका त्यांनी कशा साकार केल्या असतील याचा विचार मी करु लागलो. आपल्याकडे उत्तमोत्तम नटही आपल्या भूमिकांबद्दल फारसं बोलत लिहीत नाहीत. नटांच्या आत्मचरित्रात या अभ्यासाबद्दल फारच मोघम मतं मांडलेली दिसतात. पण तो काळ नाटक शिकण्या शिकवण्याचा होता. तालीम मास्तर भूमिका घोटून घेत. मग कशी चालत असेल देवल मास्तरांची आणि गंधर्वांची तालीम ? की सापडली असेल त्यांना शकुंतला, सुभद्रा, भामिनी ? याचा शोध घेताना मी नाट्यगुरु स्तानिस्लाव्हस्की यांच्या ॲन ॲक्टर प्रिपेअर्स या एन. एस. डी. त असताना शिकलेल्या पुस्तकाचा आधार घेतला. कल्पनेनी हे रंगवत असतानाच मला त्यांच्या व्यक्तीमत्वातले काही धागेदोरे त्या त्या भूमिकेच्या तयारीसाठी कसे मदतीला आले असतील याचा शोध लागत गेला. त्यांना भावलेल्या भूमिकेत समरसरुन जाणारे गंधर्व त्यांना न भावलेल्या भूमिकेतही गंधर्व यात येतात आणि एका नटाच्या नव्हे एका विलक्षण समर्थ नटाचा सगळा प्रवास यात उलगडत नेण्याचा प्रयत्न मी केला. पुरुष भूमिकेत स्वतःला बसवण्याचा प्रयत्न करणारे, चेहऱ्यावर वयाच्या खूणा उमटल्याचं जाणवत असताही लोकांसाठी, कंपनीसाठी लुगडं नेसून तरुण भूमिका निभवाव्या लागलेले गंधर्व....अशा कितीतरी छटा यात सापडत गेल्या.

त्यांच्या दैवी स्वरामागची मेहनत कष्ट आणि त्यातून आकाराला येत गेलेले ते गंधर्व संगीत. बखले बुवा, मास्टर कृष्णरावांच्या तालमीत घडत जाताना त्यांच्यातल्या त्या दैवी स्वराला कसे पैलू पडत गेले या सगळ्याचा एक धांडोळाच मी घेत गेलो. इथवर सगळचं ठीक होतं. पण गंधर्वांच्या वागण्यात दिसणारी विसंगती, अनाकलनीयता ही कोडी सोडवताना त्यांच्यातल्या देवत्वाचा अडसर बाजूला करुन त्यांच्याकडे पहाण अवघडंच होतं. विशेषतः माझ्यासारख्या नाटकवाल्याला ! पण विभूतीपूजेचा मोह निग्रहानं मागे सोडून दिला आणि गंधर्वांना जणू एका परिक्षानळीतच घालायचा उध्दटपणा करायला मी सिध्द झालो. गंधर्व असे का वागत असतील याचा विचार मी करत राहिलो. इतिहासात संदर्भग्रंथात सापडण्याऱ्या गंधर्वांच्या वागण्याचे निरनिराळे अर्थ लावत असताना मला जाणवलं की गंधर्व ही एक वेगळीच शोकांतिका आहे. ग्रीक शोकांतिकेत नायक हा नियतीच्या फटक्यांचा बळी असतो तर शेक्सपीअरच्या शोकांतिकेत तो स्वतःच्या स्वभावाचा बळी असतो. गंधर्वांना नियतीच्या उभ्या आडव्या फटक्यांना आयुष्यभर सामोरं ज़ात रहावं लागलं. जवळच्या माणसांचे मृत्यू, मित्रांकडून विश्वासघात तर झालाच. पण यंत्रयुगानं आणलेल्या बोलपटानं रंगभूमीला उतरती कळा लागणं, स्त्रीयांनी काम करायला सुरुवात करणं अशा कितीतरी गोष्टी घडत गेल्या. तर त्यांचा नातेसंबंधातला अती भोळसटपणा, हातचं न राखता सगळं काही उधळून टाकायची बेहिशोबी वृत्ती, हट्टीपणा, अव्यवहारीपणा, एकदा मनात घेतलं की कानच बंद करुन घ्यायची सवय...अशा कितीतरी स्वभावातल्या उणीवा त्यांना संकटात टाकत राहिल्या. मात्र सा सगळ्यातून ते जणूकाही स्वतःच्या चुकांचं प्रायश्चीत्त घेताहेत अशा भावनेनं स्वतःला त्रासवत रहाताना दिसतात. आणि हे गंधर्व समजून घेत मांडण मला गरजेचं वाटत राहिलं.

या सगळ्यातलं अवघड वळण म्हणजे गंधर्व गोहर यांचं सहजीवन. वयानं दुप्पट असलेल्या माणसाच्या प्रेमात पडणारी गोहर आणि कधीही कुणाही सौंदर्यवतीच्या मोहात न पडलेले प्रौढावस्थेकडे झुकलेले गंधर्व याच्यातल्या या भावबंधांची उकल करणं ! गोहरबाईंकडे आजवर नेहमीं आपल्याकडे नाराजीनं रागानं पाहिलं गेलंय. काहींनी त्यांना गंधर्वांच्या आयुष्यातल्या खलनायिकेचाच दर्जा बहाल केला आहे. गंधर्वांवर करणी केली असंही मानलं जातं. पण खरंच काय असेल हे नातं ? गोहरबाई गंधर्वांकडे येतात तेव्हा तेच विपन्नवस्थेकडे झुकलेले आहेत. मग सिनेमातली संधी सोडून या बाई का येतात, आणि गंधर्वही त्यांच्यासाठी जवळचे आप्तस्वकीय, सहकारी नाट्यकलावंत सगळ्यांकडे पाठ फिरवतात. हे कसे ? या नात्याचा वेध घेताना मी काही मानसशास्त्राच्या पुस्तकांचा आणि तज्ञांचा आधार घेतला, चर्चा केल्या. हे करताना कोण चूक कोण बरोबर याचा निवाडा करण्यापेक्षा मी काय घडलं असेल याचाच शोध घेत गेलो.

गंधर्वांच्या अखेरच्या कालखंडाबद्दल अनेकजण बोलायचं टाळतात, किंवा त्यांना ते आठवावंसही वाटत नाही हे मला जाणवत होतं. पण


मला हाच काळ विलक्षण आकर्षीत करत होता आणि या काळातले गंधर्वच मला खूप भावत राहिले. कारण या सगळ्या चढ उतारांकडे, ऐश्वर्यापासून विपन्नतेकडे केलेल्या प्रवासाला गंधर्वांनी तोंड दिलं ते मात्र एखाद्या निसंगसंतासारखं. विलक्षण कलंदरपणे वागलेला हा कलावंत अखेरच्या काळात तितक्याच तटस्थपणे जगताना दिसतो. एखाद्या योग्यालाही कठीण अशा स्थितप्रज्ञतेनं या सगळ्याला सामोऱ्या जाणाऱ्या गंधर्वांची उंची माझ्या मनात अधिक मोठी आहे. अणि म्हणूनंच माणूसपणाच्या निकषावर घासल्यावरही गंधर्व नामक हयातीतंच आख्यायिका बनून राहिलेल्या या कलावंताचं माणूसपण बावनकशी सोन्यासारखं लखलखतच राहतं. अणि लिहिता लिहीता त्याच्या प्रेमात पडत जाण्याला पर्याय रहात नाही.

हे करत जाताना मी या सगळ्यासाठी चरित्र कादंबीचा एक वेगळाच फॉर्म शोधला आहे...किंवा निवडला आहे म्हणा. ''असा बालगंधर्व'' ही कादंबरी म्हणजे फ्लॅशबॅक नाही तर त्याच अंगान जात जात या आजच्या पिढीच्या नजरेनं केलेलं त्या काळाचं, तो काळ घडवणाऱ्या माणसांचं केलेलं विश्लेषण आहे. आजच्या आधुनिक (पोस्टग्लोबलायझेशन) नजरेतून त्या काळचा घेतलेला वेध आहे. माझ्या माहितीप्रमाणे चरित्र कादंबरीचं हे एक वेगळं, नवं मॉडेल आहे.

हे सगळं करत असताना श्री. दिलीप माजगावकरांनी वेळोवेळी झालेल्या चर्चा, नितीन देसाईंची काळ समजून घेण्यासाठी झालेली मदत, इतिहासाचे अभ्यासक विश्वास दांडेकर, डॉ. आनंद नाडकर्णी यांच्याशी झडलेल्या चर्चा, डॉ. सदानंद मोरे याचं लोकमान्य ते महात्मा, सुबोधनं, कमलाकर नाडकर्णींनी, दिलेली इतरही अनेक पुस्तकं यातून मला हे गंधर्व सापडत गेले आणि मी त्यांचा अन्वयार्थ लावत गेलो. ज्येष्ठ लेखीका व संपादिका विनया खडपेकरांनी सुरुवातीलाच खूप छान सांगितलं. त्या म्हणाल्या, ''गंधर्व बुध्दीनंही आणि ह्रदयानंही समजून घे.'' मी या कादंबरीतचं तेच करायचा प्रयत्न केला आहे. प्रकाशनासाठी कादंबरी सज्ज आहे, वाचकांना एकच नम्र विनंती. गंधर्वांनीही स्वत:कडे दुसऱ्याचं आयुष्यं पहातोय किंवा रंगमंचावरचंच एक नाटक पहातोय अशा नजरेनं, इतक्या तटस्थतेनं स्वत:च्या आयुष्याकडे पाहिलं. लेखकम्हणून मीही तसा प्रयत्न केला. वाचकांनीही तसं पहायचा प्रयत्न करावा.

अशा नजरेनं पाहूनंही त्याचं आपल्या मनातलं दैवत्व कुठेही कमी होत नाही. यातच त्यांचं मोठेपण आहे.

❖ ❖ ❖ ❖



# संतसाहित्य आणि आजची पिढी

प्रा.मिलिंद जोशी

**प्रसंगी अखंडित वाचित जावे ।**

शालेय मुलांमध्ये खेळाची आणि वाचनाची आवड कमी होत चालली आहे. आजची मुलं अवांतर वाचन करीत नाहीत ही देखील चिंतेची बाब आहे. वाचनातून अनेक चांगले विचार मिळतात, ते बुद्धीचे भरणपोषण करतात, पण आजच्या मुलांच्या दिनचर्येत वाचनासाठी वेळ नाही. घरातील वडीलधाऱ्या मंडळींचे वाचनाचे प्रमाण कमी झाले आहे.

आज अनेक प्रतिष्ठित मंडळी मोठ्या क्लबचे सभासद आहेत, पण एकाही वाचनालयाचे सदस्य नाहीत. आज हॉटेलात हजारपाचशे रुपयांची बिलं भरताना माणसांना काही वाटत नाही परंतु शंभर रुपयाचे पुस्तक खरेदी करताना किती सवलत मिळणार हे हजारदा विचारले जाते. इतक्या झपाट्याने सांस्कृतिक मूल्ये बदलत आहेत.

आज तरूण मुलांना वाचनासाठी वेळ नाही. शाळेत शिकणाऱ्या मुलांची दिनचर्या इतकी धावपळीची असते की त्यात कुठेही वाचनाला स्थान नाही, त्यामुळे शाळेच्या वेळापत्रकात वाचनाचा तास समाविष्ट करणे ही काळाची गरज बनली आहे.

आज घरात अनेक महागड्या वस्तू आहेत. दिवाणखाना सुशोभित करण्यासाठी मूर्त्या आहेत, फ्रेम आहेत पण पुस्तकं नाहीत. ज्या घरात ग्रंथ नाहीत ते घर उदास आणि भकास आहे असेच म्हणावे लागेल.

भाकरी ही पोटाची गरज, पण भावना जागवायला, मनं फुलवायला, स्वप्नं पाहायला विचारच उपयोगी पडत असतात. चांगल्या साहित्यकृतींतून असे विचार माणसांना मिळत असतात. सगळीच जीवनसत्वं अन्नातून मिळतात असे नाही. व्यक्तिमत्त्वाचे पोषण करणारी अनेक जीवनसत्वं चांगल्या साहित्यकृतीतून मिळत असतात.

संकटाला भिडण्याचे, जीवनाला सामोरे जाण्याचे बळ अनेकदा चांगल्या पुस्तकातून मिळत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, ''ज्यावेळी सगळ्या जगाने मला नाकरले, त्यावेळी मला जवळ घेऊन प्रकाशवाटा दाखविण्याचे काम पुस्तकांनी केले. त्यांनीच मला दिशा दाखविली. उद्या माझ्या घरावरती जप्ती आली, सोनेनाणे, पैसाआडका सगळे काही गेले तरी मला त्याची खंत वाटणार नाही पण माझ्या ग्रंथांना कुणी हात लावला तर मी ते कधीही सहन करणार नाही.'' वाचनामुळे अनेक मोठी माणसं घडली. ज्ञानसंपादनाचे वाचन हे प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच समर्थ सांगतात, प्रसंगी अखंडित वाचित जावे ।

अखंड एकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा ।
प्रचिती येईल तो तो घ्यावा । अर्थ मनी ।।

एकांत आणि लोकांत ही मानवी जीवनाची दोन महत्त्वाची अंगं आहेत. ग्रंथांचे अध्ययन करण्यासाठी एकांत सेवावा अशी सूचना समर्थ करतात. एकांतात मन एकाग्र होते. अनेक चांगले विचार स्फुरतात. कल्पनेला नवे पंख फुटतात. चिंतनासाठी एकांत उपयुक्त ठरतो. माणूस हा समाजशील प्राणी असल्यामुळे लोकांत ही त्याची मानसिक गरज आहे, त्यामुळे एकांत आणि लोकांत यातले तारतम्य बुद्धिवंतांना ओळखता आले पाहिजे. जी माणसं फक्त एकांतात रमतात त्यांच्या वाट्याला अनेकदा एकटेपण येण्याची शक्यता नाकरता येत नाही. जी माणसं केवळ लोकांतात रमतात, त्यांच्या हातून वाचन, मनन, चिंतन घडत नाही. अशा माणसांचे व्यक्तिमत्व अनेकदा उथळ असते. म्हणूनच संत तुकाराम सांगतात,

काळ सारावा चिंतने ।
एकांतवासी गंगारथाने ।।

एकांतात ग्रंथाचे वाचन करीत असताना ते टप्प्याटप्प्याने करणे आवश्यक असते. अन्नाचे सेवन करताना आपण जेवढी भूक असेल तेवढेच अन्न खातो. खूप अन्न शिल्लक आहे म्हणून ते तसेच्या तसे खात नाही. पचनशक्तीचा विचार करून, पोटाचा अंदाज घेऊन खातो. वाचनाचेही तसेच असते. एका दिवसात दहा ग्रंथांचे वाचन मी करतो अशी फुशारकी मारणारी मंडळी खूप असतात. अशा माणसांच्या पदरात काहीच पडत नाही. पुस्तकातला प्रत्येक विचार समजावून घेत, त्यावर चिंतन करीत वाचन घडले पाहिजे. काहींना पुस्तके न वाचताच त्यावर भाष्य करण्याचा मोह होत असतो. त्यांना समर्थ सांगतात,

समुळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।
गुण सांगता अवगुण । पाहे तो एक पढत मुर्ख ।।
जो एकांतास तयार । आधी करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भीचे ।।
अक्षर सुंदर वाचणे सुंदर । बोलणे सुंदर चालणे सुंदर ।
भक्तिज्ञान वैराग्य सुंदर । करून दावी ।।

जो स्वत:ही ग्रंथ वाचत नाही आणि इतरांनाही तो ग्रंथ वाचायला मिळू नये अशी योजना करतो त्याची गणना समर्थ 'मूर्ख संप्रदायात' करतात.

आपण वाचीना कधी । कोणास वाचावया नेदी ।
बांधोन ठेवी बंदी । तो एक मूर्ख ।।

वाचनातून मिळालेल्या ज्ञानाचा त्या व्यक्तीने इतरांना शहाणे करण्यासाठी उपयोग केला पाहिजे अशी अपेक्षा समर्थ व्यक्त करतात.

आधीच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतलया लोकास उगवी । विवेक बळे ।।

वाचनसंस्कृती विषयीचे इतके परखड तरीही सुंदर विचार फक्त संतसाहित्यातच सापडतात.

❖ ❖ ❖ ❖



# वाचनसंस्कृती, वाचनाभिरुची आणि वाचनालय

श्री.मधु नेने

ग्रंथराज श्रीमद्‌भागवतात महर्षी वेदव्यासांनी नवविधा भक्ती सांगितली आहे. त्यातील पहिले दोन प्रकार श्रवण आणि कीर्तन भक्ती असे आहेत. सतत परमेश्वराची स्तुती ऐकणे, श्रवणातून ज्ञानसंपादन करणे आणि ते कंठस्थ करुन दुसऱ्याला ऐकवणे म्हणजेच त्याला श्रवणासाठी प्रवृत्त करणे. या पूर्वी ज्ञानार्जन आणि अध्यापनाच्या रुढ पध्दती होत्या. दुसरा प्रकार कीर्तनाचा त्यात एकानं परमेश्वराच्या कथा सांगायच्या, त्यातून जीव, जगत्, जगदीश्वराची ओळख करुन द्यायची, परमात्म्याची आळवणी करायची आणि अनेकांनी ते ऐकून आपलं जीवन समृध्द करुन घ्यायचं असं तत्कालीन अध्ययन-अध्यापनाचं स्वरुप होतं. या दोन्ही भक्तीच्या प्रकारात श्रवणाला महत्व होतं. कारण त्या काळी लिखित परंपरेपेक्षा मौखिक परंपरा महत्वाची होती. श्रवण हा ज्ञानसाधनेचा महत्वाचा मार्ग होता. पुढे काळ बदलला. जे ऐकायचं, पाठ करायचं ते मूर्त स्वरुपात असलं तर अधिक बरं असा विचार स्फुरला; त्यातून अक्षरांची रचना झाली ती लिपी म्हणून ओळखली जाऊ लागली. ही अक्षरं प्रथम मातीत, धुळीत रेखाटली जाऊ लागली. त्यांना धुळाक्षर असंच म्हटलं जाऊ लागलं. जे लिहिलं गेलं ते पाहून ते उच्चारण्याची सुरुवात झाली. यालाच वाचन असं म्हटलं गेलं. वाचा या शब्दातून वाचन या शब्दाची निर्मिती झाली. जे वाचेतून (वाणीतून) उमटलं ते वाचन. ही लेखनाची पद्धती विकसीत होत गेली. लेखनाचे अनेक फायदे लक्षात येऊ लागले. मुख्य म्हणजे घोकंपट्टी, पाठांतर, लक्षात ठेवणे हे प्रकार कमी झाले. या फायद्यामुळे त्याला स्थायी स्वरूप देण्याची शोधपध्दती सुरू झाली. धुळीतून पुढे झाडांची पाने, भूर्जपत्रे, कापड, कागद अशी लिहिण्याची साधने निर्माण झाली. पुढे हाताने लिहिण्यापेक्षा अधिक चांगल्या पर्यायाचा शोध घेण्याचे काम सुरू झाले. त्यातून टंकलेखन, छपाईचे यंत्र अशी यंत्र निर्माण झाली. कागद छापून ते एकत्र करून त्याची बांधणी करून ठेवण्याचे तंत्र विकसीत झाल्याने छापील कागदांना पुस्तकाचे-ग्रंथाचे स्वरूप प्राप्त झाले. आता तर संगणकाच्या माध्यमातून लेखन करणे, ते टिकवून ठेवणे, कमीतकमी जागेत ते साठवून ठेवणे अशी तंत्रप्रगती झाली आहे. या सर्वांचे मूळ वाचनाच्या प्रक्रियेत आहे. वाचन करण्याची परंपरा निर्माण झाली, त्यातून वाचनसंस्कृती उदयाला आली. भगवान व्यास अलिकडच्या काळात झाले असते तर त्यांनी नवविधा भक्तीऐवजी दशविधा भक्ती सांगितली असती आणि त्यात श्रवणानंतर वाचनाला दुसरे स्थान दिले असते.

आपल्याकडे खऱ्या अर्थाने वाचनसंस्कृतीस प्रारंभ झाला तो अेकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात. ब्रिटिशांनी शाळा काढल्या. त्यासाठी पुस्तके काढली. हळूहळू शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. कथा, कविता, निबंध, कादंबरी, ललित लेखन, वृत्तपत्रे, मासिके, पाठ्यपुस्तके असे लेखनाचे विविध प्रकार आले. ती लिहिणारे लेखक, प्रसिध्द करणारे प्रकाशक, त्याची-मजकुराची-व्यवस्थित मांडणी करणारे संपादक, अक्षरे जुळवणारे, ती छापणारे, त्याची बांधणी करणारे, वितरण करणारे असे अनेक घटक एकत्र

आले. त्यातून वाचणाऱ्यांची 'वाचक' म्हणून ओळख निर्माण झाली. वाचणाऱ्यांची संख्या वाढली. प्रत्येकाला सर्वच पुस्तके विकत घेण्याची शक्यता व गरज नव्हती. त्यासाठी सर्वप्रकारचे ग्रंथ पुस्तके एकत्र ठेवून ते वाचकाला उपलब्ध करून देण्याची यंत्रणा तयार झाली. त्याला वाचनालये किंवा ग्रंथालये म्हणण्यात येऊ लागले. ब्रिटीश येण्यापूर्वी आपल्याकडे ग्रंथालये नव्हती असे नाही. नालंदा, तक्षशीला, प्रभासपट्टण, बनारस इंत्यादी ठिकाणी ग्रंथालये होती, पण त्यावेळी ज्ञानसाधने विशिष्ट वर्गाच्या हातात असल्याने वाचन आणि ग्रंथालये त्यांच्यापुरती सीमित राहिली. काव्य, नाटक, क्वचित विनोद एवढ्यापुरतीच अध्ययनाव्यतिरिक्त वाचनाभिरुची होती. १९व्या शतकात ही परिस्थिती बदलली. हळूहळू वाचनविश्व विस्तारले. ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या. ते आपल्याला उपलब्ध व्हावे असे वाटणाऱ्यांची संख्या वाढू लागली. लेखनविषयही वाढले. प्रत्येकाला वेगवेगळा लेखनप्रकार आवडू लागला. ज्याची जी आवड ती वाचनाभिरूची ठरली आणि ती जोपासणारी नवी वाचनसंस्कृती वाचनालयांच्या माध्यमातून उभी राहिली; हा जवळपास पावणेदोनशे वर्षांचा कालखंड वाचनवृध्दीचा म्हणावा लागेल.


आता वाचन संस्कृती म्हणजे काय ते पहावे लागेल. संस्कृती हा शब्द खूप व्यापक आहे. तो जीवनशैली, कलांची परंपरा, शेतीविषयक पध्दती, क्रीडा प्रकार, साहित्य-प्रकार, खाद्यपदार्थ अशा अनेकांना लागू होतो. यातील वाचन हा एक भाग. त्यातही साधारणपणे वाचकांचे तीन प्रकार पडतात. पाठ्यपुस्तके-अभ्यासाची पुस्तके वाचणारे, वृत्तपत्रे व नियतकालिके वाचणारे आणि या व्यतिरिक्त विषयांवरचे ग्रंथ वाचणारे अशी ढोबळमानाने विभागणी करता येते. यातील तिसऱ्या भागात कथा, कविता, कादंबरी, ललितलेखन, शास्त्रीय, वैचारिक, संतसाहित्य इत्यादीतील सर्व किंवा आपल्या आवडीच्या प्रकाराचे वाचन करणारे वाचक असा उपविभाग पाडता येईल. हे सगळे जे वाचणारे आहेत किंवा ज्यांना वाचनाची वा ग्रंथसंग्रहाची आवड आहे. त्या सर्वांची वाचनविषयक आवड, मते वा धारणा आहे त्यांचा एकत्रित समावेश वाचन संस्कृतीचे उपासक, पायिक वा संवर्धक म्हणून करता येईल. आता ही वाचनसंस्कृती निर्माण कशी होते किंवा तिची वाढ कशी व्हावी यासंबंधी थोडे पाहू. वाचनाची आवड उपजत, वंशपरंपरागत, संस्कारांनी, ज्ञानसंपादनाच्या लालसेने, समानशीलाशी असणाऱ्या सख्यत्वामुळे, वेळ घालविण्याचे एक साधन म्हणून, इतिहास वा भविष्यकाळाच्या कुतुहलातून, संशोधनाच्या प्रेरणेतून अशा नानाविध कारणांनी निर्माण होते. यापेक्षा वेगळीही कारणे असू शकतील. वाचकांच्या भिन्न रुचीमुळे, रुचिवैचित्र्यामुळे त्यात फरक पडू शकतो. आता ही वाचनसंस्कृती हळूहळू लोप पावत आहे अशी चर्चा चालू आहे. पण तशी वस्तुस्थिती नाही. वाचनाच्या पध्दती फारतर बदलल्या आहेत असे म्हणावे लागेल. काही लोकांना जाडजूड ग्रंथ वाचण्याऐवजी आवश्यक तेवढी माहिती इंटरनेटवर वाचण्यात स्वारस्य वाटू लागले आहे. घराबाहेर न पडता पाहिजे त्यावेळी हवी असलेली माहिती उपलब्ध होऊ शकते त्यामुळे 'इलेक्ट्रॉनिक रीडींग' वाढले असे म्हणता येईल. फेसबुक, ट्विटर इत्यादीवरची like ची संख्या पाहून ती एकत्रित केल्यास वाचकांची केवढी मोठी संख्या आपल्याला उपलब्ध होईल ! तेव्हा वाचनसंस्कृतीचे आयाम बदलले, पण ती लोप पावत आहे असे म्हणता येणार नाही. फार तर मुद्रितसाहित्य वाचनाची जागा इमेल वाचनाने घेतली आहे असे म्हणता येईल. पण एक प्रश्न विचारला जातो, हे योग्य आहे काय ? माझ्या दृष्टीने त्याचे उत्तर नकारात्मकच आहे. कारण तात्कालिक वाचन ही तात्पुरती मलमपट्टी आहे. तुमचं मत समृध्द व्हायचं असेल तर दीर्घकालीन उपाययोजना म्हणून मुद्रितवाचन हेच योग्य नि आवश्यक आहे. एकदा हातातून लिहिला गेलेला मजकूर किंवा डोळ्यांकडून वाचला गेलेला मजकूर आपली दीर्घकाळ सोबत करतो. इलेक्ट्रॉनिक मीडीया मधून हे जमत नाही. कारण पुढे जात राहणे हा त्याचा धर्म आहे तर मनात घर करून राहणे ही मुद्रित माध्यमाची 'सवय' आहे आणि धर्म सोयीपुरता वापरायची आपली वृत्ती आहे तर सवयीचा गुलाम होणे ही माणसाची प्रवृत्ती आहे आणि नेहमी वृत्तीवर प्रवृत्ती मात करते, ती कधी निवृत्त होत नाही म्हणून ग्रंथवाचनाची सवय जडवून घेणे हा वाचनसंस्कृतीचा मूलभूत घटक आहे असे मला वाटते.

आता अशा प्रकारची वाचनसंस्कृती रुजविण्यात वाचनालये महत्वाची भूमिका बजावतातच पण ती आता व्यापक केली पाहिजे. त्यासाठी ८ ते १५ वयोगटातील मुलांना हाताशी धरून, त्यांच्याशी गोड बोलून, खाऊ देऊन त्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. फक्त अर्धा तास शालाबाह्य वाचन म्हणजे भवितव्याची बेगमी असे त्यांना पटवून दिले पाहिजे. गाण्याच्या, चित्रांच्या, गोष्टींच्या, निबंधाच्या, वक्तृत्वाच्या स्पर्धांच्या माध्यमातून त्यांचे चिमुकले पाय वाचनालयाकडे कसे वळतील हे पाहिले पाहिजे. वाचनालये ही कामे आता करतच आहेत पण आता त्यात अधिक लक्ष घालून आणि मुख्य म्हणजे प्रतिसाद मिळत नाही म्हणून नाउमेद न होता वर्षानुवर्षे, आज ना उद्या त्यात यश येईल या भावनेने केली पाहिजेत आणि हे केवळ ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांचे काम नाही तर वाचनालयाच्या प्रत्येक पदाधिकारी, संचालक, सभासदाने देखील यात जाणीवपूर्वक लक्ष घालण्याची गरज आहे. नुकत्याच चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपल्या

एखादा दिपस्तंभ अढळ का असतो तर तो आपली जागा सोडत नाही कारण दिशा दाखवायला तो कधी चुकत नाही. सातान्याच्या मातीला अनेक महापुरुषांचा परीसस्पर्श झाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पहिली केस जिंकली तेव्हा त्यांना ५०० रुपये मानधन इथेच मिळाले. त्यांच्या पत्नी रमाबाई यांनी त्यांना बाजारहाट करावयास सांगितले व त्या वाट पहात बसल्या. रात्री ११ वाजता बाबासाहेब आले. रमाबाईंनी सूप घेतले व त्या पिशव्या त्यांनी सूपात ओतल्या पण त्या पिशव्यातून धान्य आणि राशन पडले नाही तर त्या सूपात पडली कायद्याची पुस्तके. रडणाऱ्या रमाबाईंची समजूत घालताना बाबासाहेब म्हणतात की,''ही पुस्तके मी वाचली नाहीत तर आपला समाज वाचणार नाही.'' हा शाश्वत विचार सांगणाऱ्या बाबासाहेबांना याच साताऱ्यात अक्षरगंध मिळाला. संपूर्ण जगभरात ज्यांची स्मृतीचित्रे गेली त्या लक्ष्मीबाई टिळकांना अक्षरांचा संग याच साताऱ्यात मिळाला. माणसाची वाणी ही जग जिंकू शकते अशी ईश्वरी देणगी मिळालेल्या प्राचार्य शिवाजीराव भोसल्यांची शब्दफुले फुलली ती याच नगरवाचन मंदिरात. प्रतिभावंत कवी, लेखक लिहते झाले आणि समाज मनावर आपला अमूल्य ठसा उमटवत राहिले ते केवळ याच नगरवाचनालयामुळे. म्हणूनच साताऱ्यातील प्रत्येक वाचकाला अभिमान वाटावा असे वाचनालय १६० वर्षे पूर्ण करीत आहे. वाचकासमोर केवळ दोन पाने उघडून देण्याचे काम या ग्रंथालयाने केले नाही तर पानांवर गरुडाचे पंखही देण्याचे काम या वाचनालयाने केले आहे. म्हणूनच इथल्या वाचकांना नम्रपणे सांगावेसे वाटते की,

''पाखरा वाढव आपली सोच<br>आणि वाढव आपली पोहच<br>तुझ्याचसाठी पिकले फळ हे<br>खुपस आपली चोच ॥''

❖ ❖ ❖ ❖



## या पुस्तकात दडलय काय ?

श्री.अ.अ.वैद्य

प्रत्येक सार्वजनिक वाचनालयात ग्रंथ देवघेव विभागात ग्रंथ जमा करतांना अनेक गमतीदार अनुभव येतात. पुस्तक वाचतांना वाचक खूण म्हणून पोस्ट पाकिटे, अंतर्देशीय पत्रे तसेच पोस्टात टाकण्यासाठी कार्डे पाकिटे त्या पुस्तकात तशीच रहातात. आणि विशेष म्हणजे कांही वाचक नोटाही खूण म्हणून ठेवतात. मा.कार्यवाह यांना सांगून ज्याचे त्याचे पैसे असतील त्यांना देण्यात येतात. व काहींची पोस्टात टाकण्यासाठी जबाबदारीही घ्यावी लागते. कारण एकदा वाचक पुस्तक घेवून गेला की तो जमा करण्यासाठी चार-आठ दिवस येत नाही. आल्यावर मात्र माझे पाकीट कार्ड पोस्टात टाकण्यासाठी होते आंम्ही ते जबाबदारीने टाकतो (कार्यवाह यांचे सांगणेवरुन) एकदा मात्र मजेशीर घटना झाली. शाहुपूरीतून एक वाचक (कुलकर्णी) धावत आले आणि म्हणाले माझे पाकीट पुस्तकात होते ते द्या. मी म्हणालो आपले पाकीट पोस्टात टाकले आहे. तेच कुलकर्णी आठ दिवसात आले आणि म्हणाले ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी फार महत्वाचे काम केले आहे. त्या पाकिटात मुलीची पत्रिका होती त्याचे उत्तर आले मुलगी पसंत आहे. सर्वांचे आभारी आहोत. मे महिन्यात कुलकर्णी स्वतः येऊन लग्नपत्रिका देऊन सर्व स्टाफला लग्नाचे व जेवण्याचे अगत्याचे आमंत्रण देऊन गेले. पावसाळ्यात छत्र्या विसरणे, चष्मे विसरणे हे नित्याचेच ते त्यांना परत देता येतात. थोडक्यात सर्व कर्मचारी वर्गांना बारीक-सारीक जबाबदारी घेऊन काही गोष्टी लक्षात ठेवून कराव्या लागतात.

❖ ❖ ❖ ❖

# तापली आहे वसुंधरा !

**श्री.अजित साळुंखे**

**'क्योटोपासून - बालीपर्यंत'**

जगातील सर्व हवामानशास्त्रज्ञ, पर्यावरणतज्ञ, महासागरांचे अभ्यासक, जंगलतज्ञ, हिमखंडांच्या वितळण्याचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र यांचे थोर अभ्यासक या सर्वांनीच सांगायला सुरूवात केली की जगाचे तापमान वाढत आहे. गेल्या साडेसहा लाख वर्षातील विसावं शतक हे तापलेलं शतक होतं तर १९९५ पासूनची सलग १० वर्षे ही अतितप्त वर्षे होती. हिमशिखरे प्रचंड वेगाने नष्ट होत असून महासागराची पातळी निश्चितपणे वाढत आहे असं जवळपास १ अंश तापमान वाढलं तर महासागरांची पातळी सुमारे ८ इंचांनी वाढली.

सर्व शास्त्रज्ञांच्या कंठरवामुळे आणि नाझासहित अनेक मातब्बर संस्थांच्या अभ्यासपूर्ण अहवालांमुळे युनोच्या पुढाकाराने १९९२ मध्ये खास या विषयावर पहिली परिषद बोलावली गेली. या परिषदेतील वैज्ञानिकांच्या सक्रिय सहभागामुळे या गंभीर प्रश्नासाठी पुढेही वाटाघाटी सुरू राहिल्या. जपानमधील ऐतिहासिक क्योटो या शहरात भरलेली तिसरी परिषद १९९७ मध्ये अतिशय गाजली. क्योटो परिषदेत १९० देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. 'क्योटो' ने काही हक्क निष्कर्ष जगापुढे मांडले.

१. इ.स. १७५० नंतर सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीपुढे मानवाने प्रचंड प्रमाणात खनिज इंधनांचा वापर करून ऊर्जा निर्मिती, वाहने, विमाने, कारखानदारी सुरू केली तसेच प्रचंड वनविनाश घडवून आणला त्यामुळे पृथ्वीच्या वातावरणाचे, भूपृष्ठाचे व सागरपृष्ठाचे तापमान वाढत चालले आहे. ही तापमानवाढ 'विकोपाच्या' स्थितीत पोचली असून त्यावर तात्काळ उपाय योजावे लागतील.

२. तापमानवाढीला जबाबदार असे प्रमुख सहा वायू असून त्यांचे वातावरणातील प्रमाण गेल्या शंभर वर्षात 'धोकादायक' पातळीपेक्षा पुढे गेलेले आहे. हे वायू आहेत-कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड, हायड्रो फ्लुरोकार्बन्स (HFC), पर फ्लुरोकार्बन्स (PFC), सल्फर हेक्झॉफ्लोराईड.

३. या वायूंचे जास्तीत जास्त उत्सर्जन करणाऱ्या ३७ औद्योगिक देशांवर उत्सर्जन कमी करण्याचे निर्बंध घातले जावेत. फेब्रु. २००५ पासून 'क्योटो' करार प्रत्यक्षात आणावा. त्यापूर्वी प्रत्येक देशाने आपल्या जनतेसमोर, संसदेत त्याची सविस्तर चर्चा करावी. २००८ ते २०१२ या पाच वर्षाच्या काळात ३७ प्रमुख औद्योगिक राष्ट्रांनी त्यांचे उत्सर्जन १९९० च्या तुलनेत ५ टक्क्यांनी कमी करावे.

तापमान वाढ व कार्बन उत्सर्जनाला जबाबदार असणाऱ्या प्रमुख देशांमध्ये अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फ्रांन्स, जपान, रशिया, कॅनडा, स्वीडन इ. देशांवर स्वतःहून ५ टक्के उत्सर्जन कपातीचे बंधन घालून द्यायचे होते. क्योटो अत्यंत गाजले ते या काड्या देशांच्या विरोधामुळे. विशेषतः सर्वात मोठा कार्बन

उत्सर्जक असलेला, जगातील सर्वाधिक ऊर्जावापर करणारा देश अमेरिका तिच्या दबावाखाली जपान आणि युरोपियन समुदायाच्या ताठर भूमिकेमुळे क्योटो करार अस्तित्वात आला नाही. अमेरिकेने यावर घेतलेली भूमिका अत्यंत दुराग्राही अशीच होती. क्योटो व त्यानंतरच्या अनेक परिषदांमध्ये बलाढ्य अमेरिकेने अन्य देशांवर दबाव टाकून या कराराला विरोध करण्याचे धोरण सुरूच ठेवले. जगातील मातब्बर तेलकंपन्या, मोटार उद्योगाच्या लॉबीने अमेरिकेला क्योटोविरोधी धोरण घेण्यास भाग पाडले. या कपट कारस्थानांना इतका ऊत आला की २००६ मध्ये नासाचा प्रमुख हवामान शास्त्रज्ञ जेम्स हैन्सेन याने पत्रकार परिषद घेवून जाहीर केले की नासाची नोकरशाही व अमेरिकन प्रशासन तापवाढीचे भीषण सत्य जगासमोर मांडू नये यासाठी आपल्यावर दबाव आणत आहे.... !

तत्कालीन अमेरिकी अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी असे जाहीर केले की कार्बन उत्सर्जन व जगाची तापमानवाढ यांचा काहीही संबंध नसून मूठभर वैज्ञानिकांचे हे दिवास्वप्न आहे. ''अमेरिकन माणसाच्या सर्वोच्च सुखासाठी मी बांधील असून अमेरिकन माणसांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळावी यासाठी माझे प्रशासन दर आठवड्याला एक याप्रमाणे सलग २० वर्षे नवीन वीजनिर्मिती केंद्रे उभी करणार आहे.'' अशी गर्जना बुश यांनी केली. आमच्याशी करार होऊ शकत नाही आणि आमच्याशिवाय तो अर्थहीन आहे, अशी उघड भूमिका अमेरिकेने घेतली.

शिवाय जोपर्यंत भारत आणि चीन यांच्यावर कार्बन उत्सर्जनाचे बंधन घातले जात नाही तोपर्यंत हा करार कालत्रयी होणार नाही अशी भूमिका अमेरिकेने घेतली. इंडोनेशियातील 'बाली' बेटांवर होऊ घातलेल्या २००७ मधील IPCC च्या परिषदेचे खूप वाजत असताना स्वत:ला जागतिक पोलीस, न्यायालय व वैज्ञानिक बुश प्रशासनातील 'सेनापतींनी' आणि उद्योगधंद्यातील सबकुछ समजणाऱ्या त्यांच्या 'शिलेदारांनी' आणखी भयानक भूमिका घेतली. ती अशी की, जर तापमानवाढ होतच असेल ती प्रगत औद्योगिक देशांच्या कोळसा, तेल, वायू यांच्या ज्वलनामुळे नाही तर भारत व चीन यांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे व त्यांच्या शेतीमुळे ती होत आहे !!

अशाप्रकारे जागतिक राजकारण्यांच्या क्षेत्रात बदनाम झालेल्या बुश यांनी आता विज्ञान क्षेत्रातही आपला हस्तक्षेप केला व आपण एक मायावी विज्ञान सुध्दा जन्माला घालू शकलो हे दाखवून दिले.

तथापी आंतरराष्ट्रीय हवामान बदल विषयक जागतिक समिती (IPCC) केलेल्या अथक परिश्रमानंतर, हजारो शास्त्रज्ञांनी केलेल्या जवळजवळ २० वर्षांच्या किचकट अभ्यासानंतर आणि निसर्गात खरोखरी दिसणाऱ्या बदलांनंतर खुद्द नोबेल समितीला या सर्वांची दखल घ्यावी लागली. ''जागतिक तापमानवाढीचे संकट इतके भीषण आहे की त्यामुळे होणाऱ्या विनाशाची तुलना तिसऱ्या महायुध्दाशी करावी लागेल. याबद्दल संपूर्ण मानवजातीला केवळ सावधान करण्याचेच नाही तर या अरिष्टातून कसे बाहेर काढावे यासाठी IPCC या संघटनेने केलेले प्रयत्न अनेक युध्दे थांबवण्याच्या तोडीचे आहेत.'' असे सांगून जागतिक शांततेचा २००७चा नोबेल पुरस्कार IPCC ही संस्था व अमेरिकन सिनेटर अल् गोर यांना संयुक्तपणे देण्यात आला. IPCC चे अध्यक्ष डॉ. राजेंद्र पचौरी यांनी तो संस्थेतर्फे स्वीकारला. पाचौरी यांचे या क्षेत्रातील अतुलनीय योगदान लक्षात घेऊन पुढील ५ वर्षासाठी त्यांची पुन्हा निवड करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर इंडोनेशियातील बाली या ठिकाणी २००७ मध्ये झालेली परिषद युरोपियन समुदायाला वळवण्यात यशस्वी झाली आहे. जगातील २०६ देशांपैकी तब्बल १८४ देशांनी क्युटो नियमावली स्वीकारली आहे. अमेरिकन, कॅनडा, जपान हे देश अजूनही तिथपर्यंत पोचलेले नाहीत.

तथापी अमेरिकेचे नवीन अध्यक्ष बराक ओबामा यांनी ''या प्रश्नावर गंभीर भूमिका घ्यावी लागेल, जागतिक अरिष्टापासून मानवजातीला वाचवण्यासाठी अमेरिकेला स्वत:पासून सुरूवात करावी लागेल आणि त्यासाठी माझे सरकार २०२० पर्यंत कार्बन उत्सर्जन २० टक्क्यांनी कमी करेल व या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी जगातील इतर देशांना आपण सहकार्य करू.'' असे वचन त्यांच्या निवडणूक जाहिरनाम्यात दिले होते. ग्लोबल वॉर्मिंग बद्दल शास्त्रज्ञांकडून आपण माहिती घेत असून हा जगापुढे अत्यंत उग्र प्रश्न आहे अशी कबूली ओबामा यांनी त्यांच्या प्रचारात दिलेली होती. युरोपियन समुदायातील इंग्लंड व फ्रांन्स या देशांनी स्वत:चे कार्बन उत्सर्जन १५ ते २० टक्क्यांनी कमी करण्याचा आराखडा तयार केला असून २०२० पर्यंत त्याची सर्वार्थाने अंमलबजावणी होईल हा दिलासा दिलेला आहे.



# शब्दप्रभू ग्रंथप्रेमी : यशवंतराव चव्हाण

**श्री.रविंद्र बेडकीहाळ**

शालेय व महाविद्यालयीन जीवनापासूनच यशवंतराव चव्हाणांना काव्य, लेखन, वाचन याची आवड होती. अत्यंत गरिबीतून शिक्षण घेत असल्यामुळेच त्यांना शिक्षण व पुस्तके याबाबत आत्मियता होती. पण त्याआधी बालपणीच त्यांनी शब्दांचे सामर्थ्य ओळखले होते. त्यांच्या लहानपणी त्यांची आई विठामाता जेव्हा जात्यावर दळण दळताना ज्या ओव्या म्हणायची त्यातील शब्द यशवंतरावांच्या काळजाच्या कागदावर कोरले गेले होते. आपल्या आईकडे अशा पुरातन ३०० चे वर ओव्यांचा संग्रह होता आणि त्यांच्या मते हीच त्यांच्या घरातील सांस्कृतिक श्रीमंती व संस्काराचा अमृतकुंभ होता. विशेषत:

मायबापाच्या भेटी, माझा जन्मला मोती
माझ्या बाळाचे, सारी सृष्टी गुण घेती

हा आपल्या मुलाबद्दलचा आत्मविश्वास व त्यातील वात्सल्य किंवा

नका बाळांनो, डगमगू
चंद्रसूर्यावरील जाई ढगू

असा धीर देणारा आशावाद यशवंतरावांना अशा ओव्यातील शब्दांमधूनच मिळाला. म्हणून शब्दांची व त्यातून निर्माण होणाऱ्या साहित्याची, ग्रंथांची परिणामकता त्यांनी लहानपणापासूनच ओळखली होती. अशा ओव्या हा महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा ठेवा होता. तो जपला पाहिजे ही त्यांना जाणिव होती म्हणूनच लोकसाहित्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री झाल्यावर सरोजिनी बाबरांच्या माध्यमातून एक वेगळे दालनच उभारले. त्यामुळे कितीतरी अशा ओव्या, लोकगीते, शब्दबद्ध झाली आणि ग्रंथरुपाने मराठी साहित्य समृद्ध करुन गेली याचे श्रेय यशवंतरावांचेच आहे.

शालेय जीवनात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण 'आई' या विद्यापीठातूनच झाल्याचे ते नेहमीच कृतज्ञतेने सांगायचे. आई विठामाता त्यांना अनेक गोष्टी सांगायच्या. त्यातील शब्दसामर्थ्य, विविधता, लालित्य त्यांनी हेरले होते आणि तेच त्यांच्या नंतरच्या काळातील साहित्यलेखनातून, भाषणातून सहजपणे आविष्कारत गेले. शब्दांची, साहित्याची, ग्रंथ वाचनाची त्यांची आवड ह्या विठामाता विद्यापीठातून निर्माण झाली पण ती त्यांनी आयुष्यभर आईचा प्रसाद म्हणूनच मर्मबंधनातली ठेव म्हणून जपला. त्यातून ग्रंथप्रेमी, साहित्यिक, रसिक असे यशवंतराव घडले. राजकारणात राहूनही या प्रसादाचे मर्म त्यांनी आयुष्यभर जपले.

यशवंतराव चव्हाणांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यामध्ये दोन स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. एक त्यांच्या मातोश्री विठामाऊली व दुसरी त्यांची प्रिय पत्नी वेणूबाई. त्यापैकी आईच्या संस्काराचे सामर्थ्य त्यांना साहित्य लिहिण्यासाठी प्रेरणाच होती. तसेच ज्यावेळी देशात आणि परदेशात जेव्हा वेणूताई त्यांच्याबरोबर नसायच्या त्यावेळी तिथे पाहिलेली ठिकाणे, ऐतिहासिक स्थळे, थोरामोठ्यांशी झालेल्या भेटी, निसर्गवर्णने

याबाबतची माहिती यशवंतराव वेणूताईंना पत्रामध्ये लिहित असत. अशी पत्रे हासुद्धा त्यांच्यातील पत्रलेखनाचा साहित्यिक अविष्कारच होता. ह्या पत्रातील माहिती, वर्णनांना वाङ्‌मयीन मूल्य आहे. विदेश दर्शन हा त्यांच्या पत्रांचा संग्रह त्यादृष्टीने भावपूर्ण वाचनीय असा आहे. तसेच आपल्या प्रिय पत्नीशी शब्दातून कसा सहजसंवाद साधायचा याचा आदर्शही आहे. देशाटन, पंडित मैत्री आणि सभेत संचार या तिन्ही गोष्टींचा संगम या पत्रलेखनात आहे. देशाचे संरक्षण मंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री व परराष्ट्रमंत्री या पदावरुन काम करताना यशवंतरावांना अनेक देशांचा प्रवास करावा लागला. त्यात्या देशातील साहित्य, संस्कृती, जनजीवन, राजकारण, सांस्कृतिक व साहित्यिक, नाट्यकला संस्था, निसर्ग अशा अनेक गोष्टींचे ते बारकाईने, आस्थेने निरीक्षण करीत असत. त्या भावना शब्दरुपाने वेणूताईंना पत्रात लिहित असत.

यशवंतराव जरी मुत्सद्दी राजकारणी होते, सत्ताधीश होते, राजकीय पक्षाचे अध्वर्यू होते तरीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक उत्तम रसिक वाचक, प्रगल्भ श्रोता व संवेदनशील साहित्यिक, कविमनाचा हळुवार लेखक दडलेला होता. म्हणूनच त्यांच्या साहित्यात अभिजात लालित्य आहे. त्यांचे पहिलेच पुस्तक 'कृष्णाकाठ' हे आत्मनिवेदनपर साहित्य आहे. त्यात त्यांच्या लहानपणच्या, शालेय, महाविद्यालयीन जीवनातल्या आठवणी, सुरुवातीच्या राजकीय चळवळीचा, पक्षकार्याचा, स्वातंत्र्यलढ्याचा, पहिल्या सत्तेचा प्रवास आहे. पण या साऱ्या लेखनात साधे सोपे सरळ शब्द असले तरी त्यातील तरल भावना गतिमान व उत्कंठा वाढविणारे आहे. त्यामुळे त्यात लालित्य आहे. पुढे जसजसे ते राजकीयदृष्ट्या मोठे होत गेले तसे त्यांच्या वक्तृत्वाचे शैलीदार पैलूही लोकांसमोर मोठ्या प्रमाणावर आले. कला, साहित्य, नाट्य, संस्कृती, मराठी भाषा याबद्दलचे विविध कार्यक्रम, त्यातील साहित्य, नाट्य, संस्कृती, मराठी भाषा याबद्दलचे विविध कार्यक्रम, त्यातील साहित्य, नाट्यसंमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम यातील त्यांची भाषणे त्यांच्या ग्रंथवाचनाने, समाजाच्या निरीक्षणाने आणि अनुभवाने साहित्यिकदृष्ट्या समृद्ध होत गेली. त्यांची वाणी आणि लेखणी दोन्हीतून अभिजात रसिक साहित्यिकाचे दर्शन होत गेले.

यशवंतरावांचेकडे तीन वेळा (१९५६, १९५७ व १९६०) महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद होते. या कारकीर्दीत म्हणूनच त्यांच्यातील साहित्यिक मनाने कला, लोककला, नाट्य, तमाशा, मराठी भाषा व संस्कृती संवर्धन, मराठी साहित्य इत्यादिसाठी शासनात अनेक निर्णय घेतले. त्यामुळे या क्षेत्रांना पाठबळ मिळाले, प्रोत्साहन मिळाले, आर्थिक आधार मिळाला, मराठी भाषा विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मराठी विश्वकोष, चित्रपट, रंगभूमी परिक्षण मंडळ अशा अनेक संस्था त्यांनी शासनातर्फे निर्माण केल्या. साहित्यिकांना, त्यांच्या संमेलनांना, नाट्यसंमेलनांना शासनाचे आर्थिक अनुदानाचे पाठबळ दिले. ग्रंथालयांना अनुदाने सुरु केली. त्यातून महाराष्ट्रातली वाचनसंस्कृती वाढण्याचे बळ मिळाले. साहित्य व्यवहार करणाऱ्या साहित्य परिषदांनाही शासनाचे प्रोत्साहनात्मक अनुदान सुरु केले. हे सारे यशवंतरावांनी केले त्यापाठीमागे त्यांची या क्षेत्राबद्दलची मनापासून आवड, प्रचंड ग्रंथवाचन, उत्तम साहित्य निर्मिती ही वैशिष्ट्ये होती. १३ फेब्रुवारी १९६० ला विदर्भ साहित्य संमेलनाच्या उद्घाटन भाषणात ते म्हणतात, ''साहित्याने सामाजिक मन व त्यामागील सांस्कृतिक प्रेरणा जागृत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करुन देणारी असावी. विविध भाषेतील अक्षर वाङ्‌मयाची तसेच सर्व संतांची प्रेरणा मानवतावादी होती. जगाचे पाऊल नाशाकडे व दुसरे प्रगतीकडे पडत असताना साहित्यिकांनी शब्दांच्या जोरावर मंगलतेकडे व प्रगतीकडे जगाचे पाऊल नेले पाहिजे. मानवता संकटात असताना साहित्यच तिला वाचवू शकेल.'' यशवंतरावांचा हा आशावाद मराठी साहित्याच्या विकासासाठीच होता.

यशवंतरावांनी एकूण १२ पुस्तके लिहिली. त्यापैकी 'विचारधारा', 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'भूमिका' हे त्यांचे भाषणांचे संग्रह, 'ऋणानुबंध' हा लेखसंग्रह, 'कृष्णाकाठ' हा आत्मचरित्राचा पहिला खंड, 'विदेश दर्शन' हा परदेशातून तर 'विरंगुळा' हाही वेणूताईंना लिहिलेल्या पत्रांचा संग्रह. ही पुस्तके महत्त्वाची आहेत. 'सागरतळी' हे मुंबईतील तर 'यमुनातीरी' हे दिल्लीतील जीवनाचे चित्रण करणारे खंड त्यांना लिहायची इच्छा होती. पण नियतीने ते घडू दिले नाही. स्वतः यशवंतरावांनाही याची खंत होती. पण त्यामुळे आणखी दोन समृद्ध अनुभवांची खाण असलेले ग्रंथ प्रकाशित होऊ शकले नाहीत, ही मराठी साहित्याची उणीवच म्हणावी लागेल.

शब्दप्रभू असलेल्या साहित्यिक यशवंतरावांचे योग्य, चिकित्सक समीक्षणाने त्यांचे साहित्यिक मूल्यमापन मात्र मोठ्या प्रमाणावर होणे अपेक्षित होते. मराठी साहित्यात ही नक्कीच उणीव आहे. यशवंतरावांना १९८४ नंतर आणखी काही आयुष्य (वेणूताईंसह) मिळाले असते तर कदाचित त्यांच्या एखाद्या साहित्यकृतीला साहित्य अकादमीचे किंवा नोबेलचे पुरस्कार मिळाले असते. एवढी त्यांची साहित्यिक उंची नक्कीच होती. त्यांच्या साहित्याची निदान त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात तरी साहित्यिकांकडून, समीक्षकांकडून, साहित्यविषयक संस्थांकडून, विचारवंतांकडून चिकित्सा व्हावी ही अपेक्षा आहे आणि शब्दप्रभू, ग्रंथप्रेमी साहित्यिक यशवंतरावांना हीच खरी आदरांजली ठरावी.

# मराठी गझलेचा प्रवास

**श्री.प्रदीप निफाडकर**

गझलसारखा विदेशी काव्यप्रकार मराठी कवितेच्या प्रकृतीशी मूलतः विसंवादी असून तिला मानवणारा नाही, असा आक्षेप जिथे माधवराव पटवर्धन यांच्या काळात घेतला होता त्या महाराष्ट्र साहित्य परिषदेत गझलेवर चर्चा होते, गझलचा मशायरा होतो. याचा अर्थ कालौघात सर्व आक्षेपांना गझलेने नाजूकपणे पण खणखणीत उत्तर दिले आहे. अर्थात हे अलीकडे घडते असे नाही. मराठी साहित्य परिषदेने १९८६ ला स्वतंत्र दिवाळी अंक गझलेवर काढला होता. साहित्य परिषदेने सुरेश भटांच्या 'सप्तरंग' चे प्रकाशन परिषदेच्या मंचावर केले होते.

माधवरावांना जाऊन ७० वर्षे झालीत. आणखी एक योगायोग म्हणजे मराठीतील पहिली गझल ज्या अमृतराय यांनी लिहिली असे मानले जाते. त्यालाही २८३ वर्षे झाली आहेत. अमृतरायांचा जन्म १६९८ मधला असला तरी भारतभ्रमण करताना १७२९ मध्ये त्यांनी पहिली गझल लिहिली होती. म्हणून २००९ ला, २८० वे वर्ष अर्थात सालांमध्ये अडकायला मी संशोधक, प्राध्यापक, संपादक नाही. मी फक्त गझल लिहिणारा, भटांच्या 'एल्गार' मधील, 'काफला' मधील एक जबाबदार घटक आहे. मी ही वर्षे अशासाठी सांगत आहे की, गझलेचा प्रवास मांडायचा झाला तर तो २८० वर्षांचा, एका पुस्तकाचा विषय होईल. त्यामुळे मी या प्रवासातील प्रमुख टप्प्यांना फक्त स्पर्शून जाणार आहे.

तसे मराठीत अमृतरायांनंतर मोरोपंत, माणिक प्रभू, अण्णासाहेब किर्लोस्कर,गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, भ.गो. तोडेवाले, शाहीर रामभाऊ दाते उर्फ रामशाहीर, दे.ल. महाजन, कुमुद बांधव, भ.श्री. पंडित, गिरीश, ना.घ. देशपांडे आरती प्रभू, अनिल, शंकर दामाणी, बा.भ.बोरकर, कुसुमाग्रज, संजीव, विंदा, शांता शेळके यांच्यापासून ते गंगाधर महांबरे, लक्ष्मीकांत तांबोळी, दत्ता हलसगीकर, अरुणा ढेरे, सुधीर मोघे, अरुण म्हात्रेंपर्यंत अनेकांनी गझल लिहिण्याचा प्रयत्न केला. पण कित्येकांना त्यात यश आले नाही किंवा कित्येकांना त्यात रस वाटला नाही. काहीही असो पण हे सर्व काही गझलाकार म्हणून मान्यता पावले नाही. ज्येष्ठ कवीवर्य मंगेश पाडगाकर यांनी सर्वच काव्यप्रकारांना हाताळताना गझलेलाही हाताळण्याचा प्रयत्न केला. पण एकच उदाहरण देतो. त्यांचा एक शेर आम्ही भटसाहेबांना ऐकविला,

> दुःख ज्याने सोसले तो का सुखाला भाळतो
> तू मला सांभाळ, मी तुला सांभाळतो

भटांना, आम्ही हा पाडगावकरांचा मतला तंत्रदृष्ट्या योग्य पण फसलेला वाटतो', असे निदर्शनास आणून देताच त्यांनी (भट साहेबांनी)

जो तुला जाळी निखारा तो मलाही जाळतो
तू मला सांभाळ आता मी तुला सांभाळतो

असा बदल केला. तेव्हा गझल काय असते हे आपणास यावरुन कळेल. श्री. पाडगावकरांचे मराठी कवितेतील मोठेपण मान्य करुनही त्यांचे नाव गझलकारांच्या यादीत येत नाही हे सत्य. मग मराठी गझलेत दोनच नावे ठळक राहतात ती माधव ज्युलियन व सुरेश भट.

भट यांचा जन्म झाला १९३२ मध्ये म्हणजेच ज्युलियन यांच्या मृत्यूसमयी भट सात वर्षांचे होते. त्यामुळे भटांबद्दल ज्युलिअनांचे मत समजू शकणे शक्यच नव्हते. पण ज्युलिअनांबाबत मात्र भटांनी ठिकठिकाणी मते व्यक्त केली आहेत. साहित्य पत्रिकेच्या १९८६ च्या अंकात ज्युलिअन यांचे 'गज्जलांजली' हा गझलांचा संग्रह म्हणून वाचण्याच्या लायकीचे पुस्तक नाही' असे ते म्हणाले असले तरी चारच वर्षांनी 'काफला' पुस्तक मात्र त्यांनी माधव ज्युलिअन यांनाच अर्पण केले आहे, हे दुर्लक्षून चालणार नाही. शिवाय प्रस्तावनेत 'विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात माधवरावांच्या विशेष प्रयत्नांमुळे गझल प्रकार मराठी कवींमध्ये अधिक प्रिय झाला' असे ते मान्य करतात. माधवरावांचा हा सन्मान किंवा त्यांच्या पारड्यात टाकलेला योग्य मान असा दुर्लक्षून चालणार नाही. तद्वत भटांच्या दिलगिरीलाही टाळून चालणार नाही. तेव्हा प्रमुख गझलकार म्हणून माधवरावांचा आपण विचार करु. मग भट आणि नंतर भटांचे शिष्य व येणारा काळ असे माझे टप्पे असतील.-

उर्दुत एका शायरने असे म्हटले आहे की,

मुझको देखना है तो मेरे शेरोंको पढो यारो
मेरे शेरोंमें मेरे जीवन की अक्कासी है

माधवरावांच्या गझला वाचताना प्रीतीभुकेला, प्रणयपंढरीचा वारकरी ही त्यांची बिरुदे या शेराप्रमाणे त्यांच्या गझलेत स्पष्ट दिसतात. पण त्याचबरोबर आयुष्यातले कटू अनुभव त्यांच्या गझलेत फार आलेले नाहीत. जीवनाने दिलेले विष पचवून मधाळ, आल्हाददायक लिहून वाचकांना फक्त आनंद देणे सगळ्यांना जमत नाही. माधवराव हे पहिले डी. लिट मिळविणारे मराठी साहित्यिक होते. त्यांनी फर्गसन व इतरत्र फार्सी शिकविले. पण फार्सी त्यांनी केवळ संस्कृत नको म्हणून घेतले होते. त्यांनी 'फार्सी गझलांच्या अंतस्वरुपा'चा जो लेख १९२७ च्या 'विविधज्ञान विस्तारा'त लिहिला होता तो वाचल्यावर हेही लक्षात येते की फार्सी वाङ्मयाबाबत त्यांना आपलेपणा नव्हताच. त्या कवितांच्या मर्यादा त्यांनी पूर्णपणे जाणल्या होत्या. अर्थात तरीही त्यांच्या गझलांमध्ये हर्राजी, इश्क, साकी असे अनेक फार्सी शब्द येतात. वास्तविक, वडिलांचा आग्रह होता म्हणून संस्कृतबद्दल त्यांना तिटकारा होता. दुसरीकडे फार्सीबद्दल आपलेपणा नव्हता. पण पुढे टिकाकारांनी जे हेरले ते त्यांच्या गझलांमध्ये असे फार्सी शब्द आल्यानेच त्या दुर्बोध आहेत असा शिक्का मारला किंवा त्यांच्या गझलांना तेच हानीकारक आहे, असे स्पष्ट करण्यात आले. वास्तविक, जिंदगी, पर्वा, कौल, उमेद हे शब्द आता तर पूर्ण मराठी झाले आहेत. मग तेव्हा काय झाले? तर माधरावांना शब्दसंकर करण्याचा सोस होता. मल्लोचनी, सुखारामही, नीजतंत्रता, सावसेवा, अनुरागवर्धक माधुरी, अशी उदाहरणे देता येतील.

सु. रा. चुनेकर यांनी माधवरावांचा फार बारकाईने अभ्यास केला. ते या शब्दसंकराबाबत म्हणतात, 'पुढे पुढे पटवर्धनांच्या शब्दयोजनेतही साधेपणा आला व शब्दसंकर कमी झाला. पण तो साधेपणा गद्यप्रायतेच्या पायरीवर पोहोचला. ही गद्यप्रायता माधवरावांच्या कवितेत प्रारंभापासूनच होती.

मला वाटते ही गद्यप्रीयता रुक्ष जीवनातूनच आली होती. नेमकी गंमत ही आहे की, भट यांचेही जीवन रुक्ष होते. दोघेही वडिलांच्या विरोधात घर सोडून आले होते. दोघांची साम्यस्थळे खूप आहेत, पण इथे आपण शब्दांबाबत व त्यामुळे गझलेतील फरकाचा विचार करतोय, माधवरावांची गद्यप्रायता, त्यांच्यावरील फार्सी-संस्कृत प्रभाव आणि शब्दसंकरता यामुळे भट यांची गझल उजवी टरते. दोघांच्या लिखाणाचा काळ वेगळा असला तरीही भट मराठी शब्दांच्या अधिक जवळ जातात. भट हे कायेचा कापूर, मंद प्राणांचा दिवा, हृदयाचे तारुणपण, प्रेतही वाली नसलेली स्मशाने अशा कल्पनांनी वेगळे ठरतात. शब्दसंकर करत नाहीत. एल्गार, काफलासारखे उर्दू शब्द ते वापरतात. फोटोसारखा इंग्रजी शब्दही ते वापरतात पण तो कानांना खटकत नाही. कदाचित कुणी म्हणेल हा अलीकडच्या मराठीचा परिणाम आहे. पण भट हे 'जन्मजात कवी' होते ते म्हणायचे, 'मी शिवीसुद्धा नवीन तयार करतो,'

भट आणि माधवराव यांच्यातील आणखी काही साम्यस्थळे पाहू या. दोघांच्या मराठी विषयीच्या कविता प्रसिद्ध आहेत.

माधवराव म्हणतात,

मराठी असे आमुची मायबोली
जरी आज ती राजभाषा नसे

तर भट म्हणतात,

पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी
आपुल्या घरात हाल सोसते मराठी

दोघांनी उर्दु काव्यप्रकार गझल आणतानाच त्यात हम्द किंवा नात (प्रार्थनागीत) या उर्दु काव्यप्रकारांनाही स्पर्श केला. माधवराव म्हणतात,

ये राज्य कोणा, कोणा फकीरी
ये दास्य कोणा, कोणा अमीरी
कोणी शिकन्दर, कोणी कलन्दर
अल्मुल्कु लिल्लाह ! अल्लाहु अकबर !

तर भट म्हणतात,

तू आमुचा सखा अन् तू एकटाच वाली !
इय्याक नस्तईन !
तू आमुचा निवारा ! तू आमुची खुशाली !
इय्याक नस्तईन !

किंवा

उजाड वैराण वाळवंटी खळाळणारा झरा मुहम्मद
जगातल्या दीनदु:खितांचा अखेरचा
आसरा मुहम्मद

दोघांनी मराठी कवितेतील बहुतांशी प्रकार हाताळले असले तरी दोघे गझलसाठीच प्रसिद्ध आहेत दोघांना जसे घरातून बाहेर पडावे लागले. तद्वत दोघांचा महर्षी कर्वे शिक्षण संस्थेशी संबंध होता. 'दोघेही गझलेची माहिती 'ताजी' ठेवण्याचा प्रयत्न करीत. माधवरावांनी 'वृत्तमनोरमा' च्या लेखात समारोपाच्या वेळी त्याचा उल्लेख केला आहे; भट ही वली सद्दीकींसह अन्य उर्दू-फार्सी भाषकमित्रांशी सातत्याने चर्चा करुन गझलेचे ज्ञान वाढवित. दोघांनी जुन्या कविता अनेकदा फाडल्या आहेत. माधवरावांनी तसा उल्लेख सिसिलिनीयात केलाच आहे. दोघेही पहिष्करणाबाबत (म्हणजे उर्दूत इस्लाह) आग्रही होते. भटांनी तर एक पिढीच निर्माण केली. स्वत:च्या कवितेतही ते सतत इस्लाह करीत. माधवरावांनी भा.रा तांबेंसारख्या ज्येष्ठ कवीच्या कविताही इस्लाह करुन छापल्या. दोघेही इतिहासाचे विद्यार्थी होते. दुर्दैव हे की दोघांच्या गझलेवर जेवढी चर्चा झाली नाही, तेवढी इतर विषयांवर झाली. भटांच्या खाण्यावर व ज्युलीअन यांच्या प्रेमावर रण उठले. समकालीन समीक्षक शांत होते. माधवरावांवर चुनेकर यांनी पुढे पीएच.डी केली. अनेकांनी ग्रंथ लिहिले. भट यांच्या कविता व गझलांबाबत आता 'नवे आकलन' (संदर्भ : डॉ.द.भि.कुलकर्णी)होऊ लागले. पण त्यांच्या हयातीत मात्र समीक्षकांनी ठरवून मौन पाळले त्याचे दुसरे कारण म्हणजे गझलचा अजूनही हवा तसा अभ्यास समीक्षकांचा नाही. त्याचे एक मुख्य कारण असे आहे की मराठीत फार उशिरा गझल आली. अमृतराय वगैरेंचा काळ न धरता माधवरावांचा काळ विचारात घेतला तर उर्दुनंतर गझल पंजाबी, सिंधी, काश्मिरी, गुजराथी, नेपाळी, बंगाली या सर्व भाषांमध्ये आली पण मराठीच्या आधीच आली. ह्याची उदाहरणे विस्तारभयास्तव इथे देत नाही. एकच उदाहरण पुरेसे आहे, मराठीत अमृतराय ह्यांच्यापासून माधवरावांपर्यंत जसा गझलेचा रुजत जाण्याचा काळ आहे तसाच काळ गुजराती भाषेत नर्मद या कवीपासून ते नवलराय ह्या कवीपर्यंत आहे. गुजरातीतील पहिला गझलकार बाळाशंकर कांथारिया यांचा मृत्यूच १८९८ ला झाला. म्हणजे ज्याला परिपूर्ण गझल म्हणता येईल ती गुजराती भाषेत मराठीपूर्वीच आली.


मराठी गझलेचा असा प्रवास मांडताना 'भटनंतर गझल' हा मुद्दा उरतो. भट म्हणाले होते,

जन्मले घेऊन जे पायात काटा
त्या भणंगांनीच यात्रेला निघावे

यात्रा हा शब्द भट यांनी फार जाणीवपूर्वक वापरला आहे. आता यात्रा काय, जत्रा काय दोन्हीत हौसे, नवसे ,गवसे, येतात. चोरही असतात. भटांनंतरच्या गझलेचा प्रवास हौशा-नवशांचा आहे. उर्दूतून गझल चोरांचाही आहे. यावर स्वतंत्र पुस्तकच होईल. मी स्वत: गझलयात्रेतील एक खंदा-बंदा शिपाई आहे. माझ्याबद्दल मी बोलणे उचित नाही. माझे दोन शेर माझ्याबद्दल ग्वाही देतील-

लढण्यासाठी समोर माझ्या कौरव होते
मला मारले ज्यांनी ते तर पांडव होते
मराठीत मी गझला लिहितो, कौतुक नाही
माझ्या सुंदर भाषेचे ते सौष्ठव होते

❖ ❖ ❖ ❖



# बालवाङ्‌मय, बालवाचक आणि तुम्ही आम्ही

डॉ.राजेंद्र माने

लेखक उत्तम कांबळे यांचं 'वाट तुडवताना' हे आत्मकथन वाचत होतो. लहानपणी घरची गरिबी पण मनात पुस्तक वाचायची अनिवार इच्छा. त्या वेळी जादूची कांडी, राक्षसाचा महाल वगैरे. छोटी छोटी पुस्तकं त्यांच्या मनाला भूल घालायची पण घेण्याची ऐपत नव्हती. आईच्या मागे लागून मग चार आणे किमतीचं राक्षसावरचं पुस्तक त्यांनी खरेदी केलं आणि मग खूपदा वाचून काढलं. नंतर स्वतः हमाली करून चार आठ आणे मिळवून ते छोटी पुस्तक खरेदी करून वाचत. त्या पुस्तकातून मिळणारा आनंद त्यांना मोठेपणी लेखक बनायला कारणीभूत ठरला असावा.

हे सांगायचं कारण इतकच की बाल वाचकांची संख्या कमी होते की काय अशी कधी कधी शंका वाटते. घरात संगणक आला की त्यावरचे गेम खेळण्यात मुलं लहानपण घालवू लागली आहेत. तासनूतास व्हीडीओ गेम खेळण्यात त्यांना आनंद वाटतो आहे. शहरातील परिस्थिती सर्वत्र थोड्याफार प्रमाणात अशीच आहे. छोटी छोटी खेडी अजून त्यापासून बचावलीत कारण तिथं या सुविधा घरोघरी नाहीत पण मग अशावेळी इच्छा असून लहान मुलांच्या हाती बाल वाङ्मय किती पडतं हा ही प्रश्न आहे. कधी वाटतं शिक्षणच इतकं महाग होत चाललंय की अगदी गरीब माणसांना मुलं शिकवताना नाके नऊ येत आहेत. मग गोष्टीच्या पुस्तकावर पैसा कोण खर्च करणार ! जिथं पैसे आहेत तिथं मुलांची आवड इतर माध्यमावर आहे. त्यात आता कार्टून फिल्म ही भरपूर यायला लागलेत. मुलं सीडी, संगणक वा व्ही.सी.आर. वर टाकून ते पहात रहातात. वेगवेगळी लहान मुलांची चॅनल तर बरीच आहेत. कार्टून, डिस्ने, पोगो वगैरे चॅनलचा लहान मुलांचा एक वेगळा प्रेक्षकवर्ग आहे. हे सगळं पहाता मग काही वर्षापूर्वीची पिढी लहानपणी चांदोबा, विक्रम आणि वेताळ, बिरबल-बादशहा, इसापनीती, पंचतंत्र, तेनालीरामच्या गोष्टी, अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा, बंडूच्या गोष्टी, फास्टर फेणे वगैरेत रमायची. अधाशाप्रमाणे हातात पडेल त्या पुस्तकाचा फडशा पाडायची कारण वाचनातून एक अनामिक आनंद मिळतो हे वाचून वाचून त्यांच्या लक्षात यायला लागलं होतं. पण सध्या वाचण्याचा प्रयत्नच कमी होतो. कितीसे मुलांचे आई-वडील वाचतात ? मुलांनी ही आई वडिलांना वाचताना पाहिलेले नसते. आई वडीलांनी छोटी गोष्टीची पुस्तक घरी आणणे गरजेचं आहे. ती वाचायला लावून त्याची गोडी लावण्याचा प्रयत्न करणं गरजेचं आहे. एकदा मुलांना पुस्तकाच्या विश्वात रमण्याची सवय लागली मग मुलच पालकांच्या मागे पुस्तकं आणायचा हट्ट करायला लागतील.

मंगेश पाडगांवकर, शांता शेळके, गिरिजा कीर, भा.रा. भागवत, प्रविण दवणे, वंदना विटणकर, इंदिरा संत वगैरे लेखकांनी लहान मुलांसाठी गोष्टी, बडबडगीते लिहून बालवाङ्मय समृध्द करून ठेवले आहे. इतरही बरेच लेखक कवी आहेत ज्यांनी मुलांना समजतील अशा भाषेत ऐतिहासिक किल्ले, थोरामोठ्यांची चरित्रे, वैज्ञानिकांची माहिती, छोटे मोठे विज्ञान प्रयोग कसे करायचे वगैरे विविध विषयावरचे

लेखन केले आहे. नविन पिढीतील लेखक लिहित आहेत पण बालवाङ्मय अजून सतत निर्माण होत राहिले पाहिजे. नविन नविन विषय त्याच्याशी जोडले गेले पाहिजेत. 'हॅरी पॉटर' सारखे पुस्तक देश, प्रांत, भाषा ओलांडून लोकप्रिय होते मग आपल्या संस्कृतीतले कित्येक महानायकसुध्दा त्याच्याहून सरस आहेत ते ही सर्वदूर आवडू लागले पाहिजेत. आणि आवडतीलही. ते सकस प्रयत्न व्हायला पाहिजेत. दिलीप प्रभावळकरांनी 'बोक्या सातबंडे' लिहीलं त्याच्या आवृत्या निघाल्या. मुलांना ते आवडलंही. ही मुलांना आवडतील अशी पुस्तकं त्या त्या वयात त्यांच्या हातात पडतील असा प्रयत्न पालकांनी आणि शाळांनीही करायला हवा. पूर्वी शाळेत इतर तासांबरोबर 'वाचनाचा' एक तास असायचा. त्यावेळी शाळेमार्फत तिथच बसून वाचनासाठी गोष्टीची पुस्तकं दिली जात. आता किती शाळेत हा अवांतर वाचनाचा तास असतो !

मुलं लहान वयातच शाळा, शिकवणी व त्या दोन्हीचा उतारा यात इतकी गुंततात की त्यांना फारसा मोकळा वेळ उरत नाही. जो थोडा उरतो त्या वेळात टी.व्ही. सारखे माध्यम आहेच. मग अवांतर वचन कधी करणार हा ही प्रश्न आहेच.


वाचन संस्कृती टिकण्याचा पाया हा बालवाचक निर्माण होण्यात आहे. काही वाचनालये या बाबत सकारात्मक प्रयत्न करतात. सुट्टीच्या दिवसात वाचनालयातून बालवाचकांसाठी वाचन विभाग चालवले जातात. मुलांसाठी वेगवेगळ्या विषयाची पुस्तकं उपलब्ध करून दिली जातात. कुमार वाङ्मय ही उपलब्ध करून दिले जाते. माधुरी शानभाग, वीणा गवाणकर, यासारख्या लेखिकांचा कुमार वाङ्मय समृध्द करण्यात मोठा हिस्सा आहे. प्र.के. घाणेकर, निनाद बेडेकर, बाबासाहेब पुरंदरे यांनी गडकोट, शिवकालीन गोष्टी, गजकथा सारखी पुस्तकं लिहीली आहेत. हे सगळं एकत्रित वाचनालयामधून वाचायला मुलांना उपलब्ध होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळतो ही एक आशादायक बाब आहे.

'एक होता कार्व्हर' सारखे पुस्तक मुलांना आवडते. त्याच्या आवृत्त्या निघतात आणि त्या रकमेतून एक ट्रस्ट निर्माण होतो त्यातून समाजोपयोगी कामे होतात ही वाचन संस्कृतीचीच ताकद आहे असे मला वाटते.

वेगवेगळी वर्तमानपत्रे बालवाचक डोळ्यासमोर ठेवून वेगळ्या पुरवण्या काढतात. बाल वाचकांचे वेगळे मेळावे घेतात याचाही उपयोग बाल वाचक निर्माण होण्यात होईल. काही संस्था सातत्याने बाल नाट्याचे प्रयोग करतात. किशोर, नवल, जडण घडण, गंमत जंमत वगैरे सारखी मासिके व दिवाळी अंक बालकांचं रंजन, प्रबोधन करतात. लेखकही मुलासाठी बालनाट्ये लिहीतात तीही वाचली, पाहिली जातात. शासनही लहान मुलांच्या पुस्तकासाठी काही योजना राबवते. हे सगळे सकारात्मक प्रयत्न चालू आहेत ही चांगली बाब आहे.

पण महत्वाची गोष्ट म्हणजे लहान वयात पुस्तकांनी आनंद मिळतो, ती वाचत राहिल्यामुळे चांगले संस्कार घडतात, अनेक विषयांची ओळख होते ही मानसिकता मुलामध्ये निर्माण होणे गरजेचे आहे आणि यासाठी पालक, शिक्षक, शासन, वाचनालये, ग्रंथ चळवळीतील संस्था, वर्तमानपत्रे या सर्वांनी मिळून प्रयत्न करत रहाणे गरजेचे आहे असे मला वाटते. त्याचबरोबर लेखकांनीही जुन्या बरोबर नविन विषयांची ओळख घडेल, अंधश्रध्दा दूर होतील, विचारांशी मुलांची नाळ जोडली जाईल अशा विषयावर मुलांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत लिहीत रहायला हवे. बाल वाङ्मय अनुवादित करावे लागेल. पण त्याचबरोबर मराठीतले समृध्द बालवाङ्मय इतर भाषेत पोहोचेल हे ही घडलं पाहिजे. ही देवाण घेवाण बालवाचक समृध्द करेल. प्रत्येक ग्रंथालयाने बाल वाचन विभाग वेगळा चालवला पाहिजे. लहान वयात लागलेली वाचनाची आवड समृध्द व्यक्तिमत्व निर्माण व्हायला पोषक ठरते हे मात्र नक्की.

❖ ❖ ❖ ❖



# ज्ञान आणि वाचनसंस्काराचे मध्यवर्ती केंद्र

श्री.अशोक वाळिंबे

श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा ही संस्था आज १६० वर्षे पूर्ण करीत आहे. सातारा शहरात शंभर वर्षे पूर्ण केलेल्या ज्या मोजक्या आणि नामवंत संस्था आहेत त्यापैकी ही संस्था. १९७८ साली संस्थेचा १२५ वा महोत्सव आणि २००२ साली संस्थेचा १५० वा महोत्सव दिमाखात संपन्न झाला. या दोन्ही समारंभाचेवेळी कार्यवाह म्हणून काम करण्याची संधी मला मिळालेली होती.

१२५ वर्षाचा समारंभाचा मुख्य कार्यक्रम राजवाड्याच्या दरबार हॉलमध्ये संपन्न झाला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारताचे त्या वेळचे सरन्यायाधीश श्री.य.वि. चंद्रचुड उपस्थित होते. नागरीकांच्या उपस्थितीने दरबार हॉलही अपुरा पडला होता.

१५० वर्षाच्या समारंभाचे निमित्ताने सातारा जिल्ह्याचे सुपुत्र आणि महाराष्ट्रातील जेष्ठ विचारवंत आणि वक्ते प्रा. शिवाजीराव भोसले यांचा सत्कार आयोजित केलेला होता. मा. शिवाजीराव भोसले यांच्या जीवनात नगरवाचनालयाचे स्थान हे अत्यंत महत्वाचे असे त्यांनी मानले होते. या वाचनालयात जे वाचनाचे संस्कार झाले त्याबाबत त्यांनी कायम कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांचा सत्कार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे हस्ते झाला होता. एक सरस्वतीपुत्र आणि एक इतिहासपुत्र एकत्र येण्याचा योग सातारकरांना पाहण्यास मिळाला.

हा समारंभ श्रीशाहुकला मंदिरामध्ये झाला. वरील दोन्ही कार्यक्रमांचे वैशिष्ट म्हणजे श्रोत्यांची लाभलेली प्रचंड उपस्थिती. कार्यक्रमाचे स्वरूपही भव्य असे होते. महोत्सवाचे हे दोन्ही कार्यक्रम नागरीकांना अपूर्व आनंद आणि समाधान देणारे असेच संपन्न झाले.

१२५ व्या महोत्सवाचे काळात वर्षभर व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. उल्लेख करावा असा कार्यक्रम म्हणजे श्री. विदयाधर गोखले यांनी नाटके आणि नाट्यगीतांवर आधारीत असा एक कार्यक्रम तयार केला होता. या कार्यक्रमास लता शिलेदार आणि कीर्ती शिलेदार यांच्या नाटकातील भूमिका आणि त्यांच्या गायनाचा श्रोत्यांना लाभ झाला.

श्री. हृदयनाथ मंगेशकर आणि उषा मंगेशकर यांच्या भावसरगम या लोकप्रिय संगीत कार्यक्रमाचा श्रोत्यांना आस्वाद घेता आला. कै. भाउसाहेब पाटणकरांच्या शायरीचा कार्यक्रम साताऱ्यात प्रथम वाचनालयाने आयोजित केला होता. त्यावेळी सातारा शहरात सातत्याने सांस्कृतिक, संगीत अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करणारी वाचनालय ही प्रमुख संस्था होती.

श्री. द.मा. मिरासदार हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. त्यांचा सत्कार कै. श्रीमंत छत्रपती राजमाता सुमित्राराजे भोसले यांचे हस्ते करण्यात आला. पाठक हॉलची जागा अपुरी म्हणून हा कार्यक्रम

समर्थसदन येथे झाला. राजमातांची उपस्थिती आणि मिरासदारांचे विनोद प्रचुर व्याख्यान याचाही श्रोत्यांना एक मनाला आनंद देणारा असा अनुभव मिळाला.

समाजात वाचन संस्कृती आणि वाचनचळवळ वृध्दिंगत होण्यासाठी जे जे उपक्रम आवश्यक आहे ते सर्व उपक्रम वाचनालयाने सुरू केले ते आजपर्यंत सुरूच आहेत. मान्यवरांची व्याख्याने, परिसंवाद, कथाकथन, मुलाखती, संगीत कार्यक्रम, ग्रंथ प्रदर्शने पुस्तक समारंभ इत्यादी सर्व बाबींचा त्यामध्ये सामावेश आहे. या वाचनालयाच्या व्यासपीठावर देशातील आणि महाराष्ट्रातील अनेक नामवंत व्यक्तिंची उपस्थिती लाभलेली आहे.

माझ्या कारकीर्दीत मला आठवणारे त्यांपैकी काही नामवंत म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सेतुमाधवराव पगडी, श्री. बाबासाहेब पुरंदरे, कै. पी.जी. पाटील, प्रा.श्री.शिवाजीराव भोसले, विद्याधर गोखले, द.मा. मिरासदार, श्री. देवदत्त दाभोलकर, श्री. आनंद यादव, रविंद्र पिंगे, बाबा कदम, श्री. प्रभाकर पणशीकर, श्री. सुधीर गाडगीळ इ.

राजकीय नेत्यांपैकी भारताचे उपपंतप्रधान श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. शरद पवार, बॅ. अंतुले, इत्यादी मुख्यमंत्र्यांच्या भेटी झाल्या होत्या.

जनसंघाचे त्यावेळचे अध्यक्ष बलराज मधोक यांचेही भाषण पाठक हॉलमध्ये झाले होते. जगन्नाथराव जोशी, उत्तमराव पाटील इत्यादी वक्त्यांच्या सभाही झाल्या होत्या. आज वाचनालयातील पुस्तकांची संख्या ९०,००० इतकी आहे. ग्रंथ देवघेव, वाचनविभाग, महिला विभाग, बाल विभाग हे समृध्द आहेत. लहानांपासून जेष्ठांपर्यंत विविध घटकांमध्ये वाचनाची आवड निर्माण होत आहे.

शालेय मुलांसाठी घेतल्या जाणाऱ्या विविध स्वर्धांसाठी मिळणारा प्रतिसादही वाढत चालला आहे. एक प्रकारे समाजातील विविध स्तरातील घटकांवर वाचन आणि बौध्दिक संस्कार करणारे हे सातारा शहरातील मध्यवर्ती केंद्र बनले आहे.

एखादी संस्था उत्तम चालण्यासाठी केवळ भौतिक संपन्नता असून चालत नाही. त्या संस्थेला सेवकांपासून व्यवस्थापनापर्यंत उत्तम व्यक्तींची गरज असते. गेल्या काही वर्षात वाचनालयाला अशाच व्यक्तींचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले आहे त्यामुळे या संस्थेचा उत्कर्ष आणि नावलौकिक वाढला आहे.

१२५ वर्षाचे महोत्सव प्रसंगी अध्यक्ष असणारे श्री. मनोहरपंत भागवत आणि आज अध्यक्ष असणारे श्री. सी. व्ही. दोशी या दोघांबरोबर काम करण्याचा मला अनुभव मिळाला. त्यांचेकडून अनेक गोष्टी शिकण्यास मिळाल्या. प्रसंगी तापट परंतु मनाने अत्यंत मृदू असणारे हे दोन्ही अध्यक्ष ग्रंथप्रेमी, साहित्य रसिक आणि सांस्कृतिक दृष्टी असणारे मनोहरपंतांची काम करण्याची तडफ होती. पुढे प्रकृति अस्वास्थामुळे ते निवृत्त झाले पण त्यानंतरची ही जबबदारी श्री. सी.व्ही. दोशी यांनी खूप समर्थपणे पेलली आहे. त्यामुळेच वाचनालयाचे वास्तूतील अपुरी कामे आज मार्गाला मार्गाल लागली.

त्यांचे मदतीला असणारे श्री. दिनकरराव शालगर श्री. बा.ग. जोशी, श्री. कुबेर, सौ. कोल्हटकर हे सर्वजण मनापासून, तळमळीने आणि निस्पृहपणे हे कामकाज पहात आहेत. वाचनालयाच्या आजपर्यंतच्या वाटचालीत निस्वार्थपणे, मनापासून आणि तळमळीने काम करणारे कै. श्री. बा. आचार्य यांचाही सहभाग महत्वाचा वाटतो. जिल्हा ग्रंथालय संघ आणि नगरवाचनालय या दोन्ही संस्थांची पूर्ण जबाबदारी ते एकटे सांभाळत होते.

त्यावेळच्या काळात श्री. मराठे, श्री. तांबे, श्री. वेलणकर, श्री. वि.ल. चाफेकर इत्यादी अनेक कार्यकर्त्यांनी वाचनालयासाठी केलेले कामही महत्वाचे असे होते. प्रा. द. न. गोखले, दा. सी. देसाई, बन्याबापू गोडबोले, आप्पासाहेब भोसले, वि.श्री. दामले, बबनराव उथळे इत्यादी नामवंत व्यक्तींनीही वाचनालयाचे पदाधिकारी म्हणून काम केले आहे.

आज काळानुसार पुस्तक देवघेव विभागात संगणकीकरण झालेले दिसून येत आहे. भविष्यकाळात पुस्तके, वर्तमानपत्रे यांचेही वाचन संगणकावर होणार असे दिसू लागले आहे. त्यादृष्टीनेही वाचनालयाला भविष्यकाळाचा विचार करावा लागेल.

वाचनालयात बसून वाचन करण्यासाठी एखादी अभ्यासिका, सुसज्ज सभागृह यांची वाचनायलास आवश्यकता आहे. शहराच्या पूर्वभागात सुरू केलेल्या उपनगर केंद्रास जागेची आवश्यकता आहे.

सध्या मिळणारे शासकीय अनुदान हे तसे सर्व गरजा पूर्ण करणारे नाही. सातारकर नागरीकांनी या सर्व कामासाठी आर्थिक सहकार्य केल्यास वाचनालयाच्या आवश्यक बाबी पूर्ण होतील. अणि भविष्यात सातारा शहरातील हे ग्रंथालय ज्ञानाचे आणि वाचनसंस्काराचे मध्यवर्ती केंद्र बनेल असे वाटते.

❖ ❖ ❖ ❖